साप्ताहिक
# माणूस
दोन रुपये
४ फेब्रुवारी ८४

## भारतीयत्वाचा शोध घेणारे देशी आणि युध्दाच्या खुणा जागवणारे विदेशी चित्रपट





# फिल्मोत्सव-८४

साप्ताहिक

# माणूस

□

**वर्ष : तेविसावे**

**अंक : छत्तिसावा**

□

**४ फेब्रुवारी १९८४**

**किंमत : दोन रुपये**

□

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

□

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

**मेधा राजहंस**

□

वार्षिक वर्गणी

**पन्नास रुपये**

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

**पत्ता :**

**साप्ताहिक माणूस**

**१०२५ सदाशिव, पुणे ३०**

**दूरध्वनी : ४४३४५९**

□

मुखपृष्ठ

**संजय पवार**

# सप्रेम नमस्कार..

□ 'माणूस' दिवाळी अंक उशिरा वाचून झाला. सध्याच्या भरमसाठ (किमतीने व संख्येने) अंकांच्या भरताडातून आवर्जून वाचण्यासारखे जे काही अंक आहेत त्यांपैकी एक 'माणूस'चा अंक आहे.

विशेषत: याच अंकातील श्रीकृष्णावरील दीर्घ लेख हाही वारंवार वाचून मनन करण्यासारखा आहे. आजपर्यंत अनेक ग्रंथांतून दिसणारा श्रीकृष्ण व त्याचे जीवनमंथन, या साऱ्यापेक्षा या लेखाचे स्वरूपच खूप वेगळे आहे. कृष्ण-कथेतील विविध घटना–प्रसंगांतील तत्त्व अलीकडच्या काळातील महापुरुषांच्या जीवनात कोठे व कसे आढळते आणि आजच्या पिढीने डोळसपणे त्यातून काय घ्यावे याचे उद्‌बोधन यातून होते. कृष्ण-जीवनाचा हा नवा विचार व चिंतन लेखकाचा व्यासंग व बहुश्रुतता यातून सहज स्फुरलेले उद्‌गार वाटतात.

सहजीवनावरील चर्चा, हरिभाऊ मोटे यांच्यावरील लेख वाचनीय व व्यक्तिदर्शन घडविणारे आहेत.

सहजीवनातून फुललेला व नटलेला सूर अंकाचा प्रसन्नपणा दर्शवतो.

१५ जानेवारी १९८४ **उद्धव देशपांडे**
वारणानगर

□ मी 'माणूस'चा एक नियमित वाचक आहे. वाचकांच्या ज्ञानात भर घालून त्याचबरोबर स्वतंत्र विचार करायला लावणारे 'माणूस' हे मराठीतील एक चांगलेच साप्ताहिक आहे.

शांततेचे नोबेल पारितोषिक विजेते 'लेक वालेसा' यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर सध्या येत असलेली बंधने, जॉर्ज ऑरवेल यांच्या '१९८४' व 'अॅनिमल फार्म' या कादंबऱ्यांमधील कम्युनिस्ट राजवटीतील परिस्थितीचे वर्णन. मार्क्स, लेनिन यांचे मूळ विचार कातरून कातरून सोइस्कर (काही ठराविक व्यक्तींपुरते) करून घेणारे आणि वर 'हे सर्व तुमच्या भल्यासाठीच' असे सामान्य जनतेला सांगून त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने आणणारे राजकीय नेते. हे सर्व पाहून पहिली–दुसरीत शिकलेल्या एका कवितेची आठवण झाली. कम्युनिस्ट राजवटीच्या बंधनकारक वातावरणाखाली वाढणाऱ्या 'लेक वालेसा' आणि त्यांच्यासारख्याच अनेक स्वतंत्र विचारसरणीच्या लोकांच्या मनाची रूपक कविताच ती मला वाटली.

पोपट, पोपट,
बोलतोस गोड,
पण झालास रोड.
खा ना जरा पेरूची फोड
भाऊ, भाऊ, (बिग ब्रदर)
बोलतोस गोड,
देतोस फोड,
दार उघड आणि मला सोड.
भाऊ, भाऊ,
रानात जाईन,
फळे खाईन,
डहाळीवर बसून झोके घेईन.

१९ जानेवारी १९८४ **बी. जे. अविनाश**
कोरेगाव

## अशी एक प्रतिक्रिया !

माणूस साप्ताहिकाच्या दिनांक १४–१ व दिनांक २१–१ च्या अंकात विनया खडपेकर ह्यांच्या 'अर्धसत्य' ह्या चित्रपटांवर प्रसिद्ध केलेला लेख व त्याप्रमाणे विजय तेंडुलकर ह्यांची प्रसिद्ध केलेली मुलाखत वाचली. ह्या मुलाखतीमुळे या गाजलेल्या चित्रपटाची ब्रॅकग्राऊंड मात्र समजली. 'अर्धसत्य' हा चित्रपट सध्या बराच गाजला आहे व पोलीस खात्यामधील बहुतेक सर्व लहान थोर अधिकाऱ्यांनी हा चित्रपट पाहून आपली मते स्पष्टपणे मांडली आहेत ही विशेष कौतुकाची बाब आहे. सबंध पोलीस खाते ह्या चित्रपटाने ढवळून काढले आहे असे मी जर इथे सांगितले तर ते चुकीचे होणार नाही.

माझ्यामते प्रेक्षकांना विचार करावयास लावणारा हा चित्रपट आहे हे नक्की. 'सूर्य' ह्या कथेचं व त्याचप्रमाणे दिलीप चित्रे ह्यांच्या 'अर्धसत्य' ह्या कवितेचं माझ्यामते सोनं झालं आहे. 'मारावं की मरावं, मारलं जावं की जीव घ्यावा याचा कधीच निकाल लागणार नाही.' ह्या कवितेत वर्णन केलेली

मन:स्थिती व चित्रपटांतील नायक इन्स्पेक्टर अनंत वेलणकर ह्याची पुढे दाखवलेली मन:स्थिती ह्यात नक्कीच एक प्रकारे साम्य आढळते. व शेवटी अनंत वेलणकरांनी आपल्या परीने एक कटू निर्णय घेऊन तो पार पाडला आहे. मला एक मात्र खटकलं की, अनंत वेलणकर ह्याचे प्रेमकरण ह्या चित्रपटात दाखविण्याची मुळात आवश्यकता होती काय ? चित्रपटात त्यामुळे कोणता उठाव लाभला हे समजले नाही. त्यापेक्षा वडलांनीच निवडलेल्या पण त्याला पसंत नसलेल्या अशा मुलीबरोबर त्याचा विवाह होण्याची शक्यता दाखविली गेली असती तर ते अधिक चांगले दिसले असते. असा एक चांगला चित्रपट दिल्याबद्दल गोविंद निहलानी यांना धन्यवाद.

२२ जानेवारी ८४ **राम वैद्य**, कल्याण



# मुंबापुरी

**शि**वसेनेच्या शिवाजीपार्कवरील अधिवेशनात बाळासाहेबांनी गांधींबद्दल जे उद्‌गार काढले ते आम्हाला येथे लिहिण्याची इच्छा नाही. गांधींच्या विचारापासूनची तफावत आम्हाला समजू शकते; पण बाळासाहेबांना त्यांच्या चारित्र्याविषयीही शंका दिसते.

ह्याच अधिवेशनात गांधी चित्रपटात कस्तुरबांचे काम केलेल्या रोहिणी हत्तंगडी यांचा सत्कार करण्यात आला. या चित्रपटातील कामाच्या निमित्ताने बाईंना गांधींच्या जीवनाचा जवळून अभ्यास करण्याची संधी मिळाली असेल असा आमचा एक गैरसमज होता. तो ह्या सत्कारानंतर दूर झाला.

'तुम्ही गांधींचा अपमान करता तर मग कस्तुरबांचा सत्कार कसा करता?' ह्या प्रश्नाला उत्तर देताना बाळासाहेबांनी गांधींबद्दल जे उद्‌गार काढले ते रोहिणीबाईंनी पचवले तर खरेच आणि वर सत्काराला उत्तर देताना, 'हे कौतुक कस्तुरबांचे समजू नका एका कलाकाराचे समजा' असे म्हणून वेळ मारून नेली. असो. ह्या देशात गांधींचा जितका अपमान होईल तितके उत्तम !

अधिवेशनात बाळासाहेबांनी व्यक्त केलेले काही विचार पुढीलप्रमाणे :–

: प्राध्यापकांच्या भाषणापेक्षा दादा कोंडक्यांच्या भाषणाला लोक अधिक जमतात. उपयोग काय त्या प्राध्यापकी भाषणाचा ?

: आज वेळ अशी आलेली आहे की, 'विचार' हा 'अविचार' ठरून 'अविचार' हा 'सुविचार' ठरेल !

: भले पंतप्रधानांच्या मोटारीवर मुंबईत दगडफेक झाली तर त्या निदर्शकांच्या पाठीशी आम्ही उभे राहू.

□

गांधीजी लंडनला असताना रस्त्याने जात असता त्यांची वाट एका ब्रिटिश पत्रकाराने अडवली. अगदी थेट त्यांच्या पुढ्यात उभा राहून तो म्हणाला, 'मी मूर्खांना वाट देत नाही. )I don't give way to fools)'

गांधीजी तावडतोब बाजूला झाले आणि म्हणाले 'पण मी देतो ना ! (But I do !)'

□

हा अंक तुमच्या हाती पडेपर्यंत एकतीस तारखेचा मुंबई बंद होऊन गेलेला असेल. विरोधी पक्षांनी मोर्चे बांधायला सुरुवात केली आहे. ह्या खेपेस रेल्वे आणि बसेससुद्धा बंद करायचा निर्णय घेण्यात आलेला आहे. दादांना एकूण उरणचा गोळीबार फार महागात पडणार असे दिसते.

पण आता कमरा कसून बंदला सज्ज झालेल्या ह्या विरोधी पक्षांनी उरणला आंदोलन सुरू होते तेव्हा काय केले हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

बंद यशस्वी होईल यात शंका नाही. सरकारने जर जबरदस्तीने रेल्वे आणि बसेस चालू ठेवण्याचा प्रयत्न केला तर चारदोन लोक अधिक ठार होतील. चर्चगेटला काचा फुटतील. वरळीला कदाचित लुटालूट होईल आणि म्हापालिकेच्या रुग्णालयात जाणाऱ्या रुग्णांचे अनन्वित हाल होतील; पण तरीही बंद यशस्वी होईल यात शंका नाही !

काँग्रेस सरकारचे एक वैशिष्टच आहे. त्याचा कुणी पराभव करावा लागत नाही. ते आपल्या मरणाने मरते. दुर्दैव असे की विरोधी पक्षांचेही हेच वैशिष्टच आहे. अन्यथा हाती आलेली सत्ता जनता पार्टीने गमावली नसती !

□

नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया या काँग्रेस आयच्या युनियनचे पंचवीस विद्यार्थी कार्यकर्ते आझाद मैदानात तंबू ठोकून उपोषणाला बसले आहेत. बीइएसटी बसभाड्यात विद्यार्थ्यांना ५० टक्के सूट मिळावी अशी त्यांची मागणी आहे.

मागच्या महिन्यात याच विद्यार्थ्यांनी बीइएसटीचे जनरल मॅनेजर पु. बा. केरकर ह्यांच्या कॅबिनमध्ये शिरून मोडतोड केली होती. त्यात मुख्यमंत्री वसंतदादांचे चिरंजीव राजेंद्र पाटीलही होते. आता अचानक ह्या विद्यार्थ्यांनी गांधी टेक्निक अवलंबिल्यामुळे आम्हाला भारी आनंद झाला आहे. मात्र सजविलेला मंडप, गाद्या, लोड आणि पांढऱ्या चादरी यामुळे आझाद मैदानात ह्या युनियनचे वार्षिक अधिवेशन चालले आहे असा भास होत आहे हे काही ठीक नाही !

–विष्णू जयदेव

---

**मुखपृष्ठावरील छायाचित्रे :**

**'सागर संगमन्' आणि 'प्रेनॉम कार्मेन' चित्रपटातील.**

मुक्काम कोल्हापूर

# निवडणुकांची प्रश्नचिन्हं !

काही दिवसापूर्वी बेळगाव महापालिकेच्या पहिल्यावहिल्या निवडणुका झाल्या व मराठी भाषिकांना बहुमत मिळून श्री सुभाष जाधव हे महापौर झाल्याचं बहुतेकानी वाचलं असावंच बेळगावपाठोपाठ सध्या कोल्हापूरच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. कोल्हापूर महानगरपालिकेची ही दुसरी निवडणूक; परतु ती होणार की नाही याबद्दल इतके वाद चालले आहेत की, केवळ पाहात रहाणे एवढेच मतदाराच्या हातात आहे. अर्थात मतदार त्याव्यतिरिक्त काही करतात काय हा एक संशोधनाचा मुद्दा होईल.

कोल्हापूर नगरपालिकेची महानगरपालिका झाल्यानंतर पहिली काही वर्षं इथं प्रशासकीय कारभारच चालू होता. आणि या प्रशासकामधील सर्वात लोकप्रिय प्रशासक म्हणून श्री. द्वारकानाथ कपूर नामक व्यक्तीन लौकिक मिळवला. 'सुदर कोल्हापूर' ही बाकी काही शहराप्रमाणेच असणारी योजना धडाडीनं अमलात आणली ती श्री. कपूरनीच. कपूर याच्या कारकिर्दीत जे चैतन्य होतं ते कालातरानं संपलं; परंतु त्यानी जो त्या योजनेचा मार्ग आखून दिला, त्यावरून जी मार्गक्रमणा झाली त्यातूनही कोल्हापूर थोडंफार सुदर झालंच. कपूर याना पुढ दिल्लीत कोणत्या तरी खात्यात घेतलं गेलं. आजही त्याचं नाव मधून–मधून वृत्तपत्रात झळकतं.

परंतु त्यांच्यानंतर कोल्हापुरात माझ्या अदाजानुसार एकही प्रशासक वा महापौर असा झाला नाही की, ज्यान आपल्या मागोमाग स्वत:चं नाव ठेवलं प्रशासकीय कारभार सपल्यानंतर प्रतिवर्षाप्रमाणे महापौर निवडले गेले आणि आता सदर महापालिकेची मुदत सपत आहे. मुळात ५ वर्षांची मुदत संपून एक वर्ष झाल; पण मुदतवाढ १ वर्षाची होती व तीही आता मार्चमध्ये संपते. शासनानं ३१ मार्चपर्यंत निवडणुका घ्यायलाच हव्यात म्हणून निवडणुकाचा कार्यक्रम घोषित केला आहे. ४ फेब्रुवारी ते ५ मार्च या वेळेत निवडणुकाचे सर्व कामकाज चालेल. प्रत्यक्ष मतदान १८ मार्चला होईल.

अर्थात हा झाला शासनान जाहीर केलेला कार्यक्रम; पण जाहीर झालेल्या कार्यक्रमाप्रमाणं सर्व काही होण खूप कठिण दिसत आहे. कार्यक्रम जाहीर झाल्यावर इच्छुक उमेदवार कामाला लागले. काम म्हणजे काय तर गल्ली–बोळातल्या दादा–अण्णाना आणि तथाकथित बॉसेसना गूळ लावणे, नसलेले प्रेम प्रदर्शित करणे, स्वत:च्या प्रचारासाठी रंगवायच्या भिंती 'बुक' करणं, कापडी फलक रंगवणं इत्यादी. दुसरी गोष्ट म्हणजे मतदारयादीत नावे नोंदवणे. 'आपले' मतदार जास्त यावेत म्हणून त्या दृष्टीतून नावं नोंदली गेली. एक लाख ३५ हजार अर्ज विकले गेले आणि यात ७६ हजार २६१ अर्ज मुदतीत आले व विचारात घेतले गेले. बाकी ३५ ते ४० हजार अर्ज मुदतीत आले नाहीत म्हणून निकालात काढले गेले. पुन्हा ७६ हजारातही बोगस मतदारनोंदणी मोठ्या प्रमाणावर झाली आहे. उदाहरणार्थ सागायचं झालं तर वॉर्ड नं. ८ मध्ये ३१०० अर्ज आले. त्यातील १२०० अर्ज बोगस सिद्ध झाले. तर यावरून लक्षात येईल की, किती बोगस-नोंदणी झाली. वॉर्डात न राहणारे, २१ वर्षांखालील, खोट्या सह्या करणारे, कबरस्तान व सार्वजनिक बागात वास्तव्य करणारे असे अनेक बोगस मतदार नोंदले गेले. त्यामुळे आता निवडणूकप्रक्रियेत अडचणी येणार आहेत.

आणखी एक गोष्ट म्हणजे पालिकाआयुक्तानी ८०, सालची मतदार यादी वैध ठरवून त्याच मतदारांना मतदान करण्याचा हक्क दिला आहे; परतु उमेदवार म्हणतात की, सध्या विधानसभा निवडणुकासाठी जी नवी यादी बनली आहे त्याआधारे निवडणूक व्हावी यावर सध्या वाद चालला आहे आणि या मुद्द्यावरून कोर्ट–कचेऱ्या करून स्टे आणल्यानतरच काही जणाचं समाधान होणार आहे. इच्छुक नव्या उमेदवारानी आतापर्यंत बराच पैसा खर्च केलाय तर दुसरीकड विद्यमान नगरसेवक निवडणूक पुढं जावी यासाठी प्रयत्न करताहेत. अर्थात शासनाला आणखी पाच महिने वाढविता येतात. मात्र सप्टेंबरअखेर निवडणुका घ्याव्याच लागतील. लोकसभा निवडणुकाचे काही असो, परवा वसतदादानी मंत्रीमडळ बैठकीत महापालिका निवडणुकाचे सूतोवाच केल्याचे वृत्त असल्याने (सध्या नगरसेवक नसणारे) उमेदवार कामाला लागलेत.

### आधी खर्च, मग दुप्पट मिळकत

विद्यमान नगरसेवकाना निवडणूक का नको आहे ? याचं कारण म्हणजे स्वतःची डागळलेली प्रतिमा उजळायला त्याना वेळ हवाय. पहिल्या महापालिका निवडणुकीत काही अपवाद वगळता बहुतेक अपक्षच निवडून आले. अर्थात पुढे बहुसख्य सदस्यांनी आय काँग्रेसशी नाते जुळवले हे खरं, पण इथल राजकारण बाकी बऱ्याच स्थानिक स्वराज्यसंस्थाप्रमाणेच आहे. त्वयार्धम्–मयार्धम् ! महापौर–उपमहापौर स्थायी समित्या-चेअरमनशिपस् वगैरे सत्तापदे यात हितसबध गटबाजीतून साभाळले गेले. गट बदलत राहिले-फोडले गेले, फुटलेपण पक्षनिष्ठा वगैरे प्रकार इथं नव्हताच. (बाकी – पुण्या – मुबईच्या महापालिकाही अशाच आहेत नाही का ?) तर अशा गटबाज्या, सत्तेची हाव किंवा रिक्षाआंदोलन यासारख्या प्रकरणामधून विद्यमान नगरसेवकाची प्रतिमा जनमानसात काळवंडलेली आहे. मात्र सध्याच्या निवडणुका जाहीर होऊन काही दिवस लोटले तरीही या नगरसेवकाना तो वेळ पुरेसा वाटत नाही. आपल्या मतदारसघात वाचनालयांच्या कार्याला गती देण, गटारी बांधणं, उगीचच जनतासंपर्क वाढविण या गोष्टी म्हणजे इथल्या सध्याच्या भाषेत सागायचं तर डाबरी रस्त्याला दिलेले पॅचिस आहेत. या डांबरी रस्त्याच्या दुरुस्तीच्या प्रकरणाचीही मोठी रंजक हकिकत आहे तपशील न देता एवढच सांगतो की, ज्या कपनीला रस्ते दुरुस्तीचं काम दिलं गेलं तिन नगरसेवकाना सहा लाख रुपये वाटले व रस्ते बादच ठेवले असा आरोप होत आहे. पुराव्यान हे सिद्ध होणार नाही; पण शहराकडं येणाऱ्या एका मोठ्या रस्त्याची दुर्दशा पाहिल्यावर हे समजेल. रस्त्याच्या टिकण्याबद्दल तीन वर्षांची गॅरंटी होती ही यातील महत्त्वाची गोष्ट, पण दोन वर्षात (दोनदा दुरुस्ती करूनही) रस्ते बिघडले.

पण प्रतिमा उजळण्याचे हे सगळे प्रकार मतदार ओळखून आहेत. त्यामुळं नगरसेवक

जरा हडबडलेत. मुळातील साठ नगरसेवकांपैकी ५०–५२ च उभे राहतील. त्यातील दहा–पधरा तरी निवडून येतील की नाही याबद्दल शका आहे. त्यातही नगरसेवक व अधिकारी यांच्या संगनमतातून उद्भवलेल्या भ्रष्टाचाराचं प्रकरण विद्यमान नगरसेवक व महापालिका अधिकाऱ्यांना अडचणीत आणू शकेल. नगरसेवकाबरोबर महापालिका अधिकारीही सरकार क्षेत्राचे प्लॉटस् पाडून नातेवाइकांना वाटप करण्यासारख्या प्रकरणात गुतल्यानं अखेर शासनान भ्रष्टाचार चौकशी समिति नेमली, पण सदर समितीच्या श्री. सिद्द या अधिकाऱ्यांनी पत्रकारांना काहीही 'विशेष' सांगितलं नाही. नियोजित वेळेत शासनाला अहवाल सादर होऊन काही कृती होणार होती, त्याबद्दलही अजून काही वार्ता नाही.

अशा पार्श्वभूमीवर निवडणुका घोषित झाल्या. त्या जर पुढे ढकलल्या गेल्या तर आतापासून जे रणांगणात आहेत त्यांचा खूप हिरमोड होईल. पैसा तर त्यांनी बराच खर्च केलाय. तेव्हा ते कोर्टात जातील. आणि दुसरीकडे बऱ्याच जणांना निवडणुका स्वतःच्या स्वार्थासाठी पुढं जाव्यात असं वाटतं. अर्थात शेवटी इथलं एक चित्र म्हणजे निवडून यायला भरपूर पैसा खर्चायचा व त्या दुप्पट निवडून आल्यावर मिळवायचा असं. त्यामुळं साध्या माणसाला या निवडणुकांत यथातथाच रस आहे. त्याला राग तेव्हा येतो जेव्हा त्याच्या घरावर प्रचारासाठी उमेदवाराची नावं रंगविली जातात. निवडणुकीच्या निमित्ताने गल्ली–बोळातील गुंडगिरी बहरात येते अशा वेळी घरे–भिंती न रंगवण्याबद्दल इथं एका मंडळानं मोहिम हाती घेतलीय. जो घरं–भिंती घाण करेल त्याच्यावर मतदारांनी बहिष्कार टाकावा हे त्याचं आवाहन फार चांगलं आहे; पण बाकीच्या तरुण मंडळांनी त्याचं अजून तरी अनुकरण केलेलं नाही. कोल्हापुरातल्या बऱ्याच भागात हे शहर मलिन करायचं काम जोरानं सुरू झालंय. निवडणुका होतील की नाही याबद्दल प्रश्नचिन्ह असली तरी बाकीची दुश्चिन्हं आता दिसायला लागली आहेत.

— सुनील धोपेश्वरकर

म. रा. वि. मंडळाने केलेली

# एका गरीब शेतकऱ्याची ससेहोलपट

विनय गुणे, संगमनेर

संगमनेर सोडलं आणि पुण्याच्या दिशेनं जायला लागल्यावर चंदनापुरीघाटाच्या पुढं रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी आतपर्यंत पसरलेलं उजाड माळरान, तरवड–बाभळीची खुरटी झाडं, चुबुकाटे आणि सराटे, उन्हात वाळून पिवळं पडलेलं गवत आणि भकास टेकड्यांचा परिसर तेवढा दिसतो. आळेफाट्यापर्यंत हे दृश्य काही संपत नाही. या सगळ्या पठारावर पाण्याचं कायमचं दुर्भिक्ष्य –पण गप्प बसून थोडंच भागणार आहे? आपली जमीन तर कसायलाच हवी; पण त्यासाठी पावसाच्या येण्याची कुठपर्यंत वाट बघणार?– म्हणून मग इथल्या शेतकऱ्यांनी विहिरी खणल्या, पाण्याशिवाय आपलं दारिद्र्य हटणार नाही. या जमिनीतून पाणी खेळलं, हिरवीगार शेतं उभी राहिली, कारखान्याला ऊस जायला लागला की मग सुबत्ता दूर नाही. एक–दोन एकराचे धनी असलो तरी दोन वेळच्या भाकरीची चिंता तरी मिटेल, दुसऱ्याच्या शेतावर मोलमजुरी तरी करावी लागणार नाही.

ते नुस्तीच स्वप्नं बघत नव्हते. त्यासाठी कष्टाची त्यांची तयारी होती. खणलेल्या विहिरी हे त्याचं दृश्य रूप होतं– फक्त विहिरीवर पंपासाठी विजपुरवठा हवा होता.

संगमनेर तालुक्यातील या पठारावरच्या नांदूर, खंदरमाळ, अकलापूर गावच्या शिवारातील नऊ शेतकऱ्यांनी विहिरीवरील पंपासाठी वीजपुरवठा मिळावा म्हणून १९७९ साली एक अर्ज महाराष्ट्र राज्य विद्युत-मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्याकडे सादर केला.

आलेली सर्व म्हणजे नऊ शेतकऱ्यांची दहा प्रकरणे पुढील कार्यवाहीसाठी श्रीरामपूर येथील कार्यालयाकडे पाठविण्यात आली. त्याच्या जबाबात श्रीरामपूर कार्यालयाने दि. १२।११।१९७९ च्या पत्राने मुंबईच्या मुख्य ऑफिसकडून या शेतकऱ्यांचा अर्ज त्यांच्याकडे गेला म्हणून विचारणा केल्यामुळे 'प्रकरणे तांत्रिकदृष्ट्या योग्य आहेत, फक्त या वर्षाच्या तरतुदीमध्ये त्यासाठी फंडस् शिल्लक नसल्याने त्याची कामे १९८०–८१ या वर्षात फंडस् उपलब्ध झाल्यानंतर सुरू करण्यात येतील' असे कळविले.

या प्रकरणाला खरी सुरुवात येथपासूनच होते.

श्री. रामप्रसाद हिरालाल गोळवा यांचेसह नऊ लोकांची प्रकरणे एस्टिमेटसह श्रीरामपूर कार्यालयाकडे होती हे श्री चौधरी, कार्यकारी अभियंता, श्रीरामपूर यांनी मुंबईच्या मुख्य कार्यालयाला पाठविलेल्या पत्रात स्पष्ट केले होते. १९८०–८१ च्या योजनेत त्यातील आठ शेतकऱ्यांना कोटेशन देण्यात आली. याचा अर्थ आठ लोकांची प्रकरणे मंजूर झालेली होती. दहा प्रकरणांपैकी ठरलेली दोन्ही प्रकरणे श्री. गोळवा यांची होती. नांदुरगाव साकूर ता. संगमनेरच्या विभागीय कार्यालयाला जोडलेले आहे, म्हणून श्री. गोळवा यांनी तेथील कनिष्ठ इंजिनियरकडे चौकशी केली. तेव्हा 'तुम्हाला कनेक्शनसाठी फक्त सर्व्हिस वायरची गरज आहे तेव्हा या आठ जणांचे पंपसेट बसल्यावर तुम्हाला कनेक्शन देण्यात येईल', असे सांगण्यात आले.

श्री. गोळवा यांचे प्रकरण दि. १९।१।१९८१ रोजी सहाय्यक अभियंता संगमनेर यांचेकडे वर्किंग ऑर्डरसाठी पाठविण्यात आले त्याच्याकडे महिनाभर प्रकरण पडून राहिल्यावर श्री. गोळवा यांनी चौकशी केली तेव्हा तुम्हाला वीजपुरवठा देता येणार नाही असे चोख सांगण्यात आले.

या दहा प्रकरणांपैकी एकाच विहिरीवरच्या दोन कनेक्शन्सपैकी श्री. नदकर यांचे

पृष्ठ २९ वर

यावेळच्या फिल्मोत्सवाचं आकर्षण होतं – विख्यात दिग्दर्शकांचे विदेशी चित्रपट आणि 'इंडियन पॅनोरमा' या गटातले भारतीय चित्रपट. या दोन गटातील चित्रपट, त्यांचे दिग्दर्शक आणि चित्रपटातून उमटणारा त्यांच्या शैलीचा ठसा याबद्दलचा खास वाचावा असा वेधक आढावा दोन स्वतंत्र लेखांत पुढे दिला आहे.

या दोन्ही लेखांचे लेखक–**सतीश जकातदार**

# युद्धाच्या ओल्या जखमा - अणुयुद्धाची भीती मांडणारे विदेशी चित्रपट

**गो**ष्ट सांगण्याची कला असणाऱ्या गोष्टी-वेल्हाळांचा मेळावा भरावा आणि त्यात केवळ 'श्रोते' म्हणून आपल्यालाच 'चान्स' मिळावा आणि मग मेळावा संपल्यानंतर आपल्या परिचयाच्या माणसांत गेल्यावर आपली जी अवस्था होईल ती अवस्था फिल्मोत्सव संपल्यानंतरची!

इथं तर धोबीतलावाच्या मेट्रोपासून कुलाब्याच्या स्ट्रॅन्डपर्यंतच्या सात–आठ चित्रगृहांत सेकंदाला चोवीस फ्रेम या गतीने या गोष्टी आकाराला येत होत्या. रात्रीची 'आवश्यक झोप' घेतल्यानंतर सकाळपासून रात्रीपर्यंत सेकंदाला चोवीस पावलं टाकत, या थिएटर्सशी खांब–खांबोळी खेळत या गोष्टी याचि देही याचि डोळा पाहाव्या लागत होत्या. अर्थात त्यातील भोज्ज्यांचे ठिकाण मात्र 'मेट्रो' होते.

तेथेच प्रामुख्याने या गोष्टी सिनेमाच्या पडद्यावर आकार घेत होत्या. त्यात पुन्हा गोष्ट सांगणारे एका ठिकाणचे नव्हते. आपल्या शेजारच्या चीन, बांगलादेश, सिलोनपासून अगदी दूरच्या आफ्रिका खंडातील आपल्याला माहीत नसलेल्या, उच्चारताही येत नाही अशा नावांच्या देशातील होते. गोष्ट सांगण्याची प्रत्येकाची पद्धत, हातोटी निराळी तसे विषयही आगळे-वेगळे, काहीसे परिचित–अपरिचित, काहीसे अगम्य अकलनीय!

आपापल्या देशांचा (सुमारे ४०) वसा आणि ठसा घेऊन आलेले हे चित्रपट तेथील तत्कालिक प्रश्न समस्या, व्यथा मांडणारे–त्यातील गतकालीन किंवा समकालीन गुंतागुंत स्पष्ट करणारे, त्या दूरच्या माणसांची स्वप्नं, कैफियत सांगणारे त्यांच्या आशा–आकांक्षा सुख-दुःखांच्या कल्पना चितारणारे आणि क्वचित प्रसंगी स्थलकालाच्या हद्दी भेदून वरच्या, व्यापक, उंच गोष्टी बोलणारे असे हे चित्रपट होते. पंधरा दिवस सिनेमाच्या 'कॅलिडिस्कोप'मधून बघावे तसे त्या पडद्यावरचे तासा–दोन तासांपुरते विश्व हरएक चित्रपटासमवेत बदलत होते.

या शे–दोनशे चित्रपटांतील काही दर्जेदार तर काही रटाळ होते. काही मोलाची शिकवण देणारे तर काही प्रचारकी थाटाचे, तर काही मूलगामी संदेश देणारे. काही खास विक्रीसाठी आणलेले, तर काही विकत घ्यावेत असे. तर त्यातील काहीच 'आपल्या घरी घेऊन जावेत' असे वाटण्यास भाग पाडणारे. गरीब देशांतील आशय–समृद्ध चित्रपट तर समृद्ध राष्ट्रातील उच्च निर्मितिमूल्ये असलेले, झगमगित, तंत्रदृष्टचा अवाक करणारे. काही अगदी 'एपिक्' वाटावेत असे तर काही अत्यंत फडतूस, फालतूसुद्धा–जागतिक चित्रपटसंस्कृतीची अगदी आजची ताजी चव चाखता येईल असे!

आणि तुम्हाला हेही पाहायचे नसेल तर ओशिमा, बर्गमन, श्लॉलनड्रॉफ व वाज्दा अशा मातब्बर दिग्दर्शकांची ओळख करून देणारे, तर मा. विनायक, वासन, बरुआ, गुरुदत्त असा तुमचा 'नॉस्टॅलजिया' जागृत करणारे 'सिंहावलोकन विभाग' होते. शिवाय आफ्रिकेतील अपरिचित चित्रपटांची ओळख करून देणारा खास विभाग होता.

त्यात पुन्हा पंधरा दिवस पाहण्यासाठी देशोदेशींचे मोजके दिग्दर्शक, काही निवडक पत्रकार आले तसेच महोत्सवाला ग्लॅमरची ऊब देण्यासाठी आपल्याकडील काही चंदेरी तारेही हजर होते. एखाद्या यात्रेला ज्या भक्तिभावाने यावे तशी इथे सिनेमाप्रेमी मंडळी जमली होती. त्यांच्यात गोऱ्या युरोपियनांपासून काळ्या आफ्रिकनांपर्यंत तर उंच, धिप्पाड अमेरिकनांपासून बुटक्या मिचमिची डोळ्यांच्या जपान्यांपर्यंत सर्व होते. शिवाय आपली एकात्मतेतील विविधता बहुसंख्येने उपस्थित होतीच.

प्रत्येकाचे हित वेगळे, कोणी धंद्यासाठी कोणी संपर्कासाठी, कोणी नोकरी म्हणून तर कोणी आवड, छंद म्हणून ही सारी माणसं चर्चा करत होती–परिसंवाद, पत्रकार–परिषदा यातून बोलत होती आणि सर्वच सिनेमांचे रस्ते अखेर लोकांच्या दिशेला वळतात. त्याप्रमाणे लोकांना ओलीस ठेवून प्रत्येकजण आपापल्या चित्रपटविषयक भूमिकेचे समर्थन करत होता. मृणाल सेन, श्लॉलनड्रॉफ-

सारखे दिग्दर्शक चित्रपटांतून राजकीय चळवळी चितारण्याची आवश्यकता व्यक्त करत होते, तर काही करमणूक, फॅन्टसी हेच चित्रपट करू शकतो हे सांगत होते. 'मला जे काही वाटतं, जाणवतं ते मी चित्रपटांतून व्यक्त करतो, मात्र 'मेसेज' देणे हे माझं काम नाही.' असं मानणारे ओशिमासारखे दिग्दर्शकही होते तर लोकांना मोलाची शिकवण देण्यासाठी त्यांच्यात बदल घडवून आणण्याचे चित्रपट हे हुकमी अस्त्र आहे. असे मानणारे आफ्रिकन दिग्दर्शकही होते.



आपल्या नातवाला जिद्दीने शिकवणारी म्हातारी – 'रुई केसस् निगर्स' या चित्रपटात

## आफ्रिकन विभाग

दोन सिनेमांच्या त्या छोटयाशा इंटर–व्हलमध्ये ही चर्चा, मतभेद व्यक्त केले जात होते, तर त्या पांढऱ्या पडद्यावर वेगळ्याच कथा आणि व्यथा आकारला येत होत्या. मात्र अमेरिका व इतर युरोपियन राष्ट्रांचेच वर्चस्व असलेल्या या सिनेमाच्या जगात आफ्रिकन सिनेमाने त्याच्या साधेपणामुळे, लक्ष वेधून घेतले खरं तर या 'फिलमोत्सवा'त ती एक महत्त्वाची जमेची बाजू ठरली.

बारा आफ्रिकन देशांचे सुमारे २५ चित्रपट या विभागात दाखविण्यात आले. आफ्रिकन खंडातील ४३ देशांपैकी चार देशातच काही प्रमाणात लोकशाही आहे. बाकी सर्वच ठिकाणी बडया राष्ट्रांची 'प्यादी' आहेत. काही ठिकाणी अद्याप फ्रेंच वसाहती आहेत, तर काही देश लष्करी अंमलाखाली आहेत. अर्थिकदृष्टया 'मागास' ठरविलेल्या या देशांमध्ये समृद्ध निसर्ग आहे; पण त्या निसर्गाशी एकरूप झालेली तेथील कृष्णवर्णीय माणूस अडाणी, अज्ञानी, अंधश्रद्ध आहे आणि याचा गैरफायदा घेऊन त्याच्यावर अन्याय करणारे अनेक आहेत. एकीकडून वंशवादी वागणूक तर दुसरीकडून त्याच्या विकासाची अडवणूक चालू आहे. पिळवणूक शोषण तर आहेच; पण त्याचा विरोधही दडपला जात आहे. अशा परिस्थितीतही गेल्या काही वर्षात तो सामूहिकरीत्या विरोध करू लागला आहे. काही प्रमाणात स्वतंत्र होऊ लागला आहे.

गेल्या वीस वर्षातील या निवडक मोजक्या आफ्रिकन चित्रपटांतून ह्याच दबला गेलेला आफ्रिकन माणूस बोलता झाला आहे. त्याचे दुःख, दैना, असंतोष घेऊनच या चित्रपटांचा आशय आकारला जात आहे. त्यातील बऱ्याच चित्रपटांचे कथाविषय आपल्याकडच्या 'दलित–कथां'शी नातं सांगणाऱ्या आहेत.

'ला. मॅन्डेट' (मनीऑर्डर) हा सेनेगल या देशातील चित्रपट अगदी साध्या तशा किरकोळ वाटणाऱ्या समस्येभोवती गुंफलेला आहे. सेनेगलमधील दुर्गम प्रदेशातील एका खेडयातील इसमास अचानकपणे पॅरिसमधील त्याच्या एका नातेवाइकाकडून बऱ्याच मोठया रकमेची मनीऑर्डर येते. दोन बायका, चार–पाच मुले अशी खाणारी तोंडे अनेक असलेल्या या गरीब कुटुंबाला दिलासा मिळतो; पण ती मनीऑर्डर वटवण्यासाठी तो पोस्टात जातो आणि आय–कार्ड, जन्म दाखला अशी त्याच्याकडे नसलेल्या गोष्टींची मागणी सुरू होते. त्या गोष्टी मिळविण्यासाठी तो जिवाचे रान करतो; पण पदोपदी 'तांत्रिक' कारण दाखवून त्याची अडवणूक केली जाते. यातच मनिऑर्डर वटल्याची अफवा पसरते आणि त्याचे देणेकरी, नातेवाईक व इतर गरीब शेजारी त्याच्या घरातील उरलं–सुरलं ओरबाडण्याचा प्रयत्न करतात. अखेर एक श्रीमंत गृहस्थ त्याची मनीऑर्डर वटवितो; पण रस्त्यात आपला खिसा कापला असे कारण सांगून पाच–दहा पायली तांदूळ देऊन त्याची बोळवण लावतो.

'ला मॅन्डेट' गरीब आफ्रिकनांच्या अडाणीपणाचा, क्लिष्ट सरकारी कायदे–कानूनमुळे कसा गैर फायदा घेतला जातो याचे अत्यंत सुगम चित्रण करतो तर 'काट्टू बोकत' (गावाकडून आलेले पत्र) हा साफी फाये या स्त्री–दिग्दर्शिकेचा सेनेगलचाच चित्रपट एका गावातील शेती–समस्या मांडतो. शेतीबाबतचे सरकारी धोरण शेतीवर उपजीविका करणाऱ्या कुटुंबांना कसे मारक ठरत आहे. याचे चित्रण हा चित्रपट करतो. अगदी 'ला मॅन्डेट'च्या उस्मान सेम्बेने या दिग्दर्शकाच्या सुगम शैलीशी इमान राखून !

दैनंदिन रोजचे जगण्याचे प्रश्न, त्यातील असह्य यातना आणि त्यातही ते जगणं सुसह्य करण्यासाठी चाललेली धडपड हाच अगदी सामान्य आफ्रिकनांच्या जीवनाचा धागा पकडणारे काही चित्रपट होते– मग त्यात उसाच्या मळ्यात दिवस–रात्र काबाडकष्ट करून आपल्या मुलाला शिकवणारी, त्यानं मोठं व्हावं, निदान आपल्यासारखं भयाण जगू नये अशी किमान माफक अपेक्षा बाळगणारी जिद्दी आई होती तर शिकनही आपल्याला वाव, संधी मिळत नाही, ती नाकारली जात आहे, त्यामुळे गुन्हेगारीकडे वळलेला सुशिक्षित तरुणही यातील काही चित्रपटांत दिसतो.

## सांस्कृतिक वसाहतवादाला टक्कर

याशिवाय आपल गाव सोडून जगायला निघालेल्या स्थलातरिताचे कष्टदायक जीवन बऱ्याच चित्रपटातून पाहायला मिळाले, तर 'हार्व्हेस्ट-थ्री थाउजड इयर्स' यासारख्या चित्रपटातून सर्वार्थाने प्रतिकूल परिस्थितीत आपल्या अस्तित्वासाठी झगडणारे शेतकरी कुटुबं दिसते अमेरिकन, फ्रेंच साम्राज्यवाद्याविरुद्ध असंतोष, निषेध दिसतो तसेच स्वकीयामधील जुलमी सरकारविरुद्ध राजकीय चळवळीही या चित्रपटात दिसतात. त्यातील पॉलीन व्हिरे या दिग्दर्शकाचा 'एन रेसिडन्स सर्व्हेली' (नजरकैद) हा सेनेगलचा चित्रपट परिणामकारक ,वाटला. सेनेगलमधील लोकाचे भले कशात आहे हे सागणाऱ्या एका पुस्तकाच्या प्रकाशनावर बदी घालण्याच्या प्रश्नावरून तेथील राजकीय वातावरण तापत. भाववाढ, दारिद्रच यानी अगोदरच हैराण असलेल्या जनतेला विरोधक् या प्रश्नावरून भडकवतात. हा गदारोळ आटोक्यात आणण्यासाठी राष्ट्राध्यक्ष प्रथम चौकशीसमिती नेमतो आणि नतर या समितीचा स्वत.च अध्यक्ष बनून विरोधकाना नेस्तनाबूत करण्याचा आपला कट यशस्वी करतो. हे सर्व डावपेच तो अमेरिकन वकिलातीच्या प्रमुखाच्या सल्ल्याने घडवून आणतो.

आर्थिक पाठिंब्याचे आमिष दाखवून अमेरिका आपल्या हाताच्या बोटाच्या इशाऱ्यावर नाचणारे आफ्रिकी राष्ट्रातील सरकार कसे टिकविते किंवा उलथविते याचा जिवंत नमुना म्हणजे हा चित्रपट. याच चित्रपटात विरोधी पक्षाचा नेता अमेरिकन वकिलातीत आश्रय घेतो. तेव्हा त्याला पकडण्यासाठी गृहमंत्री परराष्ट्रमंत्र्याला पुढची कारवाई करण्यास सागतो. त्यावर परराष्ट्रमंत्री आपली असमर्थतता व्यक्त करताना म्हणतो, 'वकिलातच जर नेता ताब्यात देण्यास नकार देत असेल तर माझ्या हातात तरी काय आहे? आणि जर मी कडक कारवाई केली तर अमेरिकन कंपन्या आपले उद्योगधंदे बंद करतील– त्यातून बेकारी निर्माण होऊन हा असतोष अधिक धुमसेल– तेव्हा तूर्त थावा!'

केवळ समकालीन राजकारण नाही तर इस्लाम व ख्रिश्चन धर्माविरुद्धही हा चित्रपट बोलतो. कोगो या देशाच्या 'ला चॅपेल'- (ख्रिस्ती प्रार्थनामंदिर) मध्ये ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या विस्तारवादाला स्थानिक गावकऱ्यानी केलेला अयशस्वी विरोध दाखवला तर 'अन् होमे देस फेमेज' (एक पुरुष अनेक स्त्रिया) बेन दिवाये बेये या दिग्दर्शकाने इस्लाममधील बहुपत्नीकत्वाच्या चालीवर आघात केला आहे. 'बुश मामा' या आणखी एका चित्रपटात हॅले गरीमा या दिग्दर्शकाने अमेरिकेतील कृष्णवर्णीयाचा मानाने, प्रतिष्ठेने जगण्याचा आसक्ती दाखविली आहे. याची नायिका डोरोथी ही एक कृष्णवर्णीय स्त्री आहे तिचा नवरा न केलेल्या गुन्ह्याच्या आरोपावरून तुरुंगात असतो. समाजकार्य करणारी ही नायिका 'माणूस' म्हणून मानाने जगण्यासाठी प्रयत्नाची शिकस्त करत असते.


आफ्रिकन चित्रपटात विषयाचे असे वैविध्य आढळले तर चित्रपटशैलीच्या संदर्भात त्यात काही जुजबी, किरकोळ प्रयत्न दिसले. बाकी सर्वच चित्रपटाची लय सथ होती. काहीशा 'साहित्यिक' वळणाचा हा 'ऑथर सिनेमा' वाटला. तसे या सिनेमाचे हे वैशिष्टय. जसा कादंबरीकार एखाद्या घटनेचे वर्णन करतो तशी दृश्यरचना या चित्रपटात आढळली. 'द पोर्टर' या माली देशाच्या चित्रपटात तर सुरुवातीची तीस मिनिटे केवळ वर्णनच दृश्यरूपात पाहायला मिळते. त्यामुळे ते कंटाळवाणे, नीरस वाटते. एखाद्या कथेसारखा चित्रपट घडत जातो, एखाद्या वेळी फुलत जातो; पण त्याचे पटकथेत (Screen-play) रूपातर करण्याचे कसब दिसत नाही. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या या चित्रपटात कोणतीच सफाई आढळत नाही. सकलन, छायाचित्रण, रंग याबाबत हे चित्रपट ओबड-धोबड वाटतात. केवळ कथाविषयातील, आशयातील चैतन्य आपल्याला खुर्चीला खिळवून ठेवते बेन बर्का या दिग्दर्शकाचा 'वन थाउज्ड वन हॅन्ड्स' या एकमेव चित्रटात चित्रपटशैलीतील प्रयोगशीलता दिसते. पिअर्लो पॅव्लो पंसोलिनी या मातब्बर इटालियन दिग्दर्शकाच्या हाताखाली शिक्षण घेतलेल्या बर्का यांच्या या चित्रपटाची कथा एका गरीब विणकर कुटुबाचे दुःख रगवते. तशी या चित्रपटाची लय संथच आहे; पण बर्का यानी यातील रगच बोलके केले आहेत. विविध रगाचे, अनेकविध छटांचे सूत काढणाऱ्या या कुटुबाचे जीवन मात्र रंगहीन असते आणि हाच विरोधाभास बर्का यानी चित्रकाराच्या नजरेतून सिनेमात पकडला आहे त्या विणकराच्या भावना, त्याच्यावरील अन्याय सारं काही शब्दाऐवजी या रंगांतून व्यक्त होतं. मात्र हा एकमेव अपवाद वगळता इतर आफ्रिकन सिनेमात ही प्रयोगशीलता दिसत नाही. अर्थातच अमेरिकन, युरोपियन आणि बऱ्याच प्रमाणात भारतीय व्यापारी सिनेमाच्या 'सास्कृतिक वसाहतवादाला' टक्कर देत हा सिनेमा उभा राहात, तग धरत आहे. तेव्हा 'सहानुभूतीने'च या सिनेमाचे स्वागत करणे आवश्यक आहे.

¤

## अमेरिकन 'भूलभुलैय्या'

आफ्रिकन चित्रपटाच्या अगदी उलट परिस्थिती फिलमोत्सवात दाखल झालेल्या सुमारे वीसएक अमेरिकन चित्रपटाची होती. तंत्रदृष्ट्या 'अवाक' करणारे हे चित्रपट आशयदृष्ट्या मात्र निकृष्ट होते. अर्थातच अमर्याद सुबत्ता आणि समृद्धीने अत गाठलेले अमेरिकन सामाजिक जीवन या चित्रपटात फारसे दिसले नाही–किंवा कदाचित सामाजिक, राजकीय प्रश्नापेक्षा आर्किक्ट, अटार्क्टिकासारख्या दुर्गम प्रदेशाच्या (नेव्हर क्राय वुल्फ) व अतराळातील साहस-सफरीकडे (रिटर्न ऑफ द जेडी) अमेरिकन मनाचा अधिक ओढा दिसत आहे. तात्कालीन, समकालीन प्रश्नापेक्षा एखाद्या हॉलिवुडच्या जुन्या तारकेचा शोकात्म 'नास्ट्लेजिया'त (फ्रान्सेस) त्याचे मन रममाण होताना दिसते.

पॅरॉ सायकॉलॉजी, अतराळातील कल्पनाविश्व, सायन्स-फिक्शन अशासारख्या विषयाभोवतीच हे चित्रपट फेर धरताना दिसत आहेत. मायकेल लॉगलिन या दिग्दर्शकाने १९५० मधील उडत्या तबकड्या ज्या शहरात आल्या असा समज आहे त्याचे गूढ उलगडण्याचा प्रयत्न 'स्ट्रेंज इन्व्हेडर्स' या चित्रपटात केला आहे तर 'द सेडर'-मध्ये पॅरॉ सायकॉलॉजीमागच्या कारणाचा शोध घेतला आहे. असे विषयातले नाविन्य दिसते, खोलवर परिणाम करणारे तत्र दिसते; पण हे सर्वच चित्रपट म्हणजे

'झेलिग' – अमेरिकेतील आख्यायिका; पण वुडी अॅलनने मात्र 'डॉक्युमेंटरी' शैलीत त्याचा झकास विडंबनपट बनविला आहे. हा चित्रपट म्हणजे अगदी १९२०–३० सालची डॉक्युमेंटरी वाटते. त्यात हिटलर, चॅप्लिन सारेचजण दिसतात. त्यातल्याच एका दृश्यात त्या काळच्या दोन नामवंतांबरोबर वुडी अॅलन ऊर्फ झेलिग.

एखाद्या कसबी जादूगाराचे प्रयोग वाटतात. स्वतःच आधी एक भास निर्माण करायचा आणि तो फक्त एक आभास होता, असे स्वतःच अगोदर ठरविलेले उत्तर सांगायचे. हाच प्रकार या अतर्क्य कल्पनापटात दिसतो. कल्पनेची भरारी दिसते; पण त्याला अनुभवाची जोड दिसत नाही. 'भुलभुलैय्या' फिरून आल्यावर 'अहाहा' करावे असे हे चित्रपट !

पण त्यातही वुडी अॅलनचा 'झेलिग' आणि गॉडफ्रे रिगीचा 'कोयानक्विस्ती' हे दोन चित्रपट मला आवडले आणि परिणामकारकही वाटले. 'अमेरिकन समाजाची मानसिकता' पूर्णतः समजलेला व 'कॉमिक जिनियस' म्हणून वुडी अॅलन हा दिग्दर्शक गणला जातो. त्याने 'झेलिग'-मध्ये अमेरिकनांची शोमनशिप, काही तरी चमत्कारिक गोष्टीकडे वेडयासारखे मागे लागण्याची सवय, त्यांचा क्रेझीपणा या साऱ्या खास अमेरिकन वैशिष्टयांवर आपल्या उपहास-गर्भ शैलीत पण हसत-खेळत बोचकारे घेतले आहेत.

१९२०–३० मधील 'झेलिग' ही आख्यायिका. मानसिकदृष्टया कमकुवत व न्यूरॉटिक असलेले हा 'झेलिग' आपली व्यक्तिमत्त्वे बदलण्यात पटाईत असतो. अगदी शरीरयष्टी, चेहरा सारं काही तो बदलू शकतो. कधी तो जर्मन दिसतो, तर कधी ग्रीक. त्याला 'सर्वसाधारण' माणूस बनविण्याचे प्रयत्न एका मानसोपचारतज्ज्ञाकडून चालू असतात. तिच्या मते तो मानसिक रोगी असतो. अखेर ती यशस्वी होते आणि ते दोघे लग्न करतात; पण 'झेलिग'भोवतीचे वलय अमेरिकन लोकांना कसे क्रेझी करते हा अॅलनचा विषय. अॅलनने संपूर्ण चित्रपट त्या काळच्या वृत्तचित्राप्रमाणे कृष्ण-धवल रंगात घेतला आहे आणि त्याबाबतच्या काही विशेषज्ञांच्या प्रतिक्रिया रंगीत ठेवल्या आहेत. संपूर्ण चित्रपट आणि चित्रपटशैली म्हणूनही हास्याची कारंजी उडविणाराच आहे.

तर 'कोयानक्विस्ती' हा चित्रपट कथा, संवाद, पात्रविरहित आहे. केवळ दृश्यांनी व पार्श्वसंगीतानेच हा चित्रपट बोलतो. चित्रपट-तंत्रात 'कटिंग इन कॅमेरा' म्हणतात, त्याचा हा प्रकार म्हणजे अत्युच्च अवस्था आहे. 'स्लो मोशन', 'फास्ट मोशन' याच्या साहाय्याने अमेरिकन औद्योगिक जीवनातील यंत्रवतपणा, निर्जीवपणा या दृश्यातून प्रतीत होतो.

'फिल्मोत्सवा'त जसे अमेरिकन चित्रपटांचे प्रावल्य होते तसे इतर कोणत्याही देशांचे नव्हते. जपान, जर्मनी व फ्रान्स या देशांचे थोडेफार होते; पण चित्रपट-कला म्हणजे त्या त्या देशाची मानसिकता प्रतिबिंबित करणारा आरसा असे मानले तर सर्वसामान्य, प्रातिनिधिक असे निष्कर्ष काढण्याइतपत चित्रपट हरएक देशाचे नव्हते. त्यामुळे थोडेफार या चित्रपटांतून त्या त्या देशात डोकावता आले इतकेच.

रशिया व चीनचे सात–आठ चित्रपट या महोत्सवात दाखविण्यात आले. त्यातील दोन–तीन चित्रपटांचा अपवाद वगळता इतर चित्रपट क्रांतिपूर्व परिस्थितीवरच बेतलेले होते. त्यातील रशियन चित्रपटात अद्यापही 'ऑक्टोबर क्रांती'च चालू असल्याचे दिसते. सर्जी बाँदरचूक यांचा 'आय हॅव सीन द बर्थ ऑफ न्यू वर्ल्ड' हा जॉन रीड यांच्या 'टेन डेज दॅट शुक द वर्ल्ड' या गाजलेल्या कादंबरीवरील चित्रपट फारच असमाधानकारक होता. तो विषयामुळे नव्हे तर 'डाक्युमेंटरी' स्टाइलच्या अत्यंत संथ हाताळणीमुळे. त्यापेक्षा 'ऑक्टोबर क्रांती'च्या पार्श्वभूमीवर जॅक रीड आणि लुई ब्रॅन्ट यांची अडथळ्यांची प्रेमकथा चितारणारा 'रेडस्' हा वारेन बेट्टीचा अमेरिकन चित्रपट अधिक समाधानकारक होता. मॅक्झीम गॉर्की यांच्या कथेवर आधारित 'व्हासा' हा रशियन चित्रपट १९१३ च्या पार्श्वभूमीवरील वर्गकलह दाखवितो. व्हासा ही एक घरंदाज कर्तबगार स्त्री. नवऱ्याच्या व्यसनीपणाचे



**'बॅलड ऑफ नारायमा' या जपानी चित्रपटात – गावाच्या रीतीला अनुसरून मृत्यूला सामोरी जाणारी कणखर म्हातारी (सुमिको साकामोटो) व तिचा मुलगा (केन ओगटा)**

¤

समर्थन करीत आपल्या उद्योगधंद्याचा पसारा सांभाळत असते. नवऱ्यावर एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याचा आरोप असतो तर मुलगा क्रांतीकारी मुलीशी विवाह करतो. हे सारे तिला तीरस्कारणीय असते. अशातच तीला मृत्यू येतो आणि प्रतिकात्मकरित्या घराणे शाही संपुष्टात येते. ग्लेब पॅनक्लीव यांनी कथेचा काळ आणि स्वभाव लक्षात घेऊन काहीशा संथ गतीने पण सुंदर, मांडला आहे. 'इन लव्ह अॅट हिज ओन चॉइस' हा मात्र निखळ विनोदी चित्रपट हसवून गेला.

रशियाची ही अवस्था तर चीनचा 'रिक्षा बॉय' हा तद्दन हिंदी चित्रपटासारखा होता. तर 'माय मेमरिज वुईथ विजिंग' हा एका स्त्रीचा पन्नास वर्षापूर्वीचा 'नॉस्टॅलजिया' दाखविणारा चित्रपट काहीसा गुंगवणारा होता या दोन्ही चित्रपटांची पार्श्वभूमी क्रांतीपूर्व परिस्थितीवर आधारलेली होती तर 'सनसेट स्ट्रीट' याच चित्रपटाला काय ती सध्याची पार्श्वभूमी होती, त्यात सर्वसामान्य चीन्यांचे जगणे 'ऑफिशिअली' कसे आहे ते दिसले. एकंदरीतच रशिया चीनच्या बंदीस्त समाजात चित्रपटातून डोकावणे जरा अवघडच दिसते.

## कलात्मकतेची शिखरे

मात्र जपान, जर्मनी व फ्रान्स या देशांनी पाठविलेल्या चित्रपटांनीच 'फिल्मोत्सवा'ला खरी शोभा आणली. त्याची गुणवत्ता वाढविली. जपानचा 'मेरी ख्रिसमस मि. लारेन्स' (नागासी ओशीमा) आणि 'द बॅलड ऑफ नारायमा' (योशिओ इमामुरा) फ्रान्सचे 'दाँतों' व 'लव्ह इन जर्मनी' (आंद्रे वाज्दा); 'प्रेनॉम कार्मेन' (ज्यू लू गोदार्द); 'हॅना के' (कॉस्टा गव्हारस) तर जर्मनीचे 'इम्पॅरेटिव्ह' (ख्रिसफोल्ड झानुसी) 'सर्कल ऑफ डिसिट्' (व्हॉलकर श्लोलनड्रॉफ) व 'लेवर ऑफ लव्ह' (मारग्रेट व्होन प्रोथा) याच चित्रपटांनी फिल्मोत्सवाला भारदस्तपणा आणला. तर फिनलंडच्या 'द बिग ब्लॉन्ड'ने ग्लॅमर आणले. तर अमेरिकेच्या 'द डे आफ्टर'ने प्रेक्षकांना तासन् तास रांगेत उभे केले शिवाय इग्मार बर्गमन या स्वीडिश दिग्दर्शकाचे 'क्राईज अॅन्ड व्हिस्पर्स' व 'फॅनी अॅन्ड अॅलेक्झांडर' हे दोन भरीव चित्रपट. 'फिल्मोत्सवा'च्या प्रयोगशील–तेची, कलात्मकतेची व लोकप्रियतेची ही शिखरे !

परस्परांशी तुलना करणे अशक्य इतके स्वयंभू व स्वतंत्र शैलीचे हे दिग्दर्शक. त्यातला गोदार्द म्हणजे सिनेमामाध्यमाशीच झटापट करीत, त्याच्या क्षमतेशी झुंज देत, कोणत्याही कथेचा बुरखा न घेता जे वाटतं ते थोडक्यात, मुद्देसुदपणे पण काहीसं अमूर्त पातळींवर सांगणारा दिग्दर्शक. आपल्या सभोवतालच्या समाजाची व या अनोख्या माध्यमाची नस सापडलेला हा दिग्दर्शक त्याच्या चित्रपटाच्या हरएक 'फ्रेम'मधून प्रेक्षकांवर आघात करतो. पाश्चिमात्य समाजात सुबत्तेतून आलेले नैतिक अधःपतन तथाकथित बुद्धीवादीपणा, त्यातील हिंसा, क्रौर्य, घृणा, मानसिक व लैंगीक विकृती, अंतर्बाह्य विस्कटलेला या समाजाची 'वीकएन्ड' सारखी 'आधुनिक शोकांतिका' बनविणाऱ्या या दिग्दर्शकात अलीकडे मोठा बदल झाला आहे. त्याच्या अलीकडच्या चित्रपटात त्यांच्या अंतर्मनात फ्रान्समधील सद्यः स्थितीबाबत दडलेला तिरस्कार, असंतोष, उद्वेग, राग–लोभ तो मुक्तपणे व्यक्त करू लागला आहे. त्याच्या सखोल जाणिवा, नेमक्या प्रश्नावर आघात करत आहेत.

## गोदार्दची किमया

'प्रेनॉम कार्मेन'ला कथा नाही. 'कार्मेन' या देखण्या स्त्रीच्या परिचित शोकांतिकेशी समांतर जाणारे सांगितिक व्हायोलिनवादकाचा संच तयार करीत असतो आणि या व्हायोलिनचे परिणामकारक सूर घेऊनच गोदार्द फ्रान्समधील युवा पिढीच्या जगण्यावर 'कॉमेन्ट' करत जातो. संगीतदिग्दर्शक 'व्हायलंट मूड' निर्माण करण्यास सांगतो, तसे तो 'मूड' पकडून चित्रपटात हिंसेची दृश्ये येतात. तो 'हार्मनी' सांगतो, तशी प्रेम–प्रकरणाची दृश्ये येतात. पुन्हा हेही एका लयीत नाही. कधी तुटकपणे, कधी अनपेक्षितपणे होत राहतं. यातील हिंसेच्या दृष्यात काही तरुणांनी बँक ताब्यात घेतली आहे. गोळ्यांचा वर्षाव चालू आहे. काही मुडदे पडत आहेत; पण हे सर्व चालू असतानाही तेथेच काही थंड डोक्याची माणसं पेपर वाचण्यात गुंग आहेत. कायद्याविरुद्ध असलेल्या आपल्या प्रमुख व्यक्तिरेखा मात्र आता 'युद्ध' थांबवून 'प्रेम' करण्याचा निर्णय घेतात. तर बँकेची साफसफाई करणारी बाई त्या मुडद्याकडे दुर्लक्ष करून केवळ जमिनीवर सांडलेले रक्त पुसून जात आहे... इथेच त्यातील एक तरुणी चित्रपटाची नायिका एका तरुणाला म्हणते, 'स्त्री पुरु-

षाला काय करू शकते हे मी तुला दाखविणार आहे.' गोदार्दचा उपरोध, उपहास असा बोचणारा आहे. पुढे अशाच अनेक ' इमेजस् 'मधून गोदार्द फ्रेंच युवकाचा उसना हुरूप, त्याची भावविवशता, त्याला जाणविणारी पोकळी आणि त्याचा वांझपणा यावर मर्मभेदक टीका करतो. अधून–मधून स्वत: गोदार्दही या चित्रपटात दिसतो आणि काही नेमकी, बुद्धिगम्य वाक्येही फेकतो. ' There are two types of people one are innocent & others guilty & no where in world innocents are ruling ' हेच दृश्यरूपात दाखवितो आणि ती दृश्येही बोलकी, जिवत असतात. व्हायोलिनचे सूर आपल्याला गुंतवतात तर अचानक येणारी ' शांतता ' आपल्याला चिरत जाते. ' फ्रेम बाय फ्रेम ' गोदार्द ही किमया करतो.

पाश्चिमात्य युवकांपुढील जगण्याविषयीची पोकळी गोदार्द दाखवितो तर झानुसीच्या ' इम्पेरेटिव्ह ' मधील नास्तिक तरुण नायक अंतिम सत्याच्याच शोधात निघतो. गणिततज्ज्ञ असलेला हा तरुण जीवन, मृत्यु, देव अशा मानवी बुद्धीला सतत सतावणाऱ्या प्रश्नांबाबतच विचार करत असतो· त्यावरच चर्चा करत देवाच्या अस्तित्वाची साशंकतेने चौकशी करत असतो. चिरंतन मूल्याच्या शोधात निघालेल्या या तरुणाला आपलं नास्तिकपण खुपतं. कुठं तरी हा शून्यवादही त्याला अपुरा वाटू लागतो. तो मानसशास्त्रज्ञाकडे जातो. धर्मगुरूकडे जातो; पण या कालातीत प्रश्नांना कुठेच उत्तरे नसतात. तो पुन्हा भौतिक व अध्यात्मिक वास्तवाच्या मूळ फरकापाशी येऊन ठेपतो. अशा तात्त्विक विषयाची मांडणी झानुसी हा पोलिश दिग्दर्शक अत्यंत विश्वासार्ह करतो.



इग्मार बर्गमन या प्रतिभावान स्वीडिश दिग्दर्शकाचा अखेरचा चित्रपट – ' फॅनी अँड अॅलेक्झांडर ' त्यात पर्निला आल्विन आणि 'बर्टिल गुव्हे हे दोघे बालकलाकार

## डोंगरी गावाचे व्यक्ति चित्र

जपानचा ' बॅलड ऑफ नारायमा ' शंभर वर्षे मागे नेतो. दुर्गम प्रदेशातील नारायमा या डोंगराच्या कुशीत विसावलेल्या आधिभौतिक, भावनाशून्य अशा १८८० मधील डोंगरी लोकांचे व्यक्तिचित्र इमामुरा या दिग्दर्शकाने येथे रेखाटले आहे. खायची भ्रांत असलेल्या या खेड्यात माणूस वृद्ध झाला की, त्याला ' नारायमा ' च्या शिखरावर सोडून देण्याचा रिवाज असतो. या चित्राची सत्तर वर्षांची नायिका ओरिन हा प्रवास कणखरपणे, धैर्याने स्वीकारते. अर्थातच या प्रवासापूर्वी इमामुरा त्या गावातील जगण्याचा संघर्ष किती हिंस्त्र व तीव्र असतो याचे विदारक चित्रण करतात. निसर्ग, प्राणी व मानवी जीवन यात मूलभूत फरक नसल्याचेच इमामुरा या गावच्या दैनंदिन व्यवहारातून दाखवितात, तर लैंगिक संबंध,– हे भुकेइतकेच क्षुल्लक आहेत, त्यात नैतिकता कसली ? प्राण्यांसारखाच तोही एक शरीरसंबंध ! हे इमामुरा यातील स्त्री–पुरुषसंबंधाच्या दृश्यांना पूरक अशी प्राण्यांच्या लैंगिक संबंधाची दृश्ये दाखवून स्पष्ट करतात. इमामुरांची कल्पकता मांडणीपेक्षा ते गाव, त्याचा तो निसर्ग उभा करण्यात दिसते. ' दंतकथा ' च असल्यापुळे त्याच्या सैलपणाबद्दल फारशी टीका करणंही अवघड आहे.

यंदाच्या महोत्सवाचा शोध म्हणजे व्हॉल्कर श्लॉलनड्रॉफ हा जर्मन दिग्दर्शक ! या फासबिंडर व हेरझॉग या जर्मन दिग्दर्शकांच्या दाट सावलीत श्लॉलनड्रॉफ यंदाच नावारूपास आले. पिवळ्या वृत्तपत्रा-पत्राकडून सतावल्या जाणाऱ्या स्त्रीची कथा सांगणारा ' द लॉस्ट ऑनर ऑफ कॅथरिना ब्लम ' बैरूतमधील पलेस्टिनियन समस्येभोवती गुंफलेला आणि तेथील जर्मन पत्रकाराची द्विधा मनस्थिती प्रकट करणारा ' सर्कल ऑफ डिसिट् ' हे त्यांचे चित्रपट विशेष गाजले. त्याबाबत गेल्या अंकात सविस्तर दिले आहे, त्यामुळे पुनरुक्ती टाळतो. त्यांची पत्नी मारग्रेट व्होन त्रोथा यांचा ' लेबर ऑफ लव्ह ' हा चित्रपट युरोपियन स्त्रीच्या मुक्तीचा पुरस्कार करतो· यंदाच्या महोत्सवातील अनेक चित्रपटातून आधुनिक स्त्रीपुढील समस्यांचा उहापोह केलेला आढळला. कधी ती ' सेक्स ' ऑब्जेक्ट (द विग् ब्लॉन्ड) म्हणून दिसली तर कधी ती वकील, मानसशास्त्रज्ञ, अशा क्षेत्रात हिरीरीने आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करताना दिसली. ' एडीथस् डायरी ' या चित्रपटात सुखी संसाराची, तसेच सुखी जगाची स्वप्ने बघणारी एडीथ सार्वजनिक जीवनात राजकीय बांधिलकी ठेवून लेख लिहिते तर खाजगी जीवनात डायरी लिहून. या दोन्ही ठिकाणी तिचे हत्यार असते तिची कल्पनाशक्ती; पण वास्तवतेपेक्षा कल्पनेतच रमणारी एडीथ



**सौंदर्य आणि अभिनय यांचा मनोरम मिलाफ झालेल्या हॅना श्यागुला या फ्रेंच अभिनेत्रीने ' फिल्मोत्सवा 'तील तीन चित्रपटांत सर्वांचेच लक्ष वेधून घेतले – ती ' लव्ह इन जर्मनी 'तील पोलिनाच्य भूमिकेत – चित्रपटातील हाच प्रसंग या दोघांच्या प्रेमाची शोकांतिका करतो.**

¤

ही कल्पनाचित्रे रंगविताना नियतीला वळी पडते.

### बर्गमनचे अबोल भाष्य

इग्मार बर्गमन या प्रतिभावंत स्वीडीश दिग्दर्शकाचा ' क्राईज अँड व्हिस्पर्स ' हा चित्रपट म्हणजे स्त्रीच्या व्यक्तीमत्वात खोल वर रूजलेल्या विविध मानसिक अवस्थाचे अनेक तुकडे. मानवी मनाच्या sub con-sious मध्ये डोकावून त्याचे खरे–खुरे व्यक्तिमत्त्व उसवत नेणारी बर्गमनची शैली या चित्रपटात देखण्या, अंतर्मुख करणाऱ्या रंगांतून बोलते. तीन बहिणींमध्ये ही कथा आकाराला येते. त्यातली अॅग्नेस ही मोठी बहीण आजारी पडते तेव्हा ती आपल्या करीन आणि मारीया या दोघी बहिणींना जुन्या घरी राहावयास बोलावते. स्तब्धतेला तडा जातो, शांतता भंग पावते.

ती आजारी बहीण आपल्या आईच्या आठवणी काढते. त्या स्मृती काही प्रमाणात प्रेमाचा ओलावा घेऊन येतात, तसेच त्या तिघीतील राग, लोभ, मत्सर, द्वेष, तिटकरा व्यक्त होतो– तो प्रथम मनावर ठसतो; पण या भावनांआड प्रेमाचे पाझर फुटले असल्याचे लक्षात येते. त्यातच एकीचे प्रेम प्रकरण सुरू होते तर दुसरीच्या आठवणी आपल्याला शिसारी आणतात.तर अॅग्नेस आजारपणात मृत्यू पावते. पुन्हा ती विषण्ण करणारी शांतता...कधीकधी त्या स्तब्धतेतच सुख लपलेले असते ते फक्त जाणवावे लागते. बर्गमन हेच या ' मानसिक प्रदूषणा'तून लालकाळ्या रंगांच्या छटांतून व्यक्त करतो. स्वेन नायविस्टचा कॅमेरा बर्गमनची ही विलक्षण शांतता बोलकी करतो.तर लिव्ह उलमन व इनग्रीड थुलीन या कुशल अभिनेत्री त्यातील व्यक्तिमत्त्वे बोलकी करतात.

' फॅनी अँड अॅलेक्झांडर ' हा बर्गमनच्या चित्रपटनिवृत्तीपूर्वीचा अखेरचा चित्रपट. त्याच्या आतापर्यंतच्या अस्मानी चित्रकारकीर्दीत शिरपेच रोवणारा. एकदाल कुटुंबाच्या आयुष्यातील एक वर्षाची कहाणी सांगतो हुकुमशाही प्रवृत्तीच्या आपल्या सावत्र बापाशी अॅलेक्झांडर या दहा वर्षाच्या मुलाने दिलेली कडवी झुंज हा या चित्रपटाच विषय. या निष्पाप, मनस्वी आणि तीव्र भावनाशील मुलाच्या मनोवृत्तीचे संक्रमण बर्गमन विलक्षण प्रभावाने उभे करतो. बर्गमन तत्त्वात, देखण्या शब्दात रेंगाळत नाही तर या छोटया मुलाच्या दृष्टीतूनच तो या संघर्षाकडे पाहतो आणि अबोल भाष्य करतो.

आंद्रे वाज्दाचा ' लव्ह इन जर्मनी ' व ओशिमाचा ' मेरी ख्रिसमस मि. लॉरेन्स ' हे दोन्ही चित्रपट दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवरचे आहेत. दुसऱ्या महायुद्धाने रशिया जपानसह युरोपियन समाजावर किती खोलवर जखमा केल्या आहेत त्याचे प्रत्यंतरच या ' फिल्मोत्सवा 'त येते. या दोन चित्रपटांसह ' फिल्मोत्सवा 'त दाखल झालेल्या अनेक चित्रपटांची कथानके दुसऱ्या महायुद्धाच्या रणांगणावरच आकाराला येतात. त्यातून या युद्धाच्या जखमा अद्यापही ओल्या असल्याची साक्ष पटते.

या युद्धाच्या फुफाटयात आणि जर्मनांच्य अहंकारामुळे एक जर्मन स्त्री व पोलिश कैदी यांच्यातील निस्सीम प्रेमाचा शोकातम शेवट कसा हे वाज्दा 'लव्ह इन जर्मनी'त दाखवितो. जर्मनांचा स्वतःच्या वंशाबद्दलचा अहंकार, पोलिश लोकांबद्दलची त्यांची तिरस्करणीय वृत्ती हा चित्रपट दाखवितो. वाज्दा तो काळ, त्या काळातील बारीक–सारीक तपशील, प्रेमयुगलांचे परस्परांबद्दलचे, काहीसे शारीरिक आकर्षण अत्यंत वेगाने टिपत जातो, तर ' टर्निंग पॉइंट ' हा चित्रपट पोलिश तुरुंगात असलेल्या एका जर्मन कैद्याची कैफियत मांडतो. या जर्मन इसमास चुकून युद्धकैदी समजले जाते आणि त्याला आठ महिने तुरुंगवास भोगावा लागतो. तेच दिवस चित्रपटात येतात. ' ग्लुट ' या स्वित्झरलंडच्या चित्रपटात आणि ' अनदर टाइम अनदर प्लेस ' या ब्रिटनच्या चित्रपटातही युद्धकैद्यांचीच कथानके हाताळली आहेत. 'ग्लुट'मध्ये अना या पोलिश युद्धकैद्याच्या मुलीला स्वित्झरलंडमधून पळून जाण्यास तिचे समवयस्क मदत करतात. ती मुलगी ४० वर्षांनंतर पत्रकार म्हणून तिथे पुन्हा येते, तर त्यातीलच एक लष्करी अधिकारी बनलेला असतो. तर दुसऱ्या चित्रपटात तीन इटालियन युद्धकैद्यांना स्थानिक लोकांकडून मिळालेली वागणूक चित्रित केली आहे.


### युद्धाच्या आहुती

' मेरी ख्रिसमस मि. लॉरेन्स ' या चित्रपटालाही युद्धाचीच पार्श्वभूमी आहे. १९४२ चा काळ. इंडोनेशियातील तुरुंगात असलेल्या जपानी युद्धकैदी व लेफ्ट. कर्नल मि. लॉरेन्स हा त्याच तुरुंगातील युद्धकैदी यांच्यात हे नाटय घडते. हताश जपानी युद्धकैदी तुरुंगात खितपत पडण्यापेक्षा ' हाराकिरी ' पसंत करतात. ' हाराकिरी ' म्हणजे आत्महत्या ! तसा आत्मक्लेशाचाच मार्ग; पण त्याला

जपानी संस्कृतीचा वारसा, अधिष्ठान असते, मान्यता असते; पण मि. लॉरेन्सच्या दृष्टीने ती पळवाट असते. त्यामुळे मि. लॉरेन्स आपल्या सहकारी जपानी युद्धकैद्यांना 'हाराकिरी' पासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करत असतो. त्यातून संस्कृती, न्याय, नैतिकता या साऱ्यांचीच गुंतागुंत ओशिमा या चित्रपटातून व्यक्त करतात. जपानी इतिहासाकडे, सध्याची मानसिकता ओळखून समकालीन संदर्भात सम्यक दृष्टीने बघणारे ओशिमा यांनी काहीशा 'परकीय दृष्टिकोनातून' जपानच्या परंपरेकडे बघितले. मि. लॉरेन्सच्या आत्मचरित्रावर आधारित या चित्रपटात ओशिमांनी लॉरेन्सच्या नजरेतून 'जपानी संस्कृती'कडे बघितले आहे. याच तुरुंगात लेफ्टनंट कर्नल जेक्स केलियर्स येतो आणि ओशिमा यातील नाटच अधिक गुंतागुंतीचे करतात. युद्धाच्या क्रौर्याचे दाट सावट असताना तेथे प्रेमाचे पाझर फुटतात. सहृदयी लॉरेन्सचा आत्मविश्वास जपानी मनाच्या कडेकोट भिंतीसुद्धा सहज कुठे तरी हलवून सोडतो. अखेरच्या दृश्यातील लॉरेन्सचे आलिंगन मानवतेचा स्पर्श देऊन जाते.

केवळ दुसरे महायुद्धच नव्हे तर फिल्मोत्सवातील विविध देशांच्या चित्रपटांना त्यापूर्वी किंवा अलीकडेच घडलेल्या युद्धाची, गनीमी युद्धाची पार्श्वभूमी होती. रुमानियाच्या 'रिटर्न फ्रॉम हेल' व ब्रिटनच्या 'ॲसेडन्सी' या चित्रपटांना पहिल्या महायुद्धाची पार्श्वभूमी होती. 'ॲसेडन्सी'ची नायिका या पहिल्या महायुद्धातील आपल्या सैनिक-भावाच्या मृत्यूची जखम घेऊनच वावरत असते. त्यामुळे जगाशी तिचा संपर्कच तुटलेला असतो. तर ती ज्या शहरात राहते तेथे दंगल उसळते. त्या निमित्ताने ती बाहेरच्या जगाच्या संपर्कात येते. त्यातच तिचे एका सैनिकाशी प्रेम जमते. पुन्हा आणखी एका युद्धात ती सामील होते.

व्हिएटनामच्या 'अनकल्टिव्हेटेड लॅंड' हा चित्रपट व्हिएटनामी शेतकऱ्यांनी अमेरिकनांच्या तुफानी बॉंबहल्ल्याला दिलेल्या प्रतिकाराची शर्थ चित्रित करतो. त्यातील गोळीबाराच्या वर्षावातून सुटण्यासाठी जिवाच्या आकांताने आपल्या एक महिन्याच्या लहान मुलासह पळत सुटलेल्या जोडप्याचा प्रसंग डोळ्यात टचकन पाणी उभे करतो. याच युद्धाबद्दलचा असंतोष 'पर्पल हॅंझ' या अमेरिकन चित्रपटात विद्यार्थ्यांच्या विरोधी निदर्शनातून दिसतो; तर याच युद्धावरून आपल्या मायदेशी परतलेल्या कृष्णवर्णीय सैनिकाची वाहती जखम 'ॲशेस अँड एम्बर्स' या इथोपिअन चित्रपटात दिसते.



'फिल्मोत्सवा'तील आकर्षण ठरलेल्या 'मेरी क्रिसमस मि. लॉरेन्स'मधील नाट्यपूर्ण प्रसंगात डेव्हिड बोई व रुईची साकामाटो

¤

भारत-चीन युद्धाचे पडसाद श्रीलंकेच्या 'वन थाउजन्ड फ्लॉवर्स' या चित्रपटातील निर्वासित नायिकेच्या फ्लॅशबॅकमध्ये दिसतात, तर एक ब्रिटिश चित्रपट फॉकलंड युद्धाचा अनुभव कथन करतो. 'सर्कल ऑफ डिसिट' बैरूतमधील हत्याकांडाची भयानकता दाखवितो, तर 'हॅना के'सारखा चित्रपट पॅलेस्टिनियनांच्या हक्काबद्दल बोलतो.

पॅलेस्टिनी समस्येची पार्श्वभूमी असलेला 'हॅना के' हा कॉस्टा गव्हारस दिग्दर्शित चित्रपट त्यातील सूक्ष्म मांडणीमुळे चटकन नजरेत भरतो. इस्रायलमध्ये बेकायदेशीर प्रवेश केलेल्या सलीम बाक्री या संशयित दहशतवाद्याचा कोर्टात बचाव करण्याची पाळी स्वतंत्रपणे वकिली करणाऱ्या हॅना के या स्त्रीवर येते आणि ती त्या प्रकरणात इतकी गुंतत जाते. त्यातच मूळ ज्यू असलेली ही हॅना सरकारी वकील या नात्याने तिच्याशी प्रतिवाद करणाऱ्या जोशुआ हॉरझॉग याच्यापासून गरोदर असते. सलीम बाक्रीचे प्रकरण कोर्टात गाजत असतानाच हॅना बाळंत होते. ती आपल्या पहिल्या फ्रेंच नवऱ्याला बोलाविते. जोशुआशी मात्र तिची लग्न करण्याची इच्छा नसते. सलीम बाक्रीला ती घरात आसरा देते आणि जोशुआ व तिच्यातील तेढ अधिकच रुंदावते. अखेर जोशुआ सलीमला अटक करण्याचे कारण शोधतो. हॅना जोशुआकडे त्याच्याच आग्रहाखातर त्याचा मुलगा सोपवून त्याला घरातून हाकलून देते; पण इस्रायली सैनिकांच्या बंदुका ती दार उघडण्याची वाट बघत असतात.

वादग्रस्त राजकीय पार्श्वभूमी असलेला चित्रपट कॉस्टा गव्हारस यांनी त्यातील वैयक्तिक नात्यातील गुंतागुंतीने नाट्यपूर्ण केला आहे. काहीशी विनोदाची झालर देऊन त्यांनी ज्यूंच्या कडवेपणावर चांगलाच आघात केला आहे. जील क्लेबर्ग या अभिनेत्रीने साकार केलेली हॅना स्मरणात राहणारी आहे.

असे हे युद्धाच्या पार्श्वभूमीवरील चित्रपट. गोदार्दच्या उक्तीप्रमाणे या युद्धातील अपराधी निराळेच होते. बळी मात्र निरागस, भाबडे जीव पडत होते. साध्या-साध्या मानवी भावना, प्रेम, माणुसकी यांची आहुतीच या युद्धात पडत होती. त्या उध्वस्त मनांचा कोंडमाराच या दिग्दर्शकांना भावत होता.

'फिल्मोत्सवा'च्या पंधरा दिवसात अनेक वेळा त्या पांढऱ्या पडद्यावर या युद्धाच्या जखमा ओल्या असल्याचे दिसत होते, तर समारोपाच्या 'द डे आफ्टर' या चित्रपटाने अणुयुद्धाची भयानकता दाखविली, तर 'टॉकिंग हिस्टरी' या प्रदीर्घ लांबीच्या वृत्तचित्राने आतापर्यंतच्या युद्धातील प्रत्यक्ष चित्रित केलेली भयानकता दाखवून शांततेचा पुरस्कार केला.

'फिल्मोत्सवा'त ब्रिटनतर्फे दाखल करण्यात आलेले 'टॉकिंग हिस्टरी' हा एक तासाचा माहितीपट आहे. त्याचे दिग्दर्शक एच. ओ. नजारेथ यांनी हा संपूर्ण माहितीपट सी. एल. आर. जेम्स आणि इ.पी. थॉम्पसन

या दोघा मार्क्सवादी इतिहास–संशोधकांच्या चर्चेभोवती बांधला आहे या चर्चेत या दोघानी रशिया–अमेरिका या बड्या राष्ट्रातील शस्त्रास्त्र स्पर्धेपासून भारतासह अनेक अविकसित-विकसनशील देशातील दारिद्र्यापर्यंतच्या सर्व प्रश्नावर आपली मते माडली आहेत. नजीकच्या भविष्यकाळात जागतिक प्रश्नाचे स्वरूप कोणती कलाटणी घेईल याचे भाकीतही हे दोघे विद्वान आपल्या चर्चेतून करतात. मात्र ही चर्चा कटाळवाणी होऊ नये म्हणून या चर्चेचा युद्धविरोधी सूर पकडून नक्षारेथ याच्या कॅमेऱ्यातून गेल्या दोन महायुद्धातील, अगदी नागासाकी व हिरोशिमातील बॉबस्फोटापर्यंतची भयानकता दिसते. शिवाय युद्धविरोधी गाण्यांचाही दिग्दर्शकाने उपयोग करून घेतला आहे.

'टॉकिंग हिस्टरी' अणूयुद्धाच्या भयानकतेबाबत बोलतो, त्यातील धोका स्पष्ट करतो तर अमेरिकेचा निकोलस मेयर दिग्दर्शित 'द डे आफ्टर' ही भयानकता चित्रित करतो मात्र खास हॉलीवुड शैलीत !

सूर्याचा स्फोट झाला तर कसा दिसेल तसाच यातील अणुस्फोट दाखविण्यात आला आहे. अणुस्फोटाच्या त्या भयभीत करणाऱ्या ज्वाला, झपाट्याने नामशेष होत जाणारी, उध्वस्त होणारी शहरे. सारं काही 'खास तंत्राच्या' आधारे या दिग्दर्शकाने परिणामकारक केले आहे हा स्फोट होत असतानाच 'लोकशाही व स्वातंत्र्याच्या तत्वाला आम्ही बांधील आहोत' असे सांगणारे अमेरिकन अध्यक्षांचे रेडिओवरील भाषण आणि अणुस्फोट घडण्यापूर्वीचे सामान्य जनतेचे सुरळीत जीवन व तो स्फोट घडल्यानंतरचे त्याचे बेचीराख झालेले जीवन. अन्नासाठी चालू असलेल्या दंगली, स्फोटाला बळी पडत असलेल्या मृतांचा आक्रोश अशी काही दृश्ये अंगाला घाम आणणारी, भेदरवून टाकणारी आहेत. चित्रपटाची बांधणी ढोबळ असली तरी अणुयुद्धाची कंपीत करणारी भीती तो उत्पन्न करतो.

अशा युद्धाच्या जखमा घेऊन हा 'फिल्मोत्सव' आला आणि अणूयुद्धाची भीती दाखवून संपला. राजकारण नेहमीच जगात बेदीली माजवत आले आहे. याच राजकारणाने युद्ध घडविली असली, युद्धाचा पुरस्कार केला असला, देशोदेशीच्या लोकांमध्ये भेदाभेद केले असले तरी सच्चे कलावंत आणि त्यांची कला हे भेदाभेद विसरून सामान्य जनतेला एकत्र आणते ती युद्धविरोधी असून मानवतेचा, शांततेचा पुरस्कार करणारी असते याचीच छोटीशी झलक या 'फिल्मोत्सवात' पाहायला मिळाली. ◻

## इंडियन पॅनोरमा

# विविध रंगी-कौतुकास्पद पण अस्वस्थ करणारा का नाही ?

**'फिल्मोत्सव–८४'च्या माहितीविभागातील शंभर एक विदेशी चित्रपटांनी 'मेट्रो'च्या पडद्यावर आपापल्या देशांतील माणसांची सुखदु:खे आशा-आकांक्षा, त्यांची स्वप्ने रंगविली. तसेच या 'फिल्मोत्सवा'च्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 'इंडियन पॅनोरमा'ने भारताची विविधांगी प्रतिमा जोपासली. एखाद्या बागवानाने बहुरंगी चित्र-विचित्र फुलांचा हारा भरून आणावा तसा हा पॅनोरमा होता...**

जागतिक चित्रपटसृष्टीत चित्रनिर्मितीत आघाडीवर असलेला देश म्हणून भारताचे नाव घेतले जाते. १५ भाषात आठशेवर चित्रपटाची निर्मिती करून आपण उच्चांक केला आहे; पण इंडियन पॅनोरमात मात्र गेल्या वर्षभरातील दहा भाषांतील २१ चित्रपटच होते. 'पॅनोरमा'ची ही 'लिमिट' आहे. पण तीच आपल्या कलात्मकतेची लिमिट वाटते. शिवसेनेच्या मुबईत 'फिल्मोत्सव' झाला. तरी 'पॅनोरमा'त मात्र दाक्षिणात्य चित्रपटांचेच वर्चस्व होते. २१ पैकी दहा चित्रपट दाक्षिणात्य होते तर केवळ एकच मराठी चित्रपट होता. अर्थातच ही गोष्ट दाक्षिणात्याविरुद्ध ओरड करण्याची नसून जे कोणी थोडेफार सुजाण मराठी चित्रपटकार असतील त्यानी आत्मपरिक्षण करण्याची आहे. 'स्मृतिचित्रे' हा दूरदर्शनसाठी तयार करण्यात आलेला चित्रपट वगळता 'पॅनोरमा'त दाखल करण्यालायक एकही मराठी चित्रपट गेल्या वर्षभरात निघू नये ही मराठीच्या दृष्टीने अपेक्षित पण खेदाची बाब आहे. (तसा मराठीने डॉ. पटेलाच्या नेतृत्वाखाली नुकताच कोठे 'उंबरठा' ओलांडला आहे. तेव्हा या 'शापीत' चित्रभूमीकडून आपण तरी किती अपेक्षा ठेवणार !) त्यापेक्षा गेल्या वर्षभरात अवघ्या चारच चित्रपटांची निर्मिती झालेल्या ओरिया भाषेतील दोन चित्रपटाची निवड पॅनोरमात होणे स्पृहणीय आहे. 'पॅनोरमा'त आतापर्यंत असलेले बंगाली चित्रपटांचे वर्चस्व मल्याळी चित्रपटानी खेचून घेतले आहे. यंदाच्या 'पॅनोरमा'त सहा मल्याळी चित्रपट होते, तर अवघे दोनच बंगाली चित्रपट होते. (चित्रपटकलेला प्रोत्साहन देणाऱ्या डाव्या सरकारचे हे कर्तृत्व मानायचे का ?) सत्यजीत रे, अरविंदन, अदुर गोपालकृष्णन, कुमार सहानी, मणी कौल, गिरीश कर्नाड, अशा मान्यवरांच्या गैरहजेरीतही यंदाचा 'पॅनोरमा' विविधतेबरोबरच काहीसा परिपक्व, वेगळा आणि दर्जेदार सिनेमा घेऊन आला हे मान्य करायलाच हवे !

### • अस्सल हिरा

या पॅनोरमा'चे सर्वात आकर्षण म्हणजे 'आद्य शकराचार्य हा पहिला संस्कृत भाषेतील चित्रपट. उद्घाटनालाच दाखविण्यात आलेल्या या चित्रपटाने धक्का दिला. एखादा पैलू न पाडलेला अस्सल हिरा सापडावा तसा हा चित्रपट आहे.

हिंदू धर्माचे प्रेषित व संस्थापक समजल्या जाणाऱ्या 'आद्य शंकराचार्य या संत–तत्त्वज्ञावरील हा चित्रपट कुठेही त्याच्या तत्त्वज्ञानाचे अवडंबर माजवीत नाही की त्याच्या जीवनाला जादूई आख्यायिकेचे स्वरूप देत नाही. अतीव ज्ञानप्राप्तीसाठी भटकती करत असलेल्या या संत–तत्त्वज्ञाचा अवघ्या बत्तीस वर्षांचा जीवन-

प्रवासच त्यांच्या वेदांती तत्त्वज्ञानाचा मुलाधार असल्याचे हा चित्रपट सांगतो. त्यांनी जे ज्ञान ग्रहण केले, तसेच ते जगले हेच चित्रपट दाखवितो. 'श्रद्धेतून धर्म जन्माला येतो आणि त्या श्रद्धा अनुभवाला आल्या की धर्म लयास जातो' असे शंकराचार्य म्हणाले. जी. व्ही. अय्यर या दिग्दर्शकाने नेमके हेच ओळखून या चित्रपटाची बांधणी केली आहे.

'नदी समुद्राला मिळाली की ती आपले नाव–गाव विसरते तसेच तत्त्ववेत्त्यांचे असते.' या संस्कृत श्लोकाभोवतीच अय्यर यांनी आपला चित्रपट उलगडत नेला आहे.

शंकराच्या लहानपणीच त्याचे आजोबा 'अनंतात विलीन' होतात. तेथेच हा चित्रपट सुरू होतो. दारिद्र्यात दिसणारी सहिष्णुता, आतिथ्यशीलता व निस्सीम श्रद्धा यांचे संस्कार घेऊन ज्ञान प्राप्तीसाठी बाल शंकरा घराबाहेर पडतो. गुरू गोविंद भागवत यांच्याकडे बारा वर्षे ज्ञानग्रहण करतो. तेथे उपनिषद, ब्रह्मसूत्र व गीता यांचे ज्ञान मिळविल्यावर तरूण शंकरा ज्ञान प्रसारासाठी देशाच्या काना–कोपऱ्यात भटकंती सुरू करतो. आणि येथेच अय्यर यांचा 'कॅमेरा' शंकराचार्यांना अभिप्रेत असलेली चराचर सृष्टीची 'माया' पकडतो. केरळ–कर्नाटकातील घनदाट अरण्ये, मध्यभारतातील त्या रोरावत जाणाऱ्या नद्या, कन्याकुमारीचा अथांग महासागर आणि आकाशाकडे झेपावणारी ती हिमालयाची उंची–सारं काही अय्यर यांचा 'कॅमेरा' जिवंत करतो. अगदी त्यातील थक्क करणाऱ्या, लुब्ध करणाऱ्या सौंदर्यासकट.

या साध्या सरळ एका लयीत घडत जाणाऱ्या जीवनप्रवासात अय्यर यांनी एकाच गूढ गोष्टीचा उपयोग केला आहे. शंकराचार्यांच्या लहानपणापासूच त्यांच्याबरोबर 'ज्ञान' व 'मृत्यू' या नावाचे दोन मित्र अय्यर यांनी दाखविले आहेत. आणि या दोघांनाही मानवी शरीर दिले आहे. मात्र अंतीम ज्ञानप्राप्तीसाठी शंकराचार्यांच्या मनातील गुंतागुंत या तीघांच्या चर्चेतून अय्यर यांनी स्पष्ट केली आहे. यातील चांडाळाच्या परिणामकारक दृश्यात तर त्यांनी यातील 'ज्ञान' नामक मित्राचा सुरेख उपयोग केला आहे.

आपल्या वाटेत उभ्या असलेल्या 'अस्पृश्य' चांडाळाला वाटेतून दूर होण्यास शंकराचार्य सांगतात त्या वेळी 'ज्ञान' हा मित्र त्या चांडाळाच्या मागे जाऊन उभा राहतो. जणू काही तो आपल्या अस्तित्वाचे दर्शनच घडवितो. चूक लक्षात येते आणि शंकराचार्य ब्राह्मण पंडितांच्या समक्ष त्या चांडाळाच्या पाया पडतात. मात्र अशा प्रकारे नाटच निर्माण करणं हा काही या चित्रपटाचा गाभा नव्हे तर त्यातील अस्सलपणा शंकराचार्य असे अनुभव घेतच आपलं तत्त्वज्ञान बनवत जातात, जगत जातात हे दाखविण्यात आहे.'

अय्यर यांचा 'शंकराचार्य' अधिक भारदस्त बनला आहे. तो मूळ धर्माशी, प्रकृतीशी सुसंगत अशा 'संस्कृत' भाषेच्या निवडीमुळे. तसा संवादापेक्षा दृश्यांनीच हा चित्रपट अधिक बोलतो; पण संस्कारक्षम आणि परिणामकारक वातावरणनिर्मितीसाठी असलेले एम. बालमुरली कृष्णांचे शास्त्रोक्त संगीत व वेदपठण, मंत्रोच्चार, नैसर्गिक आवाज यांच्या साहाय्याने बी. व्ही. कारंथ यांनी तयार केलेले पार्श्वसंगीत आपला अनुभव अधिक जिवंत करतात. मधु आंबटचा 'कॅमेरा' निसर्गाचे रौद्र रूप दाखवितो तसे त्याचे गूढ



एस्. डी. बॅनर्जी : 'आद्य शंकराचार्य' या पहिल्या संस्कृत चित्रपटात

◻

सौंदर्यही ! याशिवाय शंकराचार्य बनलेला एस. डी बॅनर्जी, मुकेली पण कनवाळू डोळ्यांची त्याची आई बनलेली एल. व्ही. शारदा व बालकलाकार विशेषतः त्यातील हसरा 'मृत्यू' या चित्रपटाचे शाश्वत अनुभवात रूपांतर करतात. आजच्या व्यापारी दुनियेत सात वर्षांच्या प्रदीर्घ मेहनतीनंतर अय्यर यांनी निष्ठेने काढलेला चित्रपट खरोखरच एक अस्सल हिरा आहे !

'आद्य शंकराचार्य' इथल्या मातीत रुजलेल्या संत, तत्त्वज्ञांचे जीवनानुभवातून तयार झालेले तत्त्वज्ञान सांगतो तर के. विश्वनाथ यांचा 'सागरसंगमन्' हा तेलगू चित्रपट याच मातीतील अभिजात नृत्यपरंपरेचा परिचय करून देतो. 'आद्य शंकराचार्य अस्सल हिरा' आहे तर 'सागरसंगमन्' हा सराफ कट्ट्यावरील काहीसा विकाऊ हिरा आहे.

'शंकराभरणम्' या चित्रपटासाठी प्रसिद्ध असलेले के. विश्वनाथ यांनी याही चित्रपटात तोच विषय नव्या मुशीतून बाहेर काढला आहे. तिथे शास्त्रोक्त संगीत होते, इथे नृत्य आहे. जीवन आणि कला यांच्यातील गूढ नाते आणि ते एकजीव करण्यासाठी सर्जनशील कलावंताची चाललेली धडपड हेच या दोन्ही चित्रपटांचे विषय.

काहीशा भडक, उथळ 'मेलोड्रामा' च्या साह्याने 'सागरसंगमन्' ची पटकथा रचण्यात आली असली तरी त्याचा खरा जीव

त्यातील नृत्यलालित्यात आहे. तेथे मात्र कोणतीही व्यापारी तडजोड दिसत नाही. दोन–सव्वादोन तासाच्या या चित्रपटात सुमारे तासभर भरतनाट्यमपासून कुचीपुडीपर्यंत अनेक नृत्यप्रकार पाहायला मिळतात.

अभिजात नृत्य परंपरेतील सर्व प्रकारची नृत्य शैली आत्मसात केलेल्या पण जीवनात विफल झालेल्या एका नर्तकाची ही कथा. गरीब कुटुंबात जन्माला आलेला हा नर्तक सर्व नृत्यांचा संगम साधेल अशा 'वैश्विक नृत्याचा' शोध घेत असतो; पण कलेला जीवनाच्या आणि जीवनाला कलेच्या जवळ नेणाऱ्या त्याच्या या अनोख्या ध्यासात कधी त्याचे दारिद्र्य आड येते, तर कधी कलेविषयक त्याचा अहंकार आड येतो. अशातच एका प्रेमिकेच्या प्रोत्साहनाने तो लोकप्रिय होतो; पण त्या दोघातील प्रेम योगायोगाने अपुरेच राहते. त्यातच तो दारूत बुडतो. तिरसट, तुसडा बनतो. काही कालानंतर म्हणजे वय सरल्यानंतर त्याची या प्रेमिकेशी पुनर्भेट होते. त्याच्यातील सुप्त कलेला जागृत करण्याचा ती पुन्हा प्रयत्न करते; पण वेळ गेलेली असते. अखेरच्या क्षणी तिच्या मुलीकडे आपली नृत्यकला सोपवून हा नर्तक जगाचा निरोप घेतो !

बराचसा 'मेलोड्रामा', दाक्षिणात्य भडकपणा व ताणलेला शेवट अशी नजरेत भरणारी ठिगळं असूनही हा चित्रपट बघणेबल झाला आहे तो कमल हसन व जयाप्रदा यांच्या अभिनयामुळे. समुद्राच्या पार्श्वभूमीवरील कमल हसनच्या नृत्याने यात जान आणली आहे.

## वलयांकित दुनियेचं अधःपतन !

'आद्य शंकराचार्य' 'सागरसंगमन्' या मातीत रुजलेल्या तत्त्वज्ञान–कलेचा वारसा सांगतात तर 'जाने भी दो यारो' 'अर्धसत्य' 'लेखाज् डेथ–ए–फ्लॅशबॅक' व 'मंडी' आजच्या समकालीन समाजात विविध पातळ्यांवर चालू असलेल्या भ्रष्टाचाराचा पर्दाफाश करतात.

'अर्धसत्य' ने पोलीसव्यवस्थेतील भ्रष्टाचारावर नेमके बोट ठेवले आहे, तर 'जाने भी दो यारो' ने महानगरातील आर्थिक भ्रष्टाचार व त्याचे राजकीय लागेबांधे यांची खिल्ली उडवली आहे. 'लेखाज् डेथ' व 'मंडी' आजच्या व्यापारी जगातील नैतिक मूल्यांचे अधःपतन दाखवितो.

'अर्धसत्य' बद्दल पुरेशी चर्चा झाली आहे. 'जाने भी दो' व 'मंडी' ने पूर्णतः विडंबनात्मक शैलीने या भ्रष्टाचाराची रेवडी उडविली आहे. 'जाने भी दो' चा दिग्दर्शक कुंदन शहाचा हा पहिलाच प्रयत्न; पण चाचरत का होईना तोही 'शाबासकीची थाप' द्यावा असा आहे. तर शाम बेनेगल यानी 'मंडी' त प्रथमच विनोदी शैलीचा अंगीकार केला आहे. मात्र त्यांचा प्रयत्न निराशजनक आहे.

'जाने भी दो...' ची कथा किंवा गडबड–घोटाळा 'स्लॅपस्टिक कॉमेडी' पद्धतीने घडत जातो. विनोद आणि सुधीर या बेकार फोटोग्राफर्सना शोभा नावाची 'खबरदार' या वृत्तपत्राची संपादक 'अपने मतलब के खातीर' कामाला लावते आणि त्या दोघांना तर्नेजा या मुंबईच्या बलाढ्य कंत्राटदाराचा भ्रष्टाचार उघडकीस आणण्यास सांगते. हे दोघे अवलिया या प्रकरणाच्यामागे लागतात आणि हा गडबड–गोंधळ सुरू होतो.

तर्नेजा मुंबईच्या कमिशनरला लाच देऊन शहरातील भली मोठी कंत्राटे मिळवत असतो; पण त्याचा प्रतिस्पर्धी अहुजा ही कंत्राटे मिळविण्यासाठी कमिशनरशी सधान साधून असतो. आपल्याला कंत्राट मिळणार नाही, या गैरसमजुतीतून तर्नेजा कमिशनरचा बागेत खून करतो; पण या अवलिया फोटोग्राफर्सचा 'कॅमेरा' प्रत्यक्ष हा खूनच टिपतो. मात्र हा खून असल्याचे या दोघा चक्रमांच्या लक्षात 'डार्करूम' मध्ये येते... मग हे दोघे, त्यांच्यामागे तर्नेजा आणि मंडळी व त्यापाठोपाठ शोभा व अहुजा अशी पळापळ सुरू होते. या धावपळीनेच हा चित्रपट व्यापला आहे.

बबन प्रभूच्या 'फार्सिकल' नाटकाप्रमाणे हा चित्रपट हास्याची (मात्र क्षणिक) कारंजी उधळत वेगाने धावतो. तो वेग राखण्याचे कसब कुंदन शहाकडे आणि सहज अभिनय करणाऱ्या यातील कलावंतांकडे आहे. चार्ली–चॅपलिन, लॉरेल–हार्डी यांच्या चित्रपटातील सावळा–गोंधळ आठवावा इतकी काही दृश्ये सहीसही आहेत.

नसिरुद्दीन, भक्ती बर्वे, ओम पुरी व रवी वास्वानी यांचा यातील गोंधळाला पोषक असा हलका-फुलका अभिनय, काही खुमासदार व समकालीन भ्रष्टाचारांच्या प्रकरणाची 'हुर्रे' उडविणारे संवाद, काही निवडक 'जमलेली' दृश्ये, विशेषतः या चित्रपटाच्या अखेरीस कमिशनरच्या खुनाच्या आरोपाखाली या दोघा फोटोग्राफर्सना पकडले जाते. शहांनी या दोघांना कैद्याच्या वेषात, गुन्हेगारासारखे उसने अवसान घेऊन सबंध मुंबईच्या गर्दीत मुक्तपणे हिंडवले आहे आणि तेथेच हा चित्रपट संपविला आहे.

मात्र विषय ताजा असला तरी त्यात फारसे नाविन्य वाटत नाही. मायकेलएंजलो अंतोनियोनीच्या 'ब्लोअप' मधील एका कल्पनेच्या उसनवारीसकट (अर्थात शहानी ज्या पार्कात तो खून घडतो आणि जिथून या कल्पनेच्या उचलेगिरीस सुरुवात होते त्या पार्काला 'अंतोनियानी' पार्क असे नामकरण करून ऋण फेडले आहे: पण कदाचित हे उशीरा सुचलेले शहाणपण असेल) इतर अनेक परिचित–ओळखीच्या प्रसंगांचीही उचलेगिरी दिसते. शिवाय शहानी गमतीसाठी, गमतीखातर या गंभीर समस्येची टिंगल केली आहे. त्यात उपहास फारसा नसल्याने 'जाने भी दो...आखीर दो घंटे का सवाल है' असेच म्हणावे लागते.

'जाने भी दो' ची ही गत तर 'मंडी' अधिकच फसगत करतो.


**मिरजेत उतरण्याचे सर्व सोयींनी युक्त असे एकमेव ठिकाण !**

**सुखनिवास बोर्डिंग अँड लॉजिंग**

**स्टेशनरोड, मिरज ४१६ ४१०**

**फोन : २७८०**

धड गंभीर नाही की धड विनोदी नाही. एकदरीतच एका चांगल्या विषयाचे बेनेगलांनी कचुबर केलं आहे. स्वच्छ चारित्र्याचा, दिखाऊ उसना 'मेकअप' असलेल्या पुरातनपल्ली या हैद्राबादमधील एका सुस्त आडगावाला नव्या व्यापारी क्रांतीची चाहूल लागते. तसे ते गाव कात टाकते. दुकानांना जागा हवी या सबबीखाली एका समाजसेवी महिला संघटनेच्या मागणीची री ओढून कत्राटदार या वेश्यावस्ती–कम–मनोरजनगृहाला गावाबाहेर काढतो; पण ती वस्ती निदान गावाबाहेर राहावी म्हणून कंत्राटदार गावातीलच प्रतिष्ठितांसह प्रयत्न करतो आणि ती पुन्हा गावाबाहेर आपले बस्तान बसविते. त्याबरोबर हे प्रतिष्ठित, त्यांची मुले यांची ये–जा सुरू होते. त्यातून काही प्रेम, काही जुन्या चुका याची सरमिसळ होते. पुढे या जागेलाही मागणी येते आणि धूर्त कंत्राटदार याही वेळी नाना कुरापती काढून ही वस्ती हलविण्यास भाग पाडतो.

मुळातच गुलाम अब्बासी या उर्दू लेखकाच्या लघुकथेचा आवाका तो केवढा! पण नाही. बेनेगलांनी धटिंगणपणा करून तो दोन-अडीच तास लांबवला आहे. त्यातील जुजबी उपकथानके हास्याला मारक ठरली आहेत. या चित्रपटात 'नैतिक अधःपतन' दाखविल्याचा दावा जरी बेनेगल करीत असले तरी त्याचे 'सिनेमॅटिक अधःपतन'च अधिक दिसते. या कथेची पोकळी भरून काढण्यासाठी बेनेगलांनी अश्लील फोटो काढणारा इब्लिस फोटोग्राफर, पहान्याबरोबर शय्यासोबत करणारा हवालदार अशा विविध व्यक्तिरेखा उभ्या केल्या आहेत. त्यात या दोन व्यक्तिरेखा काहीशी खुमारी आणतात, तर नायकिणीला सल्ला देणाऱ्या फकिरासारख्या काही व्यक्तिरेखा अनावश्यक वाटतात. स्मिता, शबाना, नसीर, ओम व अमरीश पुरी असे बेनेगली कुंडलीतले ग्रह–तारे इथे सराईतपणे वावरताना दिसतात.

'मंडी'पेक्षा चित्रपटाच्या व्यापारी व वलयांकित दुनियेतील नैतिक अधःपतन 'लेखा ज् डेथ' हा मल्याळी चित्रपट काहीशा सरधोपटपणे, पण प्रकर्षाने दाखवितो. दाक्षिणात्य चित्र-उद्योगात प्रवेश करू इच्छिणाऱ्या उदयोन्मुख अभिनेत्रींना चंदेरी तारका बनण्यासाठी आपले शरीर निर्मात्याकडे गहाण ठेवावे लागते ही आता जगजाहीर गोष्ट आहे. आजही कित्येक तारका व एक्स्ट्रॉज या उद्योगात आपली शरीरं गहाण ठेवून सिनेमाच्या पडद्यावर दिसत आहेत; पण यातल्याच काहींनी निर्मात्यांची 'स्लीपिंग ब्युटी' होण्याचे नाकारून आत्महत्या केल्या आहेत! त्यातील सर्वांत गाजलेली आत्महत्या म्हणजे शोभा या नटीची! निर्मात्यांचा जाच, आपल्या शरीराला चटावलेली त्यांची नजर, आई-बाप, नवऱ्याकडून होत असलेला छळ व मनस्ताप, एकंदरीतच या बाजारू दुनियेत झालेली फसगत...या सर्वांना कंटाळूनच लोकप्रिय असलेल्या या सुजाण तारकेने काही वर्षांपूर्वी अचानक आत्महत्या करून दाक्षिणात्य चित्र-उद्योगाला धक्का दिला!

*ज्याना या वार्तेने वाईट वाटले त्यात तिच्या* चहात्यांसमवेत के. जी. जॉर्ज हा मल्याळी दिग्दर्शकही होता. त्यानेच 'लेखा ज् डेथ'च्या निमित्ताने शोभाच्या शोकांतिकेला चित्रपटाचे स्वरूप दिले आहे. अर्थातच सारं काही 'को–इन्सिडेन्टल'च्या सदराखाली!

## चित्रदुनियेतील 'फ्लेश रॅकेट'

लेखा या लोकप्रिय चित्रपट–अभिनेत्रीच्या आत्महत्येनंतर 'फ्लॅशबॅक'ने हा चित्रपट चार भागात विभागला आहे. चित्रपटात काम करण्याच्या मनीषेने सथामा ही पधरा वर्षांची मुलगी आपल्या आई–वडिलांबरोबर केरळहून मद्रासला येते; पण मुळातच या वलयांकित दुनियेबाबत साशंक असलेला तिचा बाप पियक्कड बनून आपली नापसती दाखवितो, तर संथामाची आकर्षक आई महत्त्वाकांक्षेने झपाटलेली असते. त्या दोघी स्टुडिओचे हेलपाटे घालत असतानाच शरीरासाठी चटावलेल्या निर्मात्याच्या वखवखलेल्या नजरेस पडतात आणि 'फ्लेश रॅकेट'मध्ये सापडतात. परिणामी आई व मुलगी दोघीनाही निर्मात्याची शय्यासोबत करणे भाग पडते. त्यातच नाजूक–निरागस संथामाला काही जुजबी चित्रपटात संधी मिळते. पुढे ती लोकप्रिय होते. तिची 'लेखा' नामक अभिनेत्री बनते. पारितोषिके मिळतात. चहात्यांची पत्रे व गराडा, वलये, पार्ट्या, प्रसिद्धी, गॉसिप, कार-बगला सारं काही विकत घेण्याची तिची ताकद असते आणि ते तिने विकत घेतलेलेही असते; पण त्यासाठी जबर किंमत तिने दिलेली असते! आपल्या शरीराने घडविलेली ही किमया तिला मनःस्ताप देत असते. त्यामुळेच ती निखळ, निरोगी प्रेमासाठी आसुसलेली असते. अशातच आपल्याला समजून घेणारा एक दिग्दर्शक तिला भेटतो. वयाने मोठा व लग्न झालेले असूनदेखील ती त्याच्या प्रेमात पडते. त्याच्या निमित्ताने एक 'फादर फिगर' तिला भेटते.

लेखा पहिल्या बायकोपासून घटस्फोट घेण्याचा त्याच्याकडे आग्रह धरते. त्याच्यासाठी या वलयांकित विश्वाशी काडीमोड घेण्यास तयार होते, तर या दुनियेची चटक लागलेली तिची आई पुन्हा पुन्हा या दुनियेत तिला ढकलत असते. तो दिग्दर्शक *निर्णय घेण्याचे टाळतो* आणि लेखा कायमचा निर्णय घेते, फास लावून!

जॉर्ज या दिग्दर्शकाने वलयांकित दुनियेची काळी बाजू, तेथे चालणारे 'फ्लेश मार्केट' उघडकीस आणले आहे. लेखा बनलेली नलिनी ही नवोदित अभिनेत्री तर त्या भूमिकेबरोबरच जगली आहे. एक टवटवीत फूल या बाजारू दुनियेत कुस्करले जाते त्याची ही शोकांतिका चटका लावून जाते; पण भिडत नाही ती जॉर्ज यांच्या सरधोपट मांडणीमुळे. तसा लेखाच्या लोकप्रियतेचा चढता आलेख

**हॉटेल न्यू ट्रॅव्हलर्स अँड बिअर बार**

**थंडगार बिअर व उत्कृष्ट जेवणासाठी**
**एक वेळ अवश्य भेट द्या!**

गांधी पुतळ्याजवळ
इचलकरंजी



वलयांकित दुनियेला बळी पडलेली लेखा (मलिनी) व तिची आई (शुभा)—' लेखाज् डेथ 'मध्ये

□

तिच्या घरांच्या बदललेल्या ' इंटेरियर 'मध्ये दिसतो. मात्र लेखाच्या मनामधील ' इंटेरियर '— त्यातील हरवलेपण, मनस्ताप, तगमग. चीड, उद्वेग चित्रपटाच्या रचनेत आढळत नाही. शोभाचा सलता फ्लॅशबॅक म्हणूनच हा चित्रपट भावतो.

' लेखाज् डेथ ' ' अर्धसत्य ' किंवा ' जाने भी दो ' हे तिन्ही चित्रपट समकालीन भ्रष्ट वास्तवाचा वेध घेणारे आहेत. मग ती लेखा, तो पुलीसइन्स्पेक्टर वेलणकर असो किंवा ते दोघे फोटोग्राफर असोत, ते सर्वजण पराभूत आहेत, हरणाऱ्यांचीच लढाई इथे दिसते. तर ' रंगुला कालू ' (रंगीबेरंगी स्वप्न); ' बॅंकर मार्गया ' आणि ' ओरू इंदिया कानावु ' (एक भारतीय स्वप्न) या तीन्ही चित्रपटांचे नाते समकालीन वास्तवाशीच आहे. यातील नायक त्या सर्वांप्रमाणेच लढतात, क्वचित हार पत्करतात, बहकतात सुद्धा. पण पुन्हा नव्या जोमाने आपल्या ध्येयासाठी लढायला तयार होतात. काहीसा आशावादी ' फ्लेव्हर ' घेऊन आलेले हे दाक्षिणात्य चित्रपट आहेत.

## रंगुला कालू ' बॅंकर मार्गया '

नरसिंगराव यांच्या ' रंगुला कालू ' या तेलगू चित्रपटाचा नायक चित्रकार आहे. त्याच्या तीन मित्रांच्या संदर्भात राव यांनी या चित्रकाराचे स्वप्न रेखाटले आहे. त्यांचे तीन मित्र. एक यशस्वी चित्रकार काहीशी अमूर्त चित्रं काढणारा व्यावसायिक, तर दुसरा ' सिनेमा पोस्टर्स ' रंगविणारा रंगारी, दारूत बुडालेला. आणि तिसरा डावा पत्रकार-नायकाच्या अद्भुतरम्य चित्रकलेवर टीका करणारा. या तीन मित्रांमध्ये विभागलेले आपले वास्तव—स्वप्न. त्याला सामोरा जात असतानाच हा गरीब नायक आपल्या सभोवतालच्या विश्वात आपली चित्रे शोधू लागतो. स्वतःच्या जगण्यासाठी चाललेला झगडा आणि त्याच्या आसपासच्या ज्वलंत समस्या यातून तो बरेच काही शिकतो आणि ' पिपल्स आर्टिस्ट ' बनतो. फुटपाथवरच आपली ' आर्ट गॅलरी 'बनवून सामान्यांची सुख-दुःख आपल्या चित्रांत रंगवू लागतो. राव यांनी बदलत्या चित्रातून, सिनेमा पोस्टर्स, काही लोकप्रिय चित्रकारांच्या चित्रांचा उपयोग करून हा प्रवास देखणा बनविला आहे. कॅमेरा आणि कुंचला यांचा मेळ घालण्यात राव बरचसे यशस्वी झाले आहेत.

आर. के. नारायण यांच्या ' फायनान्शिअल एक्स्पर्ट ' या कादंबरीवर बेतलेला ' बॅंकर मार्गया ' हा पॅनोरमातील एकमेव कानडी चित्रपट हाच धागा पकडून उभा राहतो. फरक इतकाच हा सामान्यांच्या आर्थिक आकांक्षांचा चित्रकार आहे.

' बॅंकर मार्गया 'चा नायक मार्गया छोटा बॅंकर आहे. एका सहकारी बॅंकेच्या समोरच त्याने आपली छोटीशी बॅंक थाटली आहे. थोड्या-फार पैशाची देवघेव करत असतानाच तो गावातील लोकांना बॅंकेतील व्यवहार कसे करावेत याचे मार्गदर्शन देत असतो. पण घरचे दारिद्र्य बायकोच्या तक्रारी व त्यातच हरवलेली त्याची हिशोबवही—यामुळे तो आपल्या ग्राहकांना मुकतो. अशातच डॉ. पाल या गृहस्थाच्या अश्लील वाङ्मयाचे हक्क त्याला स्वस्तात मिळतात. ते वाङ्मय प्रकाशित करून तो अल्पावधीतच श्रीमंत बनतो; पण डॉ. पालमुळेच त्याची ही श्रीमंती थोड्याच काळात लयास जाते. पुन्हा दरिद्री बनलेला मार्गया आपल्या बॅंकेचा छोटा व्यवसाय पूर्ववत सुरू करतो; पण या वेळी अधिक निकरांने नव्या जोमाने काहीशा समाधानी वृत्तीने.

टी. एस. नागभरणा या दिग्दर्शकाची सुरुवातीच्या काही भागात पकड दिसते पण पुढे आर. के नारायण यांच्या कादंबरीचीच पाने उलटताना हा दिग्दर्शक दिसतो. त्यामुळे बरेचसे विषयांतर होते—मार्गयाचा मुलगा,त्यांच्या संबंधांचे 'भावविवश' नाटच यामुळे मार्गया वरील पकड ढिली पडते आणि एका अनोख्या विषयाला हात घातल्याचे ' क्रेडिट ' घेऊन हा मार्गया ' बेअरर ' चेक सारखा बिन चेहऱ्याचा व्यावसायिक सिनेमा बनतो.

' रंगुला कालू ' व ' बॅंकर मार्गया ' तील नायक दारिद्र्यातही सामान्यांच्या सुख—दुःखांत समरस होणारे आहेत. तर ' ओरू इंदिया कानावु 'ची नायीका श्रीमंत कुटुंबातील आहे, ' तनीर तनीर ' या गाजलेल्या चित्रपटाचे लेखक कोमल स्वामीनाथन यांचा ' पॅनोरमा 'तील एकमेव तामीळ चित्रपट. आदिवासींच्या उन्नतीसाठी काम करणारी यातील श्रीमंत नायिका, एका आदिवासी स्त्रीवर मंत्र्याच्या मुलाने केलेल्या बलात्कारामुळे न्यायासाठी राजकीर मैदानात उतरते. त्याविरुद्ध आंदोलन करते. या निमित्ताने सत्ताधारी राजकीय पक्षाचे हितसंबंध, दबाव यांचे स्वामीनाथन यांनी उपहासगर्भ शैलीत चित्रण केले आहे. अखेरीस सर्वांना न्याय मिळतो, मंत्री

राजीनामा देतो, मुलाला अटक होते आणि ती नायिका आदिवासींच्या कामाला वाहून घेते.

स्वामीनाथन यांची ही अत्यंत 'सोपी क्रांती'– भडक नाटच-उथळ मांडणी असूनही इतर 'मसाला चित्रपटां' इतका हा चित्रपट असह्य होत नाही; पण याला सिनेमा का म्हणायचे ते समजत नाही. हिशोबी व्यावसायिकतेसाठी उसना घेतलेला हा 'पुरोगामी' टच् हाच 'पॅनोरमा'चा निकष आहे असे याच्या निवडीमुळे वाटते.

## वेधक मृगजळ

आखाती देशांतून केरळमध्ये येणारा पैसा, त्याची दिखाऊ प्रतिष्ठा याचे मार्मिक चित्रण करणारा 'अकारे' (पलीकडचा किनारा) हा मल्याळी चित्रपट कल्पकतेअभावी परिणामशून्य वाटतो. आखाती देशातून परतणारे मित्र, टेपरेकॉर्डस्, उंची साडया, फ्रीज यांनी बहकलेल्या, त्यांच्या श्रीमंतीचा भपका गोपीनाथ या तहसीलदाराला भुरळ पाडतो. बायकोच्या आग्रहाखातर तोही दुबईला जाण्याची स्वप्ने रंगवू लागतो. त्यासाठी तेथील लवचिक मागणीनुसार आधी टायपिंग, मग शिंपीकाम शिकतो. त्यातच चोरीच्या व वेश्येशी संबंध ठेवल्याच्या बनावट आरोपाखाली त्याची प्रतिष्ठा जाते. तसेच त्याची नोकरीही जाते आणि अखेर आखाती देशातून परतणाऱ्या केरळीयांचे सामान उचलण्याचे काम करणे त्याला भाग पडते.

के. एन. श्रीधरन या दिग्दर्शकाने केरळमधील सध्याच्या समस्येवर आघात केला आहे. हजारोंना भुरळ पाडणारे मर्म त्यांनी गोपीनाथच्या व्यक्तिरेखेत जोखले आहे. त्याच्या शोकांतिकेत ते नेमके हुडकले आहे. मात्र चित्रपटाची बांधणी रेखीव असली तरी ती मुद्देसूद नाही. एका मर्यादेपर्यंतच ही समस्या व्यक्त होते.

'अकारे' आखाती पैशाच्या धुमाकुळाची झलक दाखवितो तर निराद महापात्रा यांचा 'माया मृगया' (मृगजळ) हा ओरिया भाषेतील चित्रपट शहरीकरण, नोकरीसाठी इतस्ततः विखुरली जाणारी मुले, त्यातच वाढत्या आर्थिक–सामाजिक विवंचना या दबावाखाली उध्वस्त होत जाणाऱ्या एकत्र कुटुंबाचे तपशीलवार चित्रण करतो. 'पॅनोरमा'तील हा वैशिष्टचपूर्ण चित्रपट.

शाळामास्तरच्या एकत्र कुटुंबाचे विघटन यात पाहायला मिळते. म्हातारी आजो– तिचा मुलगा शाळामास्तर – कुटुंबप्रमुख, त्याची बायको, त्यांची चार मुले, एक सून आणि एक मुलगी असे हे मोठे कुटुंब. शाळामास्तर निवृत्त झाला आहे. त्यातच सून बाळंतीण झाली आहे– तिला मुलगा हवा होता; पण झाली आहे मुलगी. तिची चीडचीड या कुटुंबातील ताण अधिक गडद करत आहे. आपल्या निवृत्त मित्रांशी शिळोप्याच्या गोष्टी बोलणाऱ्या शाळामास्तरचा ओलसर आवाज या कुटुंबातील ताण व्यक्त करीत आहे. थोरला प्राध्यापक आहे– तसा कर्ता–करविता आहे, तर दुसरा दिल्लीत शिकत आहे– दरम्यानच्या काळात तो आय. ए. एस. अधिकारी झाला आहे, तर सर्वांत धाकटा क्रिकेटप्रेमी – एकूणच घराच्या शिस्तीचा भंग करणारा.

दुसऱ्या मुलाच्या लग्नात फ्रीज, टी. व्ही. असा हुंडा मिळाला आहे; पण ती श्रीमंत सून या कुटुंबाशी समरस होणे टाळते आहे. अखेर ते जोडपे घरातून निघून गेले आहे. पैशाची चणचण भासते–त्यासाठी मोठ्या मुलाने जादा काम करण्यास सुरुवात केली



'माया मृगया'तील एकत्र कुटुंबाचा मनस्ताप

आहे, तर त्याच्या पत्नीने स्वयंपाक करण्यास प्रथमच नकार दिला आहे. अखेर त्या वृद्ध आईलाच स्वयंपाक करणं भाग आहे.

असं अत्यंत साधं, सरळ, हळूहळू घडत जाणारं मानवी नाटच यात आहे. इथे गच्चीतली रात्रीची ती धुसफूस, चीडचीड, परस्परांबद्दलचे उणे–दुणे काढणे आहे– चहाच्या बैठका आहेत, जेवणाच्या वेळची नीरव शांतता आहे. महापात्रा यांनी अत्यंत बारीक–सारीक तपशिलासह या विघटनांचा हरएक चरा आपल्या चित्रपटात उमटविला आहे. भास्कर चंदावरकर यांचे अगदी 'परिचित' ठेक्याचे संगीत वगळल्यास त्या घराची रचना, त्यातील नेमक्या–मोजक्या वस्तु आणि संपूर्ण चित्रपटाचा रंग, कॅमेऱ्याच्या हालचाली, दिवसा-रात्रीची प्रकाशयोजना– महापात्रा यांनी सत्यजित रेच्या परंपरेशी इमान राखून हा चित्रपट बांधला आहे. त्यामुळे त्यातील आशयासकट तो केवळ ओरियातीलच नव्हे तर तो प्रातिनिधिक सिनेमा बनला आहे. 'पॅनोरमा'त असे चित्रपट फार थोडे त्यामुळेच ते वैशिष्टच !

उपरोल्लिखित चित्रपट बदलत्या सामाजिक वास्तवाशी निगडित आहेत. तर 'रचना' 'मरम्मरम्' (गडगडाट) 'कुडीव्हीडे' (कुणाचे भले ?) (सर्व मल्याळी) व 'नयन श्यामा' (बंगाली) या चित्रपटांतील व्यक्तिरेखा अनोळखी, अपरिचित नाहीत तर परस्परांमधील गुंतागुंतीच्या नात्यामधून त्यांच्यामध्ये संघर्षाला वाव मिळाला आहे. त्यातून निर्माण झालेले नाटच हा या चित्रपटांचा विषय आहे.

### नीरस, कंटाळवाणे चित्रपट

एम. मोहन यांच्या 'रचना'मध्ये पारितोषिकविजेता कादंबरीकार आपल्या पत्नीला तिच्या बँकेतील नव्याने रुजू झालेल्या भेदरट क्लार्कशी प्रेम करण्यास सांगतो. आपल्या नव्या कादंबरीसाठी योजलेली युक्ती अंगलट येते. तो क्लार्क खरोखरच प्रेमात पडतो. त्यातील 'अलिप्तता' आणि 'पावित्र्य' संपते. अखेर हा खेळ त्या क्लार्कचा बळी घेऊन संपतो. सुरुवातीस काहीशा विनोदी पद्धतीने, नंतर गंभीर वळण घेणाऱ्या या कथेचा बाज एम. मोहन यांनी खास बाशु चटर्जी–शैलीत सांभाळला आहे, तर 'मरम्मरम्'मध्ये विवाहित जोडप्यातील प्रेम टिकण्यासाठी जो आदर व उदारपणा लागतो त्याचे चित्रण केले आहे. मात्र यातील आंतरजातीय विवाह, त्याचे ताण व नायिकेचा पहिला पती नक्षलवादी दाखविण्याचे प्रयोजन समजत नाही. केवळ उभयतांमधील प्रेमाला अधिकाधिक फाटे फोडण्यासाठीच ही मांडणी केलेली दिसते. त्यामुळे 'मरम्मरम' कंटाळवाणा, नीरस बनला आहे. 'कुडी व्हीडे'मध्ये तरुण शिक्षिकेचे तिच्या विद्यार्थ्यावरील निर्लेप प्रेमाचे पर्यवसान तिच्याच मत्सरी प्रियकराकडून खून होण्यात होते, तर 'नयन श्यामा'चा नायक प्रेमभंग' वडिलांकडून विश्वासघात व समाजाकडून मनस्ताप यामुळे मृत्यूचीच वाट बघत बसतो–तसे हे चारही चित्रपट बेतातेच.




'धारे अलुआ' (आशेचा किरण–ओरिया), 'संकिथाल' (सुवर्ण-बाजार, मणिपुरी) 'एन ममतीकुन्तीयामाकू' (माझी ममती कुन्तीयामाकू, मल्याळी) व 'फटीकचंद' (बंगाली) या चारही चित्रपटांत लहान मुलांचे अस्तित्वच संपूर्ण परिस्थितीला अस्वस्थ करते, तर कधी तजेला आणते.

त्यातील एम. ए. सिंग यांचा संकिथाल' लहान मुलांचे हरवलेले भाबडेपण व्यक्त करतो. या मुलाच्या आईवर सामूहिक बलात्कार झाल्याने ती वेडी होऊन भटकत असते, तर तिचा मुलगा काकाच्या जाचाला कंटाळून इंफाळला जातो. तेथे चोऱ्या–माऱ्या करणाऱ्या टोळीत सामील होतो.यामुलाच्या या पुढील विविध साहसांमधून सिंग यांनी शहरातील भ्रष्टपणाही उघडकीस आणला आहे. मात्र सदोष तांत्रिक अंगामुळे हा चित्रपट तितकासा परिणामकारक ठरत नाही.

सत्यजित रे यांचा मुलगा संदीप रे आपल्या 'फटीकचंद'मध्ये बबलू या बॅरिस्टरच्या मुलाची साहसे चितारतो. या मुलाला दोन गुन्हेगार पळवून नेत असताना अपघात होतो. त्यात त्याची स्मृती जाते. एक सहृदयी गारुडी त्याचे संगोपन करतो आणि त्याला आपल्या जादुई विश्वाचा संचार घडवितो व त्याची स्मृती परत आल्यावर त्याच्या वडिलांच्या स्वाधीन करतो. खास बालचित्रपटाला साजेशा पटकथेला सत्यजित रे यांनी आपल्या जादुईस्पर्शाने खुमारी आणली आहे. प्रेक्षकांची उत्सुकता टिकवण्याचे कौशल्य संदीप रे च्या दिग्दर्शनात दिसते; पण वडिलांच्याच 'सोनार केला', 'जय बाबा फेलुनाथ' या चित्रपटाचे अवशेषही इथे आढळतात.

या दोन्ही चित्रपटांच्या तुलनेत 'धारा अलुआ' हा सगीर अहमद यांचा चित्रपट सिनेमाशैलीच्या संदर्भात उजवा ठरतो. पालकाच्या जाचातून मुक्त करण्यासाठी दोन दुर्लक्षित व निरागस मुलांना एक वृद्ध माणूस आपल्या घरी घेऊन येतो. त्याची सून त्या दोघांवर प्रेमाचा वर्षाव करते. तिचा नवरा क्रांतिकारी असल्याने पोलिसांचा ससेमिरा चुकवत अधूनमधून घरी येत असतो; पण त्यालाही या मुलाचा लळा लागतो.मात्र त्या मुलांचे वडील व स्थानिक पालक यांच्या उतावळेपणामुळे अनर्थ उद्भवतो. सगीर अहमद यांनी एका तणावाखाली निर्माण झालेल्या या हळुवार नात्याला संगीताची जोड दिली आहे. बासरीच्या अनवट सुरांपासून ड्रमच्या कडकडाटापर्यंत अनेक ध्वनींचा त्यांनी प्रसंगाच्या 'मूड' प्रमाणे परिणामकारक वापर केला आहे. कृष्ण-धवल रंगातील या चित्रपटाच्या रचनेत स्थिर चित्रणाचे तंत्र दिसते तर बाह्य चित्रणात ऋत्विक घटक यांच्या चित्रपटांची आठवण होईल अशी दृश्यरचना जाणवते.

या तीन्ही चित्रपटांतील मास्टर टोनी (संकिथाल), राजीव गांगुली (फटीकचंद) व अमृता अहमद (धारे अलुआ) या बालकलाकारांचा सहज अभिनय, त्यांची समज व पोषक आविर्भाव वाखाणण्याजोगे आहेत.

लक्ष्मीबाई टिळक यांच्या 'स्मृतिचित्रे'या आत्मचरित्रावरील त्याच नावाचा हा एकमेव मराठी चित्रपट या 'पॅनोरमा'त होता. महाराष्ट्रातील १९ व्या शतकातील ना. वा. व लक्ष्मीबाई टिळक या अनोख्या जोडप्याचा भावनात्मक प्रवास विजया मेहतांनी मूळ आत्म-

चरित्राशी इमान राखून त्याच लयीत, तोच साधेपणा, सुबोधपणा व तीच वस्तुनिष्ठता टिकवून चित्रित केला आहे. लक्ष्मीबाईंच्या लग्नापासून त्यांचा धर्मांतरापर्यंतचा हा प्रवास, त्यात वेळोवेळी झालेली लक्ष्मीबाईंची झालेली मानसिक घालमेल व तरीही उभयतांमधील टिकून राहिलेले अतूट नाते याविषयीच हा चित्रपट आहे. तर पार्श्वभूमी म्हणून त्या वेळचे सामाजिक व धार्मिक वातावरण आहे. टिळकांच्या काव्यपंक्तीचा सुरेख उपयोग विजयाबाईंनी केला आहे. वृद्ध लक्ष्मीबाई या नात्याने स्वतः विजयाबाईच निवेदन करतात आणि त्याच्या निवेदनाचे बोट धरून ही स्मृतीचित्रे उलगडत जातात अर्थात 'दूरदर्शन'साठी तयार करण्यात आलेला हा चित्रपट त्या माध्यमाच्या साऱ्या मर्यादा घेऊन आला आहे.

### कौतुकास्पद पण व्यापक नाही

असा हा 'पॅनोरमा' विविध विषयांनी सजलेला. मुख्यतः प्रादेशिक सिनेमानी व्यापलेला. त्यात हिंदी चित्रपटाची नालायकी दिसते. प्रादेशिक चित्रपट त्या त्या प्रदेशाचा परिसर, मानसिकता घेऊन आले आहेत. हेच 'पॅनोरमा'चे खरे वैशिष्टय !

श्रीधरन, अहमद, महापात्रा, शहा व सिंग हे सर्व दिग्दर्शक फिल्म इन्स्टिटयूटचे आणि त्यांचे हे पहिलेच प्रयत्न. तर संदीप रे, नरसिंगराव, विजया मेहता याचेही प्रथम पदार्पण आशादायक आहे.

मात्र या सर्वच दिग्दर्शकांच्या चित्रपटात विषयाचे वेगळेपण जाणवले तरी सिनेमाच्या संदर्भात फार भारावून टाकणारे नाविन्य दिसले नाही. तीच निवेदनशैली किंवा फ्लॅश बॅक तंत्राचा वापर. तसा या दिग्दर्शकांचा स्वतंत्र, वैयक्तिक असा ठसा काही चित्रपटांत आढळला तरी स्वयंभु शैली दिसली नाही. काही मान्यवर दिग्दर्शकांचा 'Impact' जसा जाणवला तसेच त्यांचे अनुकरणही खटकले.

काही हिंदी व दाक्षिणात्य चित्रपटात व्यापारी हेतू ठेवून केलेल्या तडजोडी त्यातील कथा कल्पनेला मारक ठरल्या तर काहींना आपला विषय 'कॅमेऱ्या'च्या कलेने बघताच आलेला नाही. अर्थातच 'आद्य शंकराचार्य' 'घारे अलुआ' व 'माया मृगया' याचा अपवाद वगळता.

याच संदर्भात 'पॅनोरमा'च्या उद्घाटनप्रसंगी बी. के. करंजीया यानी काढलेले उद्गार सूचक आहेत. ते म्हणतात १९५१ मध्ये मुंबईत झालेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय महोत्सवात ज्या युरोपियन सिनेमाला आपण दाद दिली त्याची आठवण हा 'पॅनोरमा' पाहताना येते. थोडक्यात १९५१ मधील युरोपियन नववास्तववादी सिनेमाशी तुलना करावी असाच हा सिनेमा आहे; पण यंदाच्या 'फिल्मोत्सव' ८४ मध्ये आलेल्या परदेशी चित्रपटांच्या तुलनेत या सिनेमाकडे बघितल्यास काही ठळक दोष नजरेस पडतात. यातील बऱ्याच चित्रपटांतील कथाभाग वास्तव समजाशी व प्रचलित नीती नियमाशी नातं सांगत असला तरी त्याची जडण-घडण काल्पनिक व्यक्तीपुरतीच मर्यादित राहते. देशात कोठे तरी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात केव्हा तरी घडल्याचा बहाणा यात केलेला दिसतो. नाव–गाव, धर्म–जात–प्रांत यातील बारीक-सारीक गुंतागुंतीचे भेद रोजच्या वृत्तपत्रातूनही आपल्याला आढळतात; पण त्यांचे सूचक संदर्भ, त्या दृष्टीने यातील व्यक्तीरेखांची जडण-घडण केलेली दिसत नाही. शिवाय स्थळकालादी पार्श्वभूमीचा यथायोग्य मेळही दिसत नाही. त्यामुळेच हे चित्रपट परिचयाचे, ओळखीचे वाटतात. काही प्रमाणात कौतुकास्पद ठरतात पण व्यापक पातळीवर पोहचत नाहीत. 'फिल्मोत्सवा'तील इतर काही महत्त्वाच्या परदेशी चित्रपटांप्रमाणे ते अस्वस्थ करीत नाहीत. □


४ लाख ६३ हजार वाचकांची एकमुखी प्रशंसा

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

लेखक : वि. ग. कानिटकर

॥ पृष्ठसंख्या ५४० ॥ मोठा डबल क्राउन आकार ॥ भरपूर छायाचित्रे ॥

॥ मूळ किं. १४० रु. ॥ सवलतीत ९५ रु. ॥


चौथ्या डिलक्स आवृत्तीचे खास आकर्षण

**माइन काम्फ**

या हिटलरच्या दुर्मिळ आत्मचरित्राची सचित्र ओळख

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.



# आजचे कवी

**खरातांच्या कवितांमधून कल्पनाचमत्कृतीचा, अनुप्रास, यमकांचा अवाजवी हव्यास दिसत असला तरी त्यांची भाषा एकंदरीत अनुभवानुरूप, सहज व प्रवाही अशी आहे.**

¤

**लेखांक सात**

**अविनाश सहस्रबुद्धे**

¤

**ह.** शि. खरात हे जवळपास १९७० पासून काव्यलेखन करीत आहेत. त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित होण्यास मात्र तब्बल पंधरा वर्षे लागली. त्यांच्या कवितासंग्रहाचे नाव आहे स्वप्नवास्तव. त्यांच्या कवितेतूनही त्यांची वास्तवाला न्याहाळणारी त्याचबरोबर या वास्तवापलिकडचे स्वप्नपातळीवरचे विश्व पहाणारी काव्यदृष्टी आपल्याला पहायला मिळते. त्यामुळे संग्रहाचे 'स्वप्नवास्तव' हे शीर्षक अर्थपूर्णच आहे. त्यांच्या कविता वाचतानाही या कवीकडे स्वप्न पहाण्याची क्षमता आहे; परंतु त्याचबरोबर स्वप्नांना छेद देणारे समाजवास्तवही त्याने सूक्ष्मपणे पाहिले आहे हे कळते. आक्रस्ताळी कवितेच्या व सवंग लोकप्रियतेच्या काळात खरातांसारख्या दलित कुटुंबात जन्माला आलेल्या कवीने अशी शांतोदात्त व समंजस दृष्टीची कविता लिहावी हे विशेष आहे. संग्रहातील कवितेत सामाजिक जाणीव नाही असे नाही. ती तर आहेच, पण ती अकलात्मक, ढोबळ किंवा बटबटीत, भडक नाही. ही सामाजिक जाणीव 'गाव राहिला नाही गाव' 'आदिम अंधार,' 'बाकी इतिहास' इत्यादी कवितांमधून प्रकर्षाने दिसते.

या संग्रहातील पहिल्याच 'जेव्हा पडतो पीळ मनाला' या कवितेत कवी म्हणतो.

> जेव्हा पडतो पीळ मनाला
> तेव्हा ये शब्दांना किंमत
> तेव्हा नाही म्हणावयाला
> मातीलाही होते हिम्मत.

येथे शब्दप्रक्रियेचा किंवा सृजनशीलतेचाच विचार फक्त अनुस्यूत आहे असे नाही तर आपल्याला जाचणाऱ्या व्यवस्थेला नकार द्यायचा आहे. प्रस्थापित अशी जी रचना जोखडासारखी आपल्या मानेवर बांधली आहे ती झुगारून द्यावयाची आहे याची जाणीव इथे आहे, पण तसे करताना मनाला पीळ पडून व त्यातून शब्द हुंकारल्याशिवाय म्हणजेच आपली अभिव्यक्ती कलात्मक झाल्याशिवाय गत्यंतर नाही हेही कवीला ठाऊक आहे. आणि मला वाटतं कवितामाध्यमासंबंधीचा हा दुहेरी विचारच अत्यंत महत्त्वाचा व मोलाचा आहे. खरातांनी हा विचार डोळसपणे स्वीकारला आहे हे त्यांची कविता वाचताना सहजपणेच जाणवते.

संग्रहातील काही कविता कवीची जीवनदृष्टी स्पष्ट करणाऱ्या आहेत. 'प्रवास' 'जीवनगाथा' 'भविष्य' या अशाच काही कविता. 'प्रवास' कवितेत कवी शेवटी उध्वस्ततेची जाणीव पुढील ओळींमधून व्यक्त करतो.

> आता डोळयांना अंधारी आली तरी
> गांधारीचा भाळी प्रवास
> आता पुढे आभाळे नाहीत नाही कसलाच भास.

असे असले तरी कवीचा पिंड जीवनावर श्रद्धा ठेवणारा आहे याची साक्ष अनेक कवितांमधून मिळते. अशी श्रद्धा असल्यामुळेच कवी 'मेल्याहून मेलेल्यांना' कवितेत 'रुजे मातीत हिरवा, मंत्र जगण्याचा भोळा' असे आवर्जून सांगतो. 'हुडकाव्या मातीतल्या नित्य नव्या जन्मखुणा' ही कवीची जीवनदृष्टी आहे. ही जीवनदृष्टी अंगिकारली की मग जीवनातील विविध अंगांमधले द्वंद्व नाहीसे होते.

'जीवनगाथा,' 'नामांतर' आणि 'आदिम अंधार' या कवितांमधून कवीने सामाजिक वास्तवाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे.

> जन्मानंतरचा काळोख
> मी भोगतोय आज
> माझ्यावर लादलेला
> ह्या देशातल्या माणसांनी
> त्यांच्या इतिहास–रूढी–संस्कृतींनी
> ह्या काळोखाला रक्ताचा वास आहे.

'आदिम अंधार' मधील ह्या ओळींमधून कवीने दलित जीवनाला वेढून उरलेल्या आदिम अंधाराचे वर्णन केले आहे व त्यातूनच आपल्या दलित मनाची व्यथा व्यक्त केली आहे. इथली जमीन, इथली झाडे, इथले पक्षी माझे आहेत, मग इथली माणसे माझी का नाहीत? ' असा प्रश्नही तो प्रस्थापित समाजरचनेला, वर्णव्यवस्थेला विचारतो. 'नामांतर' कवितेत कवीने नामांतराच्या प्रश्नावरून पेटलेल्या आंदोलनानंतरच्या तिथल्या उध्वस्त दलित जीवनाचे चित्रण केले आहे. समाजवास्तवाचे दर्शन घडविणाऱ्या या कवितांमधून कवीने समूहविषयक जाणीव व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. 'स्वयंभू' कवितेत कवीने आजच्या भ्रष्ट राजकारणाचे, संधिसाधू राजकीय नेत्यांचे वर्णन केले आहे. त्यांची आजची अवस्था पुढील ओळींमधून आपल्याला पहायला मिळते.

> भुंकणारे सारेच स्वयंभू नसतात
> काही भुंकताना शेपटचा हलवतात.
> काही छू म्हणून भुंकवले जातात
> काहींचे आवाज गळयात गुदमरतात
> गळयातील पट्टयामुळे.

खरातांची कविता ही या भांडवली समाजरचनेत ज्यांना सामाजिक, आर्थिक न्याय नाकारला गेला आहे अशांसाठी लढणारी, 'विद्रोह' करणारी कविता नसली तरी अशा शोषित वर्गाविषयीची अपार

सहानुभूती त्यांच्या कवितांमधून व्यक्त होताना दिसते. खरातांचे अनुभवविश्व त्यांना विद्रोहाकडे घेऊन जाताना दिसत नाही म्हणून त्यांची कविता ही ' विद्रोही ' कविता नाही. त्यामुळे ती त्वेषाने मूठ आवळणारी कविता नाही. ती त्यांना दिसलेल्या समाजवास्तवाचे प्रांजळपणे दर्शन तेवढे घडवते. ' मानवता ' हे मानवी समाजाचे अंतिम मूल्य असते ही कवीची जीवनदृष्टी आहे आणि ही जीवन-दृष्टीच या कवितांना आधार देताना दिसते. ' प्रार्थना ' या कवितेत कवी म्हणतो—

माळ—मातिच्या मनात माझ्या
तुझे फुटू दे हिरवे पाते
अन् डोळ्यांच्या दवात माझ्या
तुझी घुमू दे आभाळ-गीते.

जीवनावरील उत्कट श्रद्धेतून कवीला लागलेला हा ध्यास आहे आणि तो अखेरीस मानवतेच्या मूल्यातूनच पूर्ण होणार आहे.

' जांभळीच्या खाली ' या चौथ्या कविते-पासून ' गव्हाळगोरी ' कवितेपर्यंत दहा प्रेमकवितांची मालिका कवीने गुंफली आहे. प्रेमकवितांची ही मालिका ग्रामीण जीवनाचा रंग घेऊन आलेली आहे. त्यांचा एकूण ढंगच रूढ प्रेमकवितांहून वेगळा आहे. अतिशय सहज, ओघवती, भावगर्भ अभिव्यक्ती हे या कवितांचे वैशिष्टच आहे. एखाद्या कवितेला लावणीचा ढंग आहे तर एखाद्या कवितेचे स्वरूप जानपदगीतांसारखे आहे. ' शुभ्र धुक्याची जांभई ' ' पावसातल्या कविता ' इ. कवितांमध्ये कवीने निसर्गाची सौंदर्यरूपे रेखाटली आहेत व त्यांच्या आधारे आपली प्रेमभावना व्यक्त केली आहे. काही कवितां-मधून कवीने प्रेमानुभवातून आलेली निराशा शब्दबद्ध केली आहे. उदाहरणार्थ पुढील ओळी पहा—

सूर्याला तू माळुन आलिस
बटांत खोवुन सूर्यफुले
जाताना परि जाळुन गेलिस
माझी हळवी चंद्रफुले...
तेव्हापासुन जळतो आहे.
पशापशाने घालित फुंकर
फुलवेड्या मम जखमांवरती
जरी जळाले माझे अंबर

निसर्गातील संवेदना शब्दांकित करताना कवीने योजलेल्या प्रतिमांतून त्याची तरल, नाजूक कलादृष्टी जाणवत रहाते. काही वेळा निसर्गातील प्रतिमांतून शृंगाराचा अनुभव कवी व्यक्त करतो. ' आभाळाच्या भाळी ', ' पुनव ' इ. कवितांकडे दृष्टिक्षेप टाकता याचा अनुभव येईल. त्यातील काही कवितांचा घाट पु. शि. रेग्यांच्या कवितांची आठवण करून देतो. ' गव्हाळगोरी ', ' गावरान तू ', ' देशावरली मनात भरली ' या कवितांना ग्रामीण जीवनाचा रंग लाभलेला आहे. काही ओळी लावणीचा घाट घेऊन येतात. उदाहरणार्थ—

पन्हळ पाठिची चोळि गाठिची
ठसठसले ग मनी
तरणीताठी होइल साठी
ठसका मारिल कुणी

राधेची सनातन प्रतिमा कवीने काही प्रेमकवितांमध्ये वापरली आहे. ' ती निमगोरी ' ही कविता त्या दृष्टीने विशेष लक्षणीय अशी कविता आहे. ' असेच झाले होते घुसळण ' या कवितेतही राधेची अत्यंत



### हनुमान शिवराम खरात

जन्म २०.५.१९३४ रोजी लोणंद (जि. सातारा) येथे. शिक्षण एम. ए. सध्या बी. ई. एस. टी. त नोकरी. १९५६ पासून कविता-लेखनास सुरुवात. ' माझे घरटे झाडीत ' ही पहिली कविता ' स्वराज्य ' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली. सत्यकथा, साधना, संदर्भ, अभिरुची, युगवाणी, प्रतिष्ठान, अस्मितादर्श इ. नियतकालिकांतून कवितांना प्रसिद्धी. त्याशिवाय बालकविता, विनोदी एकांकिका, नाटक—चित्रपटांवरील लेखनास अनेक नियतकालिकांतून प्रसिद्धी. ' हॅट खाली डोकं असतंच असं नाही ' हा फार्स आत्माराम भेंडे ह्यांनी रंगमंचावर आणला. आकाशवाणीच्या मुंबई केंद्रासाठी ' पुन्हा प्रपंच ' नावाची मालिका दोन-अडीच वर्षे लिहिली, ' मुक्याचे अभंग ' हा कवितासंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर. ' स्वप्नवास्तव ' हा पहिला कवितासंग्रह १९८१ साली प्रकाशित. पत्ता : बी ३३ । १३१ सिद्धार्थनगर, गोरेगाव (प.) मुंबई ६२.

### ती निमगोरी

ती निमगोरी मनात कोरी
अद्भूताची सुंदर लेणी
भुऱ्या बटांच्या गुंफांमधली
वाऱ्याला परि कळते वाणी

ती निमगोरी मनात चोरी
मुरलीमधली खटयाळ गाणी
अन् कृष्णाच्या ओठांवरले
फक्त सनातन उष्टे लोणी

ती निमगोरी मनात होरी
असता खेळत भर माध्यान्ही
डोळ्यांमधली भोळी गवळण
मृगजळातले भरते पाणी

ती निमगोरी हळवी भारी
फुलासारखी गंधवावरी
चांदण्यात परि फिरता फिरता
उन्हात होते गोरीमोरी

### फकिरी

जन्मताच रे दिलीस हाती
चुकून या शब्दांची झोळी
तेव्हापासुन फकीर झालो
निळ्या नभाची मशीद झाली

तेव्हापासुन नग्न मनाला
शुभ्र धुक्याची फासुन रक्षा
तुझा हवाला देउन फिरतो
नक्षत्रांची मागत भिक्षा

भणंग फिरतो माळांवरती
घालूनिया स्वप्नांची कफनी
प्राशत बसतो मृगजळातले
मातीच्या डोळ्यांनी पाणी

जन्मताच रे दिलीस हाती
चुकून या शब्दांची झोळी
तेव्हापासून फितूर झाल्या
कवितेच्या मज चारच ओळी.

भावपूर्ण 'प्रतिमा आपल्याला पहायला मिळते.

परी अचानक सहज भेटला
सखी, सखा ग वादळवारा
ससारातुन उठली उठली
जननिंदा छळ करिते सारा

अशी राधेची होणारी भावव्याकुळ स्थिती मनाला चटका लावून जाते.

ती निमगोरी मनात होरी
असता खेळत भर माध्यान्ही
डोळयामधील भोळी गवळण
मृगजळातले भरते पाणी

अशा सुदर ओळी 'ती निमगोरी' कवितेत भेटतात. 'मृगजळातले भरते पाणी' या एका ओळीतून तिच्या मनाची व्यथा, मनाच्या सैरभैर वृत्ती आणि त्यातून उमटणारी प्रवाही लय व्यक्त होते. खरातांचे वैशिष्टय हे की, कधी ते राधेसारखी सनातन प्रतिमा ही तिला नवे भावलेणे चढवून वापरतात तर कधी खडी फोडणाऱ्या कष्टकरी स्त्रीची प्रतिमाही तितक्याच समर्थपणे वापरतात.

तिच्या डोळयात तो उतरतो
साऱ्या आठवणीचे काहूर घेऊन
खडी फोडताना गळतो तिच्या
चोळीत रक्ताचा खारट घाम होऊन.

या ओळीमधून व्यक्त होणारी या कष्टकरी स्त्रीची व्यथा आणि राधेची व्यथा एकच आहे.

'स्वप्नवास्तव' सग्रहातील अनेक अभंगकविताही अशाच उल्लेखनीय आहेत. काही विशिष्ट अनुभवाना अभिव्यक्ती देताना कवीला सतकवीच्या अभंगाचा घाट जवळचा वाटला असावा. कारण परपरेने अभंगाचे अशा अनुभूतीशी नाते आहे. कवीने अभगाचा घाट स्वीकारताना त्यातील शब्दकक्षाही (उदा: दिठी, झोबी, मृदुग–टाळ, घिड इ.) स्वीकारलेली दिसते 'सूर फुटताना', 'घिड' 'आषाढी' या अभंगकविता क्षणखणीत शब्दकळा व बोचरा उपरोध या गुणांनी नटलेल्या आहेत. 'आषाढी' कवितेत कवीचे श्रद्धाशील मन आपल्याला दिसते. 'सूर–फुटताना' ही लक्षणीय अभगकविता आहे.

सूर फुटताना
मातीला ये बळ
माडीमध्ये कळ
आभाळाची.
सूर विझताना
मालवतो दिवा
दूर जातो रावा
देहातून

या दोन्ही कडव्यांमधून मनभर दाटून आलेली कातरता, नेमक्या शब्दकळेतून व्यक्त होताना दिसते.

खरातांच्या काही कवितामधून कल्पनाचमत्कृतीचा, अनुप्रास, यमकांचा अवाजवी हव्यास दिसत असला तरी त्यांची भाषा एकंदरीत अनुभवानुरूप, सहज व प्रवाही अशी आहे. योडक्यात ज्याच्या पुढील काव्यप्रवासाकडे आशेने, कुतूहलाने पाहावे अशा कवीचा हा पहिला काव्यसंग्रह आहे. भविष्यातील त्याची वाटचाल उज्ज्वल असणार आहे अशी ग्वाही देणारी ही कविता आहे.

---

नाटयसंमेलन–पणजी

## निवडणुका आणि कार्यपद्धतीत बदल होणार का ?

वि. भा. देशपांडे

डिसेंबर–जानेवारी महिन्यापासून अनेक प्रकारच्या संमेलनाचे वातावरण आरंभित होत असते. विविध विषयांची छोटी–मोठी समेलने आपापल्या ताकदीनुसार संपन्न होत असतात. त्यामध्ये ज्या समेलनाची मोठ्या प्रमाणात जाहीर चर्चा होत असते ती म्हणजे साहित्यसंमेलन आणि नाटयसमेलन. सध्या साहित्यसमेलन अंतर्गत कारवायामुळे अमाप प्रसिद्धी मिळवून आहे. तुलनेने नाटयसमेलनाचे आरंभीचे घोळ तरी झालेले नाहीत.

यंदाचे संमेलन हे ६४ वे नाटयसमेलन आहे. गोव्यात–पणजीला भरणारे समेलन ४,५ आणि ६ फेब्रुवारीला संपन्न होत आहे. अध्यक्षा आहेत श्रीमती ज्योत्स्नाबाई भोळे. या वर्षी त्याचे नाव अध्यक्षपदासाठी आले आणि त्याना कोणताच विरोध न होता सर्वमान्यता मिळाली. ज्योत्स्नाबाईंची अविरोध निवड याला दोन दृष्टींनी अर्थ आहे. एक तर अध्यक्षाची निवड अविरोध होण्याने निवडणुकीचे सोपस्कार वाचले. ताणतणाव निर्माण होण्याचा प्रश्नच आला नाही. दुसरे म्हणजे अविरोध निवड करून ज्योत्स्नाबाईंचा सन्मान राखला गेला. त्यानी रंगभूमीवर जी कामगिरी केली त्याचा बहुमान झाला. पन्नास वर्षांपूर्वी (१ जुलै १९३३) 'आंधळयाची शाळा' नाटकाच्या निमित्ताने त्यांनी रंगमचावर प्रवेश केला. त्यानतर अनेक भूमिका करून आपली कलात्म मुद्रा रगभूमीवर प्रस्थापित केली. त्याचे सुरेल गान, स्मरणीय अभिनय अणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व रगभूमीचा ताजेपणा राखण्यास कारणीभूत ठरले. अशा कलावतीचा बहुमान राखणे उचितच होते. जेव्हा ज्योत्स्नाबाईंचे नाव अध्यक्षपदासाठी आले त्या वेळी ज्याना कल्पना नाही अशा काही महत्त्वाच्या लोकांनाही अध्यक्षपदासाठी खाजगीत विचारणा झाली होती; पण त्यांना जेव्हा ज्योत्स्नाबाईंचे नाव या पदासाठी आहे असे कळले तेव्हा त्यांनी सविनय आपले नाव आपणहून दूर केले. यातच सारे काही पावले. नाटयसंमेलनाचे हे उदाहरण इतरेजनाना खूप काही सांगून जाणारे, शिकवणारे असे आहे!

नाटयसमेलन जवळ आले की ज्या काही प्रश्नाची आवर्तने झडतात त्यामध्ये ही समे-

लने कशासाठी भरवायची हा एक मध्यवर्ती सूर असतो. यातून काय साधते वगैरे चर्चा सुरू होते. मला वाटते अशी चर्चा करण्यात आता मतलब राहिलेला नाही. कारण ही संमेलने आता सरळ सरळ आनंदसोहळे म्हणूनच भरत असतात. संमेलन भरवणारांनी आणि त्याला आवर्जून जाणारांनी अकारण भ्रामक कल्पना घेऊन जाऊही नये आणि आपला भ्रमनिरास झाला म्हणून ओरडाही करू नये. एकदा आनंदसोहळा ही कल्पना मान्य केल्यावर अनेक गुते कमी होतात. या आनंदसोहळयात दोन स्तरावरचे लोक अपेक्षित असतात. एक तर नाटयसंमेलन असल्यामुळे नाटयक्षेत्राशी संबंधित असलेले तिथे यावेत अशी अपेक्षा असते आणि जे नाटयप्रेमी असतात त्यांनी बहुसंख्येने यावे अशीही अपेक्षा असते. यदा गोव्यासारख्या रम्य ठिकाणी संमेलन असल्याने मोठ्या प्रमाणात नाटयप्रेमी येतील अशी शक्यता आहे. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष रंगभूमीमध्ये निरनिराळ्या स्तरांवर कार्य करणारे अनेक कलावंत येतील अशीही अपेक्षा आहे. निदान संयोजकानी जो कार्यक्रम जाहीर केला आहे, ज्या विषयावर चर्चा, परिसवाद आयोजित केले आहेत, त्यामध्ये रंगभूमीतले अनेक महत्त्वपूर्ण लोक आहेत. व्यावसायिक रंगभूमी प्रायोगिक रंगभूमी, बालरंगभूमी, रंगभूमीच्या मुळाचा शोध आदी विषय त्यामध्ये आहेत. ह्या विषयांसाठी वसंत कानेटकर, दारव्हेकर, भालचंद्र पेंढारकर, रत्नाकर मतकरी, सतीश आळेकर, श्रीधर राजगुरु, वि. भा. देशपाडे, सुरेश खरे, सुधा करमरकर, अमोल पालेकर, विजया मेहता अशी किती तरी नावे जाहीर झालेली आहेत. सामान्यत. संयोजकांनी ह्या व्यक्तींच्या संमतीने, निश्चित होकार घेऊनच नावे जाहीर केलेली असणार. अनेकदा असे घडलेले आहे की, जाहीर झालेली नावे आणि प्रत्यक्षातली नावे यात बराच फरक पडलेला आढळतो. एवढ्या नावात एक-दोन नावे ऐनवेळी काही कारणाने बदलली किंवा अनुपस्थित राहिली तर समजू शकते; पण ही सख्या मोठी झाली तर सर्वांचाच विरस होतो. गोव्यात तसे घडणार नाही असे वाटते. पाहू या काय होते ते !

या संमेलनात नेहमीप्रमाणे अनेक ठराव येतील आणि नेहमीच्या पद्धतीने पसारही होतील. कोणते ठराव आले आहेत याची मला कल्पना नाही; पण संमेलनाच्या संदर्भात एक महत्त्वाचा बदल घडावा असे सुचवावेसे वाटते. तो बदल म्हणजे अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा आणि त्याच्या कार्यपद्धतीचा. म्हणजे असे की, सध्या संमेलनासाठी जो अध्यक्ष निवडला जातो तोच नाटय परिषदेचा अध्यक्ष म्हणून वर्षभर काम करतो, त्याला करावे लागते. आता तो किती कार्य करतो किंवा परिषदेला त्याचा किती उपयोग होतो हा प्रश्नच आहे. कारण अलीकडच्या काही वर्षांत जे लोक नाटयसंमेलनाचे अध्यक्ष झाले आहेत त्यांची वये, शरीर अवस्था, त्यांचे कलावंत म्हणून असलेले व्याप पाहता ते काही करू शकतात असे दिसत नाही. तसा त्याचा दावाही नसतो आणि शक्यताही नसते. म्हणूनच दोन अध्यक्ष भिन्न ठेवावेत. परिषदेचा अध्यक्ष तीन वर्षांसाठी असावा. त्या अध्यक्षाची निवड एखाद्या जाणत्या समितीने ज्येष्ठताक्रमाने करावी. त्या पदासाठी होणारी निवडणूक आणि त्यामागचे राजकारण टाळावे. संमेलनाचा अध्यक्ष होणे म्हणजे त्याच्या नाटयकार्याचा बहुमान करणे असा अर्थ यायला हवा. त्याच्याकडून अन्य कार्याची, धावपळीची अपेक्षा करण्यात मतलब नाही.

अशा अनेक अर्थांनी गोव्याच्या नाटयसंमेलनाकडून काही व्हावे अशी अपेक्षा आहे. काय काय घडते ते प्रत्यक्षात कळेलच त्यानंतर सारा वृत्तांत कथन होईलच.

□

रंगभूमी

# किमया

२१ जानेवारीला दोन महत्त्वपूर्ण व्यक्तींची स्मरणे कार्यक्रमाच्या रूपाने सादर झाली. त्यातले पहिले स्मरण होते माधव आचवल याचे. आचवल हे जसे कलासमीक्षक म्हणून सर्वमान्य होते, तसेच ते मुळात वास्तुशिल्पज्ञ होते. खरे तर ते आणखी खूप काही होते. त्याना ललितकला, वाङ्मय, वास्तू अशा किती तरी गोष्टींमध्ये खोलवर जाण होती. त्याची साक्ष त्याच्या लेखनातून सतत ध्यानी येते. अशा संवेदनक्षम कलावंताचे अकाली निधन झाले. या कलावंताचा स्नेह आणि जाणकारीची आस्था असणारामध्ये पु. ल. देशपाडे आणि सुनीताबाई हे दोघेजण आहेत. त्यानी आचवलाना ५१ हजाराची रक्कम देऊ केली. या रक्कमेतून आचवलानी आपले कलास्वप्न साकार करावे अशी अपेक्षा. पण तसे घडणे नव्हते. या रकमेसंबंधीचे पत्र मिळण्याआधीच आचवलावर मृत्यूने आघात केला होता. या रकमेचा विनियोग करण्याची एक वेगळी कल्पना पुढे आली. आचवलाच्या नावे फर्ग्युसन महाविद्यालयात एक सांस्कृतिकभवन उभारावे. पु. लं. नी दिलेली देणगी आणि महाविद्यालयाने आणखी काही रक्कम एकत्रित करून 'किमया' नावाचे सांस्कृतिक भवन फर्ग्युसनमध्ये आता आकाराला आले आहे.

या भवनाचा उद्घाटनसमारंभ ( शनिवारी २१ जानेवारीला) प्रा. गगाधर गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. गाडगीळ हे आचवलाचे निकटचे स्नेही. त्यानी तितक्याच आस्थेने आठवणी सागून आचवलाचे व्यक्तित्व उभे केले. औपचारिक उद्घाटनानंतर मनोरंजनाचा एक आटोपशीर आणि सूत्रबद्ध कार्यक्रम पेश केला गेला. त्यामध्ये सतूरवादन, नाटयगीते, भरतनाटयम, बदकांचे गुपित ही संगीतिका पेश झाली. याबरोबरीनेच पु. ल. देशपांडे यानी माधव आचवलाच्या 'किमया' पुस्तकातील घरांवरचा एक उत्तम लेख वाचला. आचवलांची सौंदर्यदृष्टी, लेखनशैली किती खोलवर परिणाम करणारी आहे याची साक्ष पटली.

या समारंभाला आलेले लोक पाहिल्यावर असे वाटले की, हे छोटेसे साहित्यसंमेलनच भरले आहे. इतकी माणसे आली ती आचवलाच्या प्रेमाने हे तर उघडच आहे; पण पु. लं. नी ज्या कलावंताच्या जाणकारीला दाद देऊन भली मोठी रक्कम एक हाती देण्याचे जे औदार्य दाखवले त्यालाही ती उत्स्फूर्त दाद होतीच !

'किमया' हे वास्तुशिल्प नेहमीपेक्षा वेगळे आहे केवळ आकाराने नव्हे तर एकूण सकल्पनेच्या हिशेबातही निराळे आहे. ते आवर्जून पाहावे असे आहे. दर्शनी या वास्तू-

तले वेगळेपण काहींना जाणवणार नाही; पण काळजीपूर्वक आणि आस्थेने ही वास्तू पाहिली तर तिचे वेगळेपण निश्चितच जाणवेल. चहूबाजूने उघडी असलेली वास्तू आपल्याला हवी तशी वापरता येईल अशी आहे. मुख्यत: या ठिकाणी युवकांनी येऊन आपल्याला जे सांस्कृतिक कार्यक्रम करावयाचे असतील ते करावेत अशी कल्पना आहे हे बंदिस्त सभागृह किंवा प्रेक्षागृह नाही. त्यामुळे कार्यक्रम सादर करताना तो विचार ध्यानी घ्यावा लागेल. ज्याना कोणाला काव्यवाचन, पथनाट्य, नाट्यवाचन, कथाकथन अशा प्रकारचे सुटसुटीत कार्यक्रम करावयाचे आहेत त्यांना हे केन्द्र सोईचे आहे.

खरे तर या केन्द्राच्या भवती थोडेफार कुपण घालून, चागली फुलझाडे लावून हा परिसर आहे त्यापेक्षाही अधिक चांगला करवून घेता येईल आताही भवतीच्या निसर्गाचे म्हणजे उत्तम वृक्षाचे मूळ रूप कायम ठेवून वास्तू बाधली आहे; पण याचा अधिक उपयोग करण्यासाठी काही बंदोबस्ताची गरज आहे. या सुधारणा यथावकाश फर्ग्युसन महाविद्यालयाचे अधिकारी करतीलच; पण आज आहे त्या वास्तूचा वापर कसा करायचा तो युवकानी आणि एकूणच सास्कृतिक कार्य करणाऱ्यानी ठरवायला हवे. नवे आव्हान स्वीकारायला हवे. ◻


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : **सौ. वीणा गवाणकर**
दुसरी आवृत्ती
मूल्य : तीस रुपये
**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पुणे ३०


## स्वरानंदचे 'आधी बीज एकले'

याच शनिवारी (२१ तारखेला) रात्री १० वाजता भरत नाट्य मंदिरात एक कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाचे निमित्त होते शाताराम आठवले यांचे स्मरण. त्यांना जाऊन आता काही वर्षे लोटली. जर ते आज असते तर त्याचा अमृतमहोत्सव साजरा झाला असता शातारास आठवले हे नाव अनेकाच्या विस्मृतीत गेलेले; पण काहींच्या दीर्घकाळ स्मरणात असलेले! एक कवी, दिग्दर्शक आणि लेखक म्हणून त्यांची कामगिरी मोलाची आहे विशेषत: ज्याना प्रभात फिल्म कंपनीचे चित्रपट आणि त्यातली गाणी स्मरणात असतील त्याना शातारास आठवले याची कामगिरी नव्याने सांगण्याची गरज नाही. एक मनस्वी, माध्यमाची नेमकी जाण असलेला हा प्रतिभावंत होता. प्रभातच्या कलात्म यशात यांचा वाटा निश्चितच महत्त्वाचा आहे.


'प्रभातकाला'तील चित्रपटाचे सूत्र पकडून आणि शातारास आठवले याच्या रचना केन्द्रवर्ती ठेवून पुण्याच्या 'स्वरानद' या संस्थेने 'आधी बीज एकले' या नांवाचा कार्यक्रम पेश केला. या संस्थेने यापूर्वी 'चैत्रबन' तसेच सावरकरांच्या जीवनावरील काव्याचा, असे महत्त्वपूर्ण गीत कार्यक्रम पेश केलेले आहेत. या संस्थेने अशा कार्यक्रमाची स्वत:ची एक प्रतिमा निर्माण केली आहे. या प्रतिमेला साजेल अशाच योग्यतेचा 'आधी बीज'...हा कार्यक्रम झाला. या शीर्षक रचनेमुळेच शातारास आठवले याना अमाप प्रसिद्धी मिळाली होती. त्यामुळे ते नाव वापरणे औचित्याचे होते.

या कार्यक्रमात सत तुकाराम, रामशास्त्री सत ज्ञानेश्वर, शेवग्याच्या शेंगा, शेजारी, माझा मुलगा, सुभद्राहरण, दहा वाजता, वहिनीच्या बागड्या, गोपालकृष्ण, बेबी, मर्द मराठा अशा अनेक जुन्या मान्यवर चित्रपटातील गाणी निवडली होती अशी गाणी ऐकताना अनेक गोष्टी डोळ्यांसमोर येतात. एकतर जुनी शब्दरचना, गाण्याना दिलेल्या चाली आणि त्या सगळ्यातून जाणवणारे काळाचे दर्शन महत्त्वाचे असते. मास्तर कृष्णराव, भोळे, श्रीधर पार्सेकर, वसंत पवार, राम कदम आणि सुधीर फडके अशा मातब्बरानी या गाण्याना दिलेले सगीत किती साधे, सोपे आणि अर्थपूर्ण आहे तेही जाणवत होते. या जुन्या गीतामध्ये शब्दाला किती अचूक महत्त्व आहे तेही प्रत्ययाला येत होते.

स्वरानंदने पेश केलेल्या कार्यक्रमाला एक विशिष्ट दर्जा होता. याचे मुख्य कारण त्यानी निवडलेली गाणी ही त्याच्या अभिरुचीची उत्तम साक्ष देणारी आहेत. अर्थात नुसती निवड चागली असून भागत नाही तर त्याचे सादरीकरणही तितकेच तोलाचे असावे लागते. तसे ते होते. प्रत्येक गीताच्यावेळी वाद्यवृदाचा केलेला वापर किती परिश्रमपूर्वक आणि परिणामकारी आहे ते ऐकताना जाणवत होते. गीत गाणारे गायक होते हरीष देसाई, सीमा भोपटकर, गिरीश जोशी सुनीता केळकर, सुमती रावळ, शिवराज वाघचौरे. सगीत नियोजक होता, हरीष देसाई. या गायकाच्या सुरेल गायनाला निवेदनाची साथ होती शैला मुकुद यांची. याच्या निवेदनात सहजता आणि एक प्रकारचे लाघव होते. त्याच्या प्रसन्न व्यक्तीमत्त्वामुळे आणि स्वच्छ, नेटक्या शब्दोच्चारामुळे निवेदन कोठेही अनावश्यक वाटले नाही. उलट मूळच्या कार्यक्रमाची रंगत वाढण्यास मदत करणारे ठरले. या सपूर्ण कार्यक्रमात महत्त्वाचे खटकले ते म्हणजे सर्व गायकमडळी गाणे म्हणताना हातात सतत कागद किंवा वही घेऊन उभी होती त्याची गरज नव्हती. त्यामुळे त्या गायकाची गाण्यातली स्वत च्या एकाग्रतेची गुतवणूक कमी होते, श्रोत्याचे लक्ष त्या कागदाकडे असत आणि मुख्य म्हणजे गायक–श्रोता याचा जिवत सवाद होताना अडथळा निर्माण होतो; पण हा भाग दुरुस्तीतला आहे. ती दुरुस्ती संयोजक प्रकाशक भोडे, हरीष देसाई आदी मडळी करतीलच. गतकालच्या गानस्मृती सानद जागवल्याबद्दल स्वरानदच्या कलाकाराना धन्यवाद. ◻

अकोला

# वेळूंचं कलाविश्व



आज साहित्य, काव्य, कविता, ललितकला, छायाचित्रे आणि नाटकासारख्या प्रयुक्त कला यांना उधाण आले आहे. याबाबतीत नवोदितांची सृजनशीलता उतू चाललीय. तशात पुन्हा त्यांना प्रस्थापित होण्याची घाई झालीय. समाजाने अशा कलेशी समरस झालेल्या कलावंताची दखल घ्यावी म्हणून जिवाचं रान करताहेत; पण दिलीप पंजावराव देशमुखांसारखा एखाददुसरा तरुण असाही असतो की, जो सवंग प्रसिद्धीला दाद देत नाही. केव्हाही बघा दिलीप स्वतःच्या वेळूकलेत हरवलेला. गरिबीने ज्याची जन्मापासून कधीही पाठ सोडली नाही आणि तरीही जिद्दीने बी कॉम. नंतर एलएल. बी. ची पदवी संपादन केली असा दिलीप एक सालस आणि समजदार युवक आहे. पतंगासाठी विविध लवचिक कमच्या तासता–तासता त्या वेळूच्या कमच्यामधील लवचिकता दिलीपच्या सृजनशक्तीला फुंकर घालून गेली. वेळू कमचीच्या सुतासारख्या पातळपट्ट्या, नंतर तारा तासून त्यांना स्वतःच्या कल्पनेनुसार विविध शिल्पासाठी उपयोगात आणणे ही मुळात अत्यंत कठीण व नाजूक बाब त्याला सहजसाध्य झालीय. साधी दाढीची ब्लेड, चाकू, स्टिकफास्ट, बांबू व आधारासाठी लाकडी फळी, बस एवढीच त्याची निर्मितीची साधनसामुग्री.

एकदा मी त्याच्याकडे गेलो असता कुडाच्या छोटचाशा घरात व रात्रीच्या वेळेस कंदिलाच्या प्रकाशात घरातील जमिनीवर विखुरलेल्या विविध शिल्पाकृतींपैकी डोंगा, डोली, विवेकानंद शिलास्मारक, जैनमंदिर, पुरातन लिखाणसाहित्य, कुरुक्षेत्रामधील कृष्णसारथ्य ही वेळू–शिल्पे मला दिसली. ती शिल्पे इतकी नयनरम्य, अप्रतिम, आणि मनोवेधक वाटली की, त्याचे वर्णन शब्दात करणं शक्य नाही.

'डोली' च्या दृश्यात, डोलीत बसून 'पिया के घर' निघालेल्या नववधूचा पदराआड दडलेला साजरा–लाजरा चेहरा पाहण्याचा आनंद पार्थिवातून सजीवाच्या साक्षात्काराची अनुभूती ठरतो. निर्जीव वेळूपट्ट्यातून जीवनातील सौंदर्याचा साधलेला कलासंगम अप्रतिम आहे.

विविध नमुन्यात 'विवेकानंद स्मारक' म्हणजे वेळूच्या पातळ तलम तारांचे अप्रतिम विणकाम होय. ज्या सागरातील खडकावर हे स्मारक आहे त्या सागरातील लाटांचो खटचाळ आणि काळचाकभिन्न भीमकाय खडकांची स्थितप्रज्ञवृत्ती वेळूच्या पातळ तंतूद्वारे अप्रतिम कलात्मक रीतीने अभिव्यक्त झालेली आहे.

'डोंगा' या शिल्पात डोंग्यावरील वेळूतंतूंची झोपडी व झोपडीतून डोकावणारी स्त्री व कंदिलाची प्रकाशमान वात वेळूच्या पातळ तारांनी बनवलेली आहे, ह्यावर घटकाभर विश्वासच बसत नाही, इतकी सजीवता आविष्कृत झालीय त्यात !

'कृष्णसारथ्य' ह्या कलाकृतीत कृष्णाच्या एका हातातील घोडयांचा चाबूक इतक्या सूक्ष्म वेळूतंतूचा आहे की, एकाग्र होऊन व जिवाचा डोळा करून बघितल्याशिवाय तो दिसत नाही; पण जेव्हा दिसतो तेव्हा तो संयमाचा चाबूक कृष्णरूपी सदसद्विवेक आपल्यावरही रोखतोय की काय, असे स्पंदन हृदयात सुरू होते. कृष्णसारथ्यवरील ध्वजाचे हवेत लहरणे वेळूच्या पातळ तंतूंनी कसे काय दाखविले असेल हे कुणासही गूढ बनवून राहील.

'सत्यम मंदिर' राजकपूरच्या सत्यम् शिवम् सुंदरम्मध्ये दाखविलेल्या मंदिराची प्रतिकृती पाहून चित्रपटाच्या अनेक घटना-प्रसंगांची आठवण ताजी करून जाते. या प्रतिकृतीत केवळ सव्वा सें.मि.ची स्त्रीप्रतिमा घंटा वाजवीत असतानाचे दृश्य असून पिंड, नंदी, ध्वज, जळणारा दिवा आणि घंटानाद करणारी स्त्रीप्रतिमा वेळूच्या माध्यमातून साकार करणारा हा कलावंत दर्शकांची मने जिंकल्याशिवाय राहत नाही.

'अकबर मकबरा–आग्रा' ही कलाकृती २'/२'' उंचीची असून ५'/५'' आकारात २४४ समान खिडक्यांचे कोरीव काम अप्रतिम आहे. तसेच जैनमंदिर, बौद्धमंदिर, मुक्तिधाम, हुतात्मास्मारक, पुरातन लिखाणसाहित्य, संगीतकार, बूटहाउस, फ्लॉवरपॉट हे कोरीवतेचे नमुने आहेत.

दिलीपने वेळूकलेसोबतच रांगोळी, विणकाम, भरतकाम, पेंटिंग, चित्रकला, छायाचित्रे यासारख्या कलाकृतीत यश प्राप्त केलं. शिक्षण, घरची जबाबदारी वेळू–कला त्याने सारख्या सांभाळल्या आहेत. सध्या ३२ कलावस्तू पूर्ण झाल्या आहेत. ५ पूर्ण झाल्यावर स्वतः प्रदर्शन आयोजित करण्याची त्याची इच्छा आहे. १९८२ साली सनद मिळवून त्याने व्यवसाय सुरू केला आहे. स्वर्गवासी श्री. पंजाबराव देशमुख हे मोहता मिलमध्ये काम करीत होते व त्यांचे १९८२ साली निधन झाल्यामुळे सर्वस्वी जबाबदारी दिलीपवर आली आहे.

अशा तरुण कलाकाराचे समाजाने कौतुक करणे आवश्यक आहे. दिसायला जरी क्षुल्लक गोष्टी असल्या तरी कलाकाराला त्या उपजीविकेचे प्रभावी साधन ठरू शकतात.

शांताराम सरदेशपांडे
अकोला

# उजव्या कम्युनिस्ट पक्षातील अंतर्गत संघर्ष

अभय गोखले

उजव्या कम्युनिस्ट पक्षातील अतर्गत सघर्षाने आता पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. १९६४ साली तात्त्विक मतभेदावरून पक्ष फुटून पक्षाची दोन शकले झाल्यावर उजवा कम्युनिस्ट पक्ष १९७८-पर्यंत कॉंग्रेसला पाठिंबा देत राहिला. मात्र मार्क्सवादी कम्युनिस्ट मात्र नेहमीच कॉंग्रेसला विरोध करत आले. भारतात क्राती घडवून आणायची असेल तर ती रशियनपद्धतीने घडवून आणावी असे उजव्या कम्युनिस्टाचे मत होते, तर मार्क्सवाद्याना चीनची पद्धत योग्य वाटत होती. कम्युनिस्ट पक्ष फुटण्यास हे एक महत्त्वाचे कारण असले तरी कॉंग्रेसला पाठिंबा द्यायचा का नाही यावाबत त्याच्यात तीव्र मतभेद निर्माण झाल्याने पक्ष फुटला. मात्र मार्क्सवाद्यानी नंतर आपले लक्ष पक्ष—उभारणीवर जास्त केंद्रित केले व आदेश कोणाकडून स्वीकारायचे यावाबत गोंधळ न घालता आपली सघटना बगाल, केरळ, त्रिपुरात बळकट केली. त्यामुळेच ते बगाल व त्रिपुरात राज्य करत आहेत, तर केरळमध्ये ते प्रमुख विरोधी पक्ष म्हणून वावरत आहेत. मार्क्सवाद्यानी नतर चीनलाही फारसे महत्त्व दिले नाही व आपला पक्ष बाहेरून आदेश न घेता स्वतत्रपणे वाढवला.

१९६४ साली उजव्या कम्युनिस्टानी कॉंग्रेसची कास धरल्यावर ते सरकारी कम्युनिस्ट बनले. कॉंग्रेसला पाठिंबा देण्याचा रशियाकडून त्याना आदेश आल्याने कॉंग्रेसच्या पाठीमागे ते सावलीप्रमाणे राहिले. १९६७ च्या निवडणुकात कित्येक ठिकाणी विरोधी पक्षाची सरशी झाली, परंतु उजव्या कम्युनिस्टाच्या मदतीने कॉंग्रेसपक्ष त्या सकटातून सहीसलामत बाहेर पडला. १९६९ साली कॉंग्रेसपक्षात जी फूट पडली ती उजव्या कम्युनिस्टामुळेच. कामराज, मोरारजी देसाई, निजलिंगप्पा, अशोक मेहता, वीरेंद्र पाटील इत्यादी सघटना—कॉंग्रेसवाले बाजूला झाले. त्याचे कारण उजव्या कम्युनिस्टानी आपली काही माणसे कॉंग्रेसपक्षात घुसवली होती, त्यानी सिंडिकेटवाल्याविरुद्ध इदिरा गाधीचे कान भरवले. शशिभूषण, अर्जुन अरोरा, आर. के. सिन्हा, के. आर. गणेश, बहुगुणा, रघुनाथ रेड्डी, चद्रजित यादव, एच. डी. मालवीय, नदिनी सत्पथी, मोहन कुमारमगलम इत्यादी अनेक हस्तक सी. पी. आय. वाल्यांनी केव्हाच कॉंग्रेसमध्ये घुसवले होते, तर यातील काही जणाची, आपण पुरोगामी आहोत हे दाखविण्यासाठी सी. पी. आय. ला सहानुभूती होती. मॉस्कोच्या मदतीने या हस्तकांकरवी प्रथम कॉंग्रेसपक्ष काबीज करून नतर सत्ता काबीज करण्याचा त्याचा डाव होता. या सी. पी. आय. च्या हस्तकानी निरनिराळे फोरम स्थापन करून मग मोरारजी, कामराज, निजलिंगप्पा याच्यावर आग पाखडायला सुरुवात केली. ते प्रतिगामी आहेत, भांडवलदाराचे हस्तक आहेत अशी आरडाओरड करून मग सिंडिकेटवाल्याचा काटा काढण्यात आला. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार सजीव रेड्डी याचा पराभव करण्याचा जो पराक्रम इदिरा गाधीनी केला, ते एकच कारण कॉंग्रेसफुटीस जबाबदार नव्हते. कम्युनिस्टांच्या मदतीमुळेच इंदिरा गाधी, व्ही. व्ही. गिरी या कामगारनेत्याला निवडून आणू शकल्या व सिंडिकेटवाल्याना धडा शिकवू शकल्या. सजीव रेड्डी हे सिंडिकेटचे असल्याने उजव्या कम्युनिस्टाना ते निवडून यायला नको होते. अशा प्रकारे कॉंग्रेसमध्ये आपल्याला नको असलेल्या लोकाची पक्षातून हकालपट्टी करण्यात उजव्या कम्युनिस्टाना यश आले १९६९ साली कॉंग्रेसची सिंडिकेट व इडिकेट अशी दोन शकले झाल्यावर मग लोकसभेत कॉंग्रेस (इडिकेट) अल्पमतात आले. त्या वेळेस अशा संधीची वाट बघणाऱ्या सी पी. आय. ने कॉंग्रेस (इडिकेट) ला पाठिंबा देऊन वेळ निभावून नेली. उजव्या कम्युनिस्टाना खूष करण्यासाठी इंदिरा गाधीनी चौदा बँकाचे राष्ट्रीयीकरण केले होतेच. कॉंग्रेसफुटीपासून १९७१ च्या लोकसभा निवडणुकापर्यंतचा काळ इडिकेट कॉंग्रेसच्या दृष्टीने कसोटीचा काळ होता. या काळात इडिकेट कॉंग्रेसला पाठिंबा देण्याच्या बदल्यात सी. पी. आयवाल्यानी आपले उखळ पाढरे करून घेतले. त्याचे जे हस्तक इडिकेट कॉंग्रेसमध्ये होते त्यानी या काळात जिवाची मुबई करून घेतली. बहुगुणा, चंद्रजित यादव, नदिनी सत्पथी, दास मुन्शी, मालवीय या सी पी. आयच्या इडिकेटमधील हस्तकानी या काळात बरीच मजा मारून घेतली. लवकरच इदिरा गाधीना बाजूला सारून मॉस्कोच्या आशीर्वादाने केंद्रात सत्ता काबीज करण्याची स्वप्ने ते पाहू लागले; पण इंदिरा गांधी त्याचे बारसे जेवलेल्या होत्या !

१९७१ मध्ये लोकसभेच्या निवडणुका इडिकेट कॉंग्रेसने प्रचड बहुमताने जिंकल्या. या निवडणुकात एवढ्या प्रचड यशाची खात्री नसल्याने इदिरा गाधीनी कम्युनिस्टाची मदत घेतली होती. या निवडणुकीत इतर विरोधी पक्षांबरोबर सिंडिकेटवाल्याचा पार कचरा झाला. त्यांचे मोठमोठे नेते पालापाचोळ्याप्रमाणे उडाले. इडिकेटबरोबर सी. पी. आयवाल्यानाही चांगले यश मिळाले. आता इंदिरा गाधीना सी. पी. आयवाल्याची फारशी गरज उरलेली नव्हती. मग त्यांनी सी. पी. आयला धडा शिकवण्याचे ठरवले. सी. पी. आयला धडा शिकवल्याने मॉस्कोची नाराजी ओढवून घेण्याचा प्रश्नच नव्हता. कारण इंदिरा गाधीना पाठिंबा देण्याशिवाय मॉस्कोला दुसरा पर्यायच नव्हता आणि स्वतःचे हित जपताना दोस्त राष्ट्रातील कम्युनिस्टाची काळजी करण्याचे धोरण रशियाने कधीच अगिकारले नाही. मागे नासेरने इजिप्तमध्ये तेथील कम्युनिस्ट पक्षावर बंदी घातल्यावरही नासेरचे व रशियाचे सबंध बिघडले नाहीत.

### सोशॅलिस्ट फोरम व नेहरू फोरम

इंदिरा गाधीनी आता इडिकेटमधील सी. पी आयच्या हस्तकाच्या कोल्हेकुईकडे फारसे लक्ष न देण्याचा निर्णय घेतला. मात्र त्यांना

धडा शिकवण्याची संधी त्या वाया घालवणार नव्हत्या. इंदिरा गांधीच्या पडत्या काळात सी. पी. आय. हस्तकांच्या ज्या पडद्यामागील हालचाली चालल्या होत्या त्याची इत्थंभूत माहिती त्यांच्याकडे होती; पण त्या वेळेस त्या असहाय्य होत्या. सी. पी. आयच्या हस्तकांनी, चंद्रजित यादव, शशिभूषण, अर्जुन अरोरा, के. आर. गणेश, मालवीय यानी सोशॅलिस्ट फोरमची स्थापना केली होती व ते त्याच्या आडोशाने कॉंग्रेसमधील तथाकथित प्रतिगामी, भांडवलदार नेत्यांवर भुंकत होते. मग त्याला उत्तर देण्याकरिता ज्या नेहरू फोरमची स्थापना करण्यात आली, त्या फोरमला इंदिरा गांधींनी उत्तेजनच दिले. नेहरू फोरमने मग सोशॅलिस्ट फोरमला त्यांच्याच भाषेत उत्तर देण्यास सुरुवात केली.

इंदिरा गांधींनी काही दिवस त्यांच्यात झुंज होऊ दिली व एक दिवस पक्षहिताकरिता दोन्हीही फोरम बरखास्त करण्याचा आदेश दिला यात त्यांना सोशॅलिस्ट फोरम नामशेष करावयाचा होता हे उघडच होते. सी. पी. आय. विरुद्ध त्यांनी उचललेले हे पहिले पाऊल होते. सी. पी. आय.च्या कॉंग्रेसमधील हस्तकांचे तोंड बंद केल्याने सी. पी. आय. वाल्यांना घुस्सा येणे सहाजिकच होते; पण त्याची पर्वा करण्याचे कारण इंदिरा गांधींना वाटत नव्हते. या सी. पी. आय.च्या हस्तकाविरुद्ध मोहीम उघडण्यात चंद्रशेखर, धारिया, कृष्णकांत, रामधन, शेरसिंग हे तरुण तुर्क आघाडीवर होते. या तरुण तुर्कांचाच उपयोग इंदिरा गांधींनी पूर्वी सिंडिकेटवाल्याविरुद्धही यशस्वीपणे करून घेतला होता. मात्र पुढे १९७४ मध्ये जयप्रकाशजींच्या आंदोलनाने वेग घेतल्यावर या तरुण तुर्कांनी त्यांच्याबद्दल ( जयप्रकाशजीबद्दल ) सहानुभूती दाखवली व ते इंदिरा गांधींच्या रोषास पात्र ठरले. याच सी. पी. आय.च्या कॉंग्रेसमधील हस्तकावर यशस्वीपणे तोफा डागण्याची कामगिरी या तरुण तुर्कांनी यशस्वीपणे बजावली हे नाकारता येणार नाही. बहुगुणा, चंद्रजित यादव, देवकांत बारुआ, रजनी पटेल, मालवीय या कम्युनिस्ट सहप्रवाशांना तरुण तुर्कांनी पळता भुई थोडी करून टाकली !

अलाहाबाद हायकोर्टाचा निकाल आपल्याविरुद्ध गेल्यावर इंदिरा गांधींनी १९७५ मध्ये आणीबाणीची घोषणा केली. जयप्रकाशांच्या बिहारमधील आंदोलनाला सर्व विरोधी पक्ष पाठिंबा देत असताना सी. पी. आय.वाले या आंदोलनाची प्रतिगामी व भांडवलदारांचे आंदोलन अशी हेटाळणी करत होते. त्यामुळे आणीबाणीची घोषणा झाल्यावर, विरोधी पक्षनेत्यांची धरपकड झाल्याने सी. पी. आय वाल्यांना सर्वांत जास्त आनंद झाला. विरोधी पक्षाचे जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखालील आंदोलन लोकप्रिय होत होते. त्यामुळे सी. पी. आय वाल्यांना त्यांचा हेवा वाटत होता व इंदिरा गांधींनीही त्यांच्याबाबतीतील सौम्य धोरण सोडून दिल्याने ते एकाकी पडले होते. त्यामुळे आणीबाणी म्हणजे इंदिरा गांधीबरोबर सी. पी. आय.वाल्यानाही वरदानच ठरले. आता ते विरोधी पक्षातील तथाकथित प्रतिगाम्यांवर निर्भयपणे हल्ले चढवू शकणार होते. रा. स्व. संघावर बंदी घालण्यात आल्याने सी. पी. आय.वाल्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्यांना आकाश ठेंगणे झाल्यासारखे वाटत होते. आता कॉंग्रेसच्या बुरख्याआडून ते प्रतिगाम्यांवर शरसंधान करू शकणार होते. इंदिरा गांधींच्या सहकार्याने आपले मनसुबे पार पाडण्यासाठी एवढी चांगली संधी त्यांना कधीच मिळू शकणार नव्हती.

परंतु ते उजव्या कम्युनिस्टांच्या नशिबात नव्हते. त्यांचे नशीबच फुटके ! आणीबाणीमध्ये इंदिरा गांधींचे सुपुत्र संजय गांधी फारच जोशात आले होते. त्यांच्या हुषारीचा, मुत्सद्दीपणाचा डंका भारतभर वाजत होता. भावी पंतप्रधान म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. सी. पी. आय.वाल्यांचा मनसुबा संजयच्या ध्यानी आला होता. त्याने आपला मोर्चा सी. पी. आय.कडे व त्यांच्या कॉंग्रेसमधील हस्तकांकडे वळवला. बहुगुणा, चंद्रजित यादव, नंदिनी सत्पथी, शशिभूषण इत्यादी नेत्यांवर त्याने आगपाखड करायला सुरुवात केली. सी पी. आय वाल्यांवर ते देशभक्त नसल्याचे आरोप करण्यात आले संजय गांधींच्या भोवती जो बन्सीलाल, विद्याचरण शुक्ला इत्यादींचा घोळका होता तो सी. पी. आय वाल्यांच्या विरोधात होता. सी. पी. आय.वाल्यांना इंदिरा गांधींच्या मदतीची आशा वाटत होती; परंतु संजयच्या सी. पी. आयवरील हल्ल्यास इंदिरा गांधींची पूर्ण संमती आहे हे कळण्यास त्यांना फारसा वेळ लागला नाही. अशा परिस्थितीत कॉंग्रेसला पाठिंबा चालू ठेवायचा का नाही या प्रश्नावरून पक्षात तीव्र मतभेद निर्माण झाले. संजय गांधीशी जुळवून घ्यावे असा सर्वसाधारण संकेत मॉस्कोहून मिळाला होता व पक्षातील डांगे, मोहित सेन, योगेंद्र शर्मा यांना संजय गांधीशी जुळवून घेण्यात कोणताच कमीपणा वाटत नव्हता; परंतु पक्षाचे सरचिटणीस सी. राजेश्वरराव यांना संजय गांधींच्या चाळ्यांचा, त्यांच्या बेलगाम वक्तव्यांचा उबग आला होता. कॉंग्रेसशी फारकत घेण्याचा दृढनिश्चय त्यांनी त्या वेळेस मनोमनी केला. त्याकरिता ते मॉस्कोचा आदेशही जुमानणार नव्हते. आणीबाणीतील अत्याचारामुळे कॉंग्रेस पक्ष बदनाम होत चालला होता. कॉंग्रेसला पाठिंबा देणारा उजवा कम्युनिस्ट पक्षही लोकमानसातून उतरला होता. कॉंग्रेसशी असलेले संबंध तोडण्याचा विचार करणारा एक गट उजव्या कम्युनिस्ट पक्षात आता जोर करू लागला होता; परंतु आणीबाणीमुळे तसे धाडस करता येत नव्हते.

## गणित चुकतच गेले !

इंदिरा गांधींचे गणित चुकले व त्यांच्या दुर्दैवाने व देशाच्या सुदैवाने १९७७ मध्ये त्यांनी निवडणुकांची घोषणा केली. जनता, इंदिरा गांधींच्या पक्षाला जबरदस्त धडा शिकवण्याकरिता योग्य संधीची वाट पहात होती व ती संधी आता चालून आली होती. सर्व विरोधी पक्ष जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली एकत्र होऊन, इंदिरा कॉंग्रेसचा पाडाव करण्याकरिता, भारतीय इतिहासात प्रथमच दृढपणे सज्ज झाले होते. जनतेला, त्यांनी इंदिरा कॉंग्रेसला पर्याय देण्याची आशा दाखवली होती. इंदिरा गांधींना पराभूत करणे हा त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न झाला होता. इंदिरा गांधींना पराभूत करणे हे एकमेव ध्येय त्यांच्यापुढे होते. कोण निवडून येते याबद्दल त्यांना फिकीर नव्हती. त्यांना इंदिरा गांधी व त्यांचा पक्ष नको होता. इंदिरा गांधींनाही ही निवडणूक सोपी नाही याचा अंदाज काही दिवसातच आला त्यांनी सी. पी आय.बरोबर आघाडी केली. जनतेने चवताळून इंदिरा गांधींना व त्यांच्या पक्षाला

निवडणुकीत चारीमुंड्या चीत केले ! त्याचा सहकारी पक्ष सी. पी. आय.चा तर पार पालापाचोळा झाला. सी. पी. आय.चे मोठे रथी–महारथी नेते निवडणुकीत केविलवाणेपणे पराभूत झाले. बंगाल, बिहार, केरळमधील सी. पी. आय चे बालेकिल्ले नेस्तनाबूत झाले ! एवढा जबरदस्त पराभव त्यांच्या वाट्याला कधीच आला नव्हता. लोकसभेतील त्यांच्या सभासदांची संख्या कधी नव्हे ती दहाच्या आत आली. आणीबाणीला पाठिंबा दिल्याबद्दल लोक त्यांच्यावर नाराज होतेच अशा परिस्थितीत कॉंग्रेसचा पाठिंबा काढून व त्यांच्याशी संबंध ठेवू नयेत असे प्रतिपादन करणारा सी. राजेश्वरराव यांचा गट आता वरचढ झाला. आणीबाणीतील अत्याचार आता चव्हाट्यावर येत होते व अशा आणीबाणीस व ती पुकारणाऱ्या कॉंग्रेसला पाठिंबा दिल्याबद्दल सी. पी आय च्या नेत्यांना स्वतःचीच लाज वाटू लागली तेही आता कॉंग्रेसवर व त्यांनी केलेल्या अत्याचारांवर तोंडसुख घेऊ लागले; परंतु त्यांना तसा अधिकार नाही, हे जनता त्यांना बजावून सांगू लागली. जनता राजवट आली तरी संजय गांधींचे कॉंग्रेसमधील वर्चस्व कमी झालेले नव्हते. मॉस्कोवाल्यांनी नेहमीच्या परंपरेनुसार जनता सरकारशी जुळवून घेतले होते. राजेश्वरराव आता कॉंग्रेसचा पाठिंबा काढून घेण्याचा आपला मनसुबा हुषारीने पुढे रेटत होते. डांगे, योगेंद्र शर्मा इत्यादी सी. पी. आय.मधील इंदिरावाद्यां-मुळे त्यांना एकदम कॉंग्रेसशी फारकत घेता येणे शक्य नव्हते. मग त्यांनी लेफ्ट युनिटीची कल्पना पुढे केली. कॉंग्रेस व विरोधी पक्षापासून समान अंतरावर उभे राहून स्वतंत्र भूमिका स्वीकारायची व हळूहळू लेफ्ट युनिटीचा पुकार करत मार्क्सवाद्यांकडे सरकायचे असा राजेश्वरराव यांचा बेत होता. त्यांच्या या मनसुब्यावर भटिंडा येथील अधिवेशनात १९७८ मध्ये बहुमताने शिक्कामोर्तब करण्यात आले. अखेर राजेश्वरराव यांनी डांग्यांवर मात केली !

## योगेंद्र शर्मा प्रकरण

मात्र इंदिरा गांधींच्या छावणीतून बाहेर काढून राजेश्वरराव पक्षाला मार्क्सवाद्यांच्या कळपात ढकलू पहात आहेत हे न कळण्याइतके डांगेवादी कार्यकर्ते दुधखुळे नव्हते; परंतु आणीबाणीला पाठिंबा दिल्याने पक्ष इतका दुबळा झाला होता की, त्याला कोणाच्या तरी कुबड्याची आवश्यकता होती. राजेश्वरराव यांना मार्क्सवाद्यांच्या कुबड्या पसंत पडल्या होत्या. 'स्वतंत्र भूमिका' वगैरे शब्द म्हणायला सोपे असले तरी आचरणात आणायला कठीण होते याचे भान डांगेवाद्यांना नसले तरी सी. राजेश्वरराव यांना होते. त्यांनी बंगाल, केरळमध्ये मार्क्सवाद्यांना वाढते सहकार्य देण्यास सुरुवात केली. सी. राजेश्वरराव एक दिवस आपला पक्ष मार्क्सवादी पक्षात विलीन करतील अशी भीती डांगेवाद्यांना वाटू लागली; परंतु जनता पक्ष सत्तेवर आणि इंदिरा कॉंग्रेसपक्ष वनवासात असल्याने त्यांना जोर करता येत नव्हता. संजय गांधींच्या वाढत्या प्रभावाने व त्यांच्या रशियावरील टीकेमुळे तेही कॉंग्रेसवर नाराज होते, जनता पक्षाने रशियाबाबत कॉंग्रेसप्रमाणेच मित्रत्वाचे संबंध ठेवल्याने त्यांना जनता सरकारबद्दल तक्रार करण्यास जागा नव्हती

जनता पक्षाच्या तमाशामुळे जनता वैतागली होती. जनता पक्षातील काही विघ्नसंतोषी नेत्यांनीच जनतापक्ष फोडल्यावर जनता मंत्रिमंडळ गडगडले व नंतर झालेल्या निवडणुकात जनतेने स्थैर्यासाठी १९८० मध्ये इंदिरा गांधींना परत निवडून आणले. या निवडणुकीत सी. पी. आय. इंदिरा कॉंग्रेस विरोधात मार्क्सवाद्यांबरोबर राहिला १९८० मध्ये इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्यावर डांगेवाद्यांनी जोर केला. सी. पी. आय. ला पुन्हा कॉंग्रेसच्या कळपात ओढण्याचा त्यांचा प्रयत्न होता व सरशी तिकडे पारशी अशी वृत्ती असलेल्या मॉस्कोवाल्यांनी त्यांना या बाबतीत हिरवा कंदील दाखवला, होता; पण राजेश्वरराव व त्यांचे पाठीराखे आपल्या विचाराशी ठाम राहिले. डांग्यांनी पक्षाला इंदिरा कॉंग्रेसकडे झुकविण्याची शर्थ केली; पण त्यात त्यांना अपयश आले. शेवटी त्यांनी व त्यांच्या कन्येने (रोझा देशपांडे) १९८० मध्ये सी. पी. आय. चा राजीनामा देऊन नवीन पक्षाची स्थापना केली. ते आपल्याबरोबर, हाताच्या बोटावर मोजता येतील इतके साथीदारही बाहेर नेऊ शकले नाहीत ! मोहित सेन, योगेंद्र शर्मा यांनीही डांग्यांना साथ दिली नाही. अशा प्रकारे राजेश्वरराव यांनी डांग्यांचा अडसर हुशारीने दूर केला. डांग्यांनी आपल्या पक्षासाठी मॉस्कोचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला परंतु मॉस्कोने त्यांना दाद दिली नाही. राजेश्वरराव यांची इंदिरा गांधींबद्दल मते मॉस्कोला पसंत नाहीत. परंतु त्यामुळे ते सी. पी आयचा पाठिंबा काढून घेण्याचा आततायीपणा करणार नाहीत राजेश्वरराव सध्या जरी 'इंटर नॅशनल कम्युनिस्ट गाईडिंग सेंटर' आता अस्तित्वात नाही असे म्हणून मॉस्कोचा उपमर्द करत असले त्यांना मॉस्कोपासून संपूर्ण फारकत घेता येणार नाही; परंतु मॉस्कोला दूर ठेवत असताना पॅट्रियटसारखी कम्युनिस्ट वृत्तपत्रे राजेश्वरराव लाइनवर त्वेषाने तुटून पडत आहेत. राव जरी इंदिरा कॉंग्रेस व भाजप यांना समान शत्रू मानत असले तरी वरवर पहाता तो दिखाऊपणा आहे. त्यांचा सर्वांत मोठा शत्रु इंदिरा कॉंग्रेसपक्षच आहे व तेच धोरण डांगे, शर्मा, सेन यांना पसंत नाही. या तिघांच्या मते राजेश्वरराव यांनी आपला पक्ष इंदिरा कॉंग्रेसच्या दावणीला बांधावयास हवा आहे. मात्र ज्या मार्क्सवादी पक्षाकडे राव आपला पक्ष रेटत आहेत तेथे त्यांना सन्माननीयरीत्या वागवले जाण्याची शक्यता नाही या दोन पक्षांच्या विलिनीकरणात मार्क्सवाद्यांना रस नाही.

सी. पी. आय. मध्ये सध्या जो अंतर्गत संघर्ष चाललाय त्याची ठिणगी उडाली ती, त्यांचे राज्यसभेतील नेते योगेंद्र शर्मा यांची पक्ष विरोधी कारवायांबद्दल त्या पदावरून मध्यंतरी हकालपट्टी करण्यात आली तेव्हा. परंतु त्याचे कारण (खरे) वेगळे होते. २१ जूनला योगेंद्र शर्मा हे मेडिकल ट्रिटमेंटकरिता मॉस्कोला गेले होते बरोबर याच दिवशी ४२ वर्षांपूर्वी हिटलरने रशियावर आक्रमण केले होते. त्यामुळे या दिवसाला महत्त्व होते. म्हणून भारत–रशिया मैत्रीच्या पार्श्वभूमीवर, त्या निमित्ताने पंतप्रधान इंदिरा गांधींनी सोव्हिएत अध्यक्ष आंद्रेपॉव्ह यांना एखादा संदेश आपल्याबरोबर द्यावा, अशी विनंती योगेंद्र शर्मा यांनी मॉस्कोला जाताना त्यांना केली. हे पत्र आपण नेत असल्याची कल्पना त्यांनी सी. पी. आय.च्या ऑफिसला दिली नाही. हे पत्र आंद्रेपॉव्ह यांना देण्यात आले. त्यामध्ये काय मजकूर होता यावरून निरनिराळे तर्कवितर्क लढवले गेले व खळबळ माजवण्यात आली.

या पत्रामध्ये मजकूर होता तो असा की, इंदिरा गांधींनी त्या अगोदर नुकताच युरोपचा दौरा केला होता. त्या दौऱ्यावर त्यांनी निरनिराळ्या देशाच्या समस्यांचे निरीक्षण केले होते. त्याबद्दल त्याची स्वतःची मते मांडली होती. त्याचबरोबर २१ जून या दिवसाचे महत्व लक्षात घेऊन शर्मांबरोबर, मैत्री वृद्धिंगत व्हावी म्हणून आपण पत्र पाठवत आहोत असा उल्लेख होता. आपण भारतात परत आल्यावर (युरोपियन दौऱ्यावरून) अंतर्गत व बाह्य धोके कसे वाढत आहेत, याची आपल्याला जाणीव झाल्याचा उल्लेख होता. डावे, उजवे व इतर एकत्र येऊन देश कमकुवत करू पहात आहेत अशी शंका प्रगट करण्यात आली होती. पत्राच्या शेवटी लिहिले होते की, शर्मांना भारतातील राजकीय परिस्थिती पूर्णपणे ज्ञात आहे, ते तुम्हाला त्याबद्दल विस्तृत माहिती देतील. या पत्रातील, डावे हे उजव्याबरोबर हातमिळवणी करून देश कमकुवत करू पहात आहेत हा मजकूर सी. पी. आय. बद्दलच होता. त्यामुळे तो सी. राजेश्वरराव याना झोंबला. राजेश्वररावांची इंदिराविरोधी लाईन पसंत नसल्याने योगेन्द्र शर्मा त्याच्यावर सतत टीका करत होते. त्यामुळे राजेश्वरराव संधीची वाट पहातच होते. या पत्राचे निमित्त साधून राजेश्वरराव यानी काटा काढला. कारण मात्र पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे त्याना राज्यसभेच्या पक्षनेतेपदावरून हकलले असे दाखवले. □

---

## एका गरीब शेतकऱ्याची ससेहोलपट : पृष्ठ ३ वरून

प्रकरण मंजूर झाले होते तर गोळवा याना विजपुरवठा नाकारण्यात आला. असे का? या प्रश्नाला उत्तर द्यायला हे संबंधित अधिकारी बांधलेले नव्हते!

दि. ४।११।१९८१ ला श्री. गोळवा यानी मुख्य अभियंता, म. रा. वि. मंडळ मुंबई याच्याकडे आपली कैफियत दाखल केली.

अधिकाऱ्यांची पत्रापत्री सुरू झाली.

श्री. एम्. वाय. भट, सुपरिंटेंडिंग इंजिनिअर, मुंबई, यानी दि. २१।११।८१ रोजी नाशिक विभागाचे व्यवस्थापकीय अभियंता श्री. काशी याना पत्र पाठवून पूर्ण चौकशी करून दहा दिवसाचे आत रिपोर्ट पाठविण्याची सूचना दिली. या पत्राची एक प्रत भटसाहेबांनी श्रीरामपूरच्या ऑफिसलाही पाठविली होती. १३ जाने. ८२ ला त्यांनी तातडीने (?) उत्तर पाठविलं.

'फक्त सर्व्हिस कनेक्शनसाठी श्री. गोळवा याचे एस्टिमेट या ऑफिसला मिळालेले आहे तरीही होल्टेज रेग्युलेशन ६% पेक्षा जास्त होत असल्याने सदरचे प्रकरण तांत्रिकदृष्टचा अयोग्य आहे. तरीही असि. इंजिनिअर, संगमनेर याना दुरुस्त एस्टिमेट त्वरीत देण्याविषयी सूचना देण्यात आली आहे. पूर्तता होताच पुढील कार्यवाही केली जाईल.'

दरम्यान गोळवाना काहीही कळविण्यात आलेले नव्हते.

८० सालात आपल्याबरोबरच्यांना वीजकनेक्शन मिळालं. त्याचे पंपही सुरू झाले. आडकाठीचे कोणतेही कारण नसताना आपली दाद ना फिर्याद!

खालच्या अधिकाऱ्याना खूप वेळा भेटून झालं. संगमनेर, श्रीरामपूरच्या कार्यालयातून किती हेलपाटे घालून झाले त्याची गणतीच नाही; पण प्रतिसाद शून्य! कोणी दखलही घेत नाही! साधी सहानुभूती-तीही नाही. मार्गदर्शन दूरच! सगळे अधिकारी कोरडे ठणठणीत!

श्री. गोळवा यांनी मुंबई गाठली. विद्युतमंडळाच्या टेक्निकल मेंबरना ते दि. ५।२।८२ रोजी भेटले. आपल गाऱ्हाणं त्यांच्या कानावर घातल. अधिकाऱ्यांनी चालविलेली होलपट थांबविण्याची विनंती केली. न्याय मागितला. त्यानीही पुन्हा चौकशीचं आश्वासन दिलं.

चौकशीची चक्रं फिरायला लागली.

### वरिष्ठांची दिशाभूल

श्री. एम. वाय. भट, अभियंता, म. रा. वि. मं. मुंबई यांनी दि. ९।२।८२ च्या पत्रान टेक्निकल मेंबर यांच्या आदेशानुसार आठ दिवसांत या प्रकरणाची पूर्ण चौकशी करून त्याचा रिपोर्ट पाठविण्याविषयी श्री. पेद्दावाड, कार्यकारी अभियंता. श्रीरापूर याना कळवलं

१९।२।८२ ला श्री. पेद्दावाड यानी भटसाहेबांना कळवलं, 'असि. इंजिनिअर, संगमनेर याच्या रिपोर्टानुसार १५ H. P. च्या वीजकनेक्शनकरता १९७७ साली श्री. गोळवा यांचा अर्ज आलेला होता. १९७७ च्या योजनेत नांदुर खंदरमाळ या गावाचा समावेश नसल्याने त्या अर्जानुसार कनेक्शन मंजूर करणे शक्य नव्हते. १९८०–८१ च्या योजनेत त्याचा समावेश होता त्यात दोन फ्लोअर मिल, ५० लाइट आणि फॅन्स व २० रस्त्यावरच्या लाइटकनेक्शनसह ८ शेतीच्या पंपांचा समावेश होता. गोळवा याच्यासह बनवलेली दहा प्रकरणे होल्टेजचे प्रमाण वाढत असल्याने तांत्रिकदृष्ट्या योग्य ठरत नव्हती. म्हणून गोळवा याचीच १५ H. P. चे एक व १० H. P. चे एक अशी दोन प्रकरणे वगळण्यात आली!

पन्नास घराच्या नांदूरसारख्या खेड्यात पेद्दावाडसाहेबानी कळविलेली २ फ्लोअरमिल्स, २० रस्त्यावरची लाइटकनेक्शन्स आणि फॅनची कनेक्शन्स तेव्हाही देण्यात आलेली नव्हती आणि आजही अस्तित्वात नाहीत!

पण या खोट्या रिपोर्टबद्दल पेद्दावाडसाहेबाना जाब कुणी विचारायचा? वीजमंडळाच्या अधिकाऱ्याना काम करण्यासाठी जरी नियम नसतील, त्याच्यावर जरी कोणाचा दाब नसेल, हे अधिकारी जरी वरिष्ठांना जुमानत नसतील, त्यानी जरी वरिष्ठांची दिशाभूल केली तरी हात बांधून स्वस्थ बसणाऱ्यापैकी गोळवा नव्हते. केवळ अधिकाऱ्यांच्या अट्टाहासापायी अन्याय होतोय; पण मोडून पडलो तरी चालेल; पण वाकायचं नाही, हटायचं नाही, झुंज द्यायची या जिद्दीने गोळवांचे प्रयत्न जारी होते.

तांत्रिक सदस्याना भेटूनही न्याय मिळत नाही म्हटल्यावर गोळवानी ऊर्जामंत्री मा. ना. असिर याच्याकडे धाव घेतली.

'आपल्यावर हेतुपुरस्सर अन्याय केला जातोय, खालच्या ऑफिसकडून प्रत्येक वेळी अपुरी व चुकीची माहिती पुरविली जातेय. सुरुवातीला सर्व प्रकरणे योग्य असल्याचा श्रीरामपूर ऑफिसने खुलासा केलाय. मग

फक्त याचेच प्रकरण अयोग्य कसे ठरले? फक्त संबंधित स्थानिक इंजिनिअरने सांगितलेले पैसे–५० रु. दिले नाहीत म्हणून? स्थानिक अधिकाऱ्यावर वरिष्ठांची मर्जी आहे. त्याना कुणी जाब विचारत नाहीत म्हणून ते गरीब शेतकऱ्यांची अडवणूक करतात. त्याना नाडतात. त्याची होलपट करतात. याची चौकशी झालीच पाहिजे! मला न्याय हवा आहे!

पुन्हा श्रीरामपूरच्या कार्यकारी अभियंत्याना मुबईच्या प्रधान कार्यालयातून २३ एप्रिल ८२ ला खलिता रवाना झाला. त्यात गोळवा याना पंपासाठी कनेक्शन देण्यात यावे असे तांत्रिक सदस्यांनी सुचविले असल्याचे स्पष्ट कळविण्यात आले व पूर्ततेचा रिपोर्ट त्वरित मागवला होता.

पुन्हा दि. १५।५।८२ ला श्रीरामपूर कार्यालयाने मुख्य अभियंत्याना पत्र पाठवून यापूर्वीचीच आपली हे प्रकरण 'तांत्रिकदृष्ट्या अयोग्य' असल्याची ताठर भूमिका कायम ठेवली.

श्रीरामपूरचे अधिकारी आपल्याला दाद देत नाहीत हे लक्षात आल्यावर मुबईच्या या वरिष्ठ (?) अधिकाऱ्यांनी नासिक झोनच्या अधिकाऱ्याना दि. ११ जून ८२ रोजी पत्र पाठवून 'सर्व परिस्थिती लक्षात घेऊन गोळवा याना वीजपुरवठा कसा करता येईल यासंबधी श्रीरामपूर कार्यालयाला मार्गदर्शन करावे' असे कळवून टाकले.

दरम्यान असिरसाहेबाना पाठविलेल्या अर्जात श्री. गोळवा यानी केलेल्या आरोपाची चौकशी करण्यासाठी विद्युतमंडळाच्या दक्षता व सुरक्षा विभागाला सागण्यात आले. त्यानुसार सुरक्षा व दक्षता विभागाकरता श्री. एस. पी. सिंग यानी दिलेला रिपोर्ट फार बोलका आहे.

६।९।८२ ला चेअरमन, म. रा. वि. मंडळ यांना पाठविलेला रिपोर्ट म्हणतो–

१) सबइंजिनिअर श्री. महाजन यांनी श्री. गोळवा याना १० H. P. व १५ H.P. चे कनेक्शन देण्यास हेतुपुरस्सर नकार दिला.

२) ८ शेतकऱ्यांचे कनेक्शन पैसे घेऊन मंजूर करण्यात आले. श्री. गोळवा यांनी पैसे न दिल्याने त्याचे कनेक्शन तांत्रिकदृष्ट्या अयोग्य ठरविण्यात आले.

३) श्री. गोळवा यानी विद्युतमंडळाच्या मुबई कार्यालयाकडे अर्ज केला होता. त्याबाबत सबधित कार्यकारी अभियंत्यांनी दिशाभूल करून वरिष्ठाना चुकीची माहिती पुरविली.

चौकशीअती आरोप क्र. एक व तीन शाबित झाले आहेत.

फक्त पैशाची मागणी केली याला सबळ पुरावा मिळू शकला नाही. म्हणून आरोप क्र. २ हा पुराव्याअभावी शाबित होऊ शकला नाही.'

## रितसर पूर्तता

दरम्यान जाने. ८२ मध्ये श्री गोळवा याच्या मुलाने आपले १० H. P. चे प्रकरण 'रीतसर पूर्तता' करून मजूर करून घेतले.

जे १५ H. P. आणि १० H. P. चे प्रकरण तांत्रिकदृष्ट्या योग्य ठरत नव्हते त्यातले एक १० H. P. चे प्रकरण तर मंजूर झाले, आहे या परिस्थितीत प्रकरण कसे योग्य ठरले याचा जाबही कोणी अधिकाऱ्यांना विचारला नाही!

मा. असिर याच्याकडे केलेल्या तक्रारअर्जानुसार झालेल्या चौकशीचा अहवाल श्री. व्ही. एस. शेवडे, चेअरमन म. रा. वि. म. यांनी पत्र क्र. M2|C|N C./99|44660 दि. २९।९।८२ च्या पत्राने असिर यांना कळविला–

'श्री. गोळवा आर. एच्. याना दिनाक ७।७।८२ रोजी १० H. P. चे कनेक्शन देण्यात आले आहे. चौकशी अहवालात श्री. गोळवा याचेवर अन्याय झाल्याचे शाबित झाले आहे. त्यात जे अधिकारी, संबधित कर्मचारी जबाबदार असतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यासंबंधीच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.'

कनेक्शनसाठी अर्ज गोळवांचा होता. दिलेलं कनेक्शन मुलाच्या नावाचं!

पुन्हा चेअरमन श्री. शेवडे यांनीही कनेक्शन दिल्याचा चुकीचा रिपोर्ट मत्रीमहोदयांना दिला आणि कारवाईच्या सूचना २९।२।८२ ला दिल्या. त्यानंतर दीड वर्ष उलटून गेलं तरी सर्व सबंधित अजूनही आपल्या जागेवर ठिय्या देऊन आहेत!

प्रकरण मत्र्यापर्यंत गेलं. चौकशी झाली. अन्याय केल्याचं निष्पन्नही झाल. अधिकारी दोषी ठरले. तरीही अन्याय दूर होण्याची लक्षणं दिसेनात. कनेक्शन काही मिळत नव्हते. अर्ज–विनंत्या–चौकशी याच्यापुढं प्रकरण सरकत नव्हतं. खालचे अधिकारी चेअरमनच्या आदेशाचीही पत्रास ठेवत नव्हते. गोळवाना कनेक्शन न देण्याचा– आपल्या नाकावर टिच्चून भांडणाऱ्या या शेतकऱ्याला जेरीस आणायचा बहुधा त्यांनी निश्चयच केला असावा

आता न्यायालयाची दारे ठोठविण्याशिवाय पर्याय नव्हता.

त्यापूर्वीची पायरी म्हणून कनेक्शन देणेसंबंधी व नुकसानभरपाई मिळावी यासाठी वीजमडळाला श्री. गोळवा यांच्यासाठी ॲड. एन. आर राठोड यानी दि. ३।१।८३ रोजी नोटीस पाठवली. वकिलामार्फत आलेल्या या नोटिशीला विजमडळाच्या अधिकाऱ्यानी केराची टोपली दाखवली!

ॲड. राठोड यांच्या व्यावहारीक सल्ल्यानुसार आधीच पाच वर्षं झालेली, न्यायालयात जाऊन अजून इतकीच वर्षं घालविण्याइतकी सहनशक्ती आता गोळवाच्यात उरली नव्हती. न्यायासाठी ताटकळत बसण्यापेक्षा आणि न्याय मिळायची वेळ उगवेल तेव्हा संपलेल असण्यापेक्षा आताच प्राणपणाला लावावेत– काय तो सोक्षमोक्ष करून टाकावा या विचारान दि ६।१।१९८४ पासून वीजमडळाच्या संगमनेरच्या ऑफिसच्या दारात प्राणांतिक उपोषणाला बसण्याचा त्यानी निर्णय घेतला. संबधित मत्र्यापासून सर्व अधिकाऱ्याना नोटीस धाडण्यात आली. आता हा जिद्दी माणूस प्राण गेला तरी हटणार नाही याची जाणीव अधिकाऱ्यांना झाली असावी. दिलेल्या मुदतीच्या आदल्या दिवशी धावपळ झाली. गोळवांना तातडीन कनेक्शन देण्याचं आश्वासन मिळालं. तूर्त उपोषण स्थगित केलंय. कामाला सुरुवात होण्याची वाट आहे.

उद्या कनेक्शन मिळेलही; पण १९७९ ते ८४या गेलेल्या कालावधीचं काय? घातलेल्या हेलपाटचांचा आणि खर्च झालेल्या पैश्यांचा हिशोब कोणाकडून वसूल करायचा? झालेल्या मनस्तापाची भरपाई कशी करणार? पाच वर्षं विजेअभावी बुडालेल्या उत्पन्नाचं काय?

आणि हे सगळ का तर एका दीडदम-

डीच्या अधिकाऱ्याच्या दुराग्रहापायी त्याला पाठीशी घालून सरक्षण देणाऱ्या वरिष्ठा-मुळे. चेअरमन आणि वरिष्ठांच्या सूचना आदेश जुमानले जात नाहीत. मंत्र्यांपर्यंत खोटी माहिती बिनदिक्कत, निर्लज्जपणे पुरविली जाते आणि त्यावर त्यांचे समाधानही होते. मंत्र्यापर्यंत दाद मागितली तरी अन्याय दूर होत नाही· न्यायासाठी प्राण पणाला लावावे लागतात.

असं हे आमच्या शेतकऱ्यांचं, कष्टकऱ्याच गरिबाचं, लोकाच राज्य ! लोकांच्या सहन-शक्तीचा अंत बघण्यात काय हशील आहे ? मग पेटलेली लोक अशा अधिकाऱ्याना रस्त्यावर ओढल्याशिवाय राहणार नाही. मग मात्र गुढगे टेकले तरी क्षमा मिळणार नाही !

## बेकायदा कनेक्शन

हे झालं प्रकरण योग्य असूनही जाणून बुजून अडवणुक करण्याचं, हेतूपुरस्सर त्रास देण्याच. मग त्यासाठी तांत्रिकदृष्टचा अयोग्य असल्याची खोटी कारणे पुढं करण्याचं. या उलट आणखी एक प्रकरण आहे. सर्वच दृष्टीन अयोग्य असलेलं. तरीही मंजूर केलेलं !

प्रकरण सगमनेर तालुक्यातलच. विद्युत-मंडळाचंच.

आभोरे या खेड्यातील एक घडपडचा तरुण सतीश देशमुख याने काही आदिवासी, भिल्ल शेतकरी याना एकत्र करून 'दरा मच्छिमारी सहकारी संस्था' स्थापन केली. आंभोऱ्याला १९६५ साली झालेला एक तलाव आहे. या तलावाचा वापर मत्स्यबीजे सोडण्यासाठी करण्याची उपअभियता पाटबधारे विभाग, अहमदनगर यांनी दि. २४-३ १९८३ च्या पत्रान्वये या सहकारी सस्थेला परवानगी दिलेली आहे. या तलावाच्या बुडीत क्षेत्रातील विहिरी, हौद, डोह याचा उपयोग संस्थेच्या मत्स्यबीजवाटिकेसाठी करण्याची परवानगी सबधितानी सोसायटीला दिली आहे उपविभागीय अभियता, अप्पर प्रवरा प्रकल्प याचेबरोबर तसा या सस्थेने दि. ७-४-१९८३ रोजी एक करारहो केला आहे. या तलावाच्या बुडीत क्षेत्रात एक विहिर आहे. ही विहिर पूर्वी श्री. भाऊसाहेब देशमुख यांच्या मालकीची होती; पण तलावाकरता सरकाने ही सर्व जमीन आणि पर्यायाने त्यातली विहिरही संपादन केली. मच्छिमारी सस्थेबरोवर झालेल्या करारानुसार त्याचा उपयोग करण्याचा हक्क फक्त या सस्थेलाच आहे असे असताना या विहिरीचे पाणी बेकायदेशीरपणे उपसण्यासाठी श्री. भाऊसाहेब याना पंपासाठी वीजमडळाने बेकायदेशीर कनेक्शन दिले.

एप्रिल ८३ च्या दरम्यान तलाव कोरडा पडल्यावर, त्यातले पाणी कमी झाल्यावर वीज कनेक्शन देण्यासाठी तलावातून ही बारा पोलची (खाबाची) लाईन टाकण्यात आली. लाईन टाकण्यापूर्वी सर्व्हे करताना संबधित कार्यकारी अभियंत्याच्या एवढेही लक्षात येऊ नये की, आपण टाकतो आहोत ही लाईन पूर्ण तलावातून जाते. आज पाणी कमी असले तरी पावसाळ्यात वाढणाऱ्या पाण्याने तलाव भरल्यावर आणि खाब पाण्यात बुडल्यावर पाण्यात उतरणाऱ्या विजेच्या करंटने काही होऊ शकेल.

लक्षात आले नाही की जाणून–बुजून दुर्लक्ष केले ?

या धोक्याची कल्पना देणारा एक ठराव आंभोऱ्याच्या ग्रामपंचायतीने दि. ३-१०-८३ रोजी मंजूर करून वीजमंडळाच्या अधिकाऱ्याना पाठवून दिला.

वीज कनेक्शन देताना कोणत्याही प्रकारचा 'ना हरकत दाखला' पाटबंधारेखात्याकडून वीजमडळाने घेतला नव्हता. आणि जी विहिर सरकारी मालकीच्या क्षेत्रात आहे त्यावर कनेक्शन कसे दिले जाऊ शकते ?

ही वस्तुस्थिती निदर्शनास आणणारे एक पत्र २२।४।८३ रोजी मच्छिमार संस्थेने संगमनेर येथील वीजमडळाच्या उपअभियंत्यांना पाठविले होते. त्याची एक प्रत पाटबधारे खात्याच्या उपअभियंत्यांनाही पाठविली होती.

पाटबंधारे खात्याच्या उपअभियंत्यानी दि. २३।५।८३ रोजी वीजमंडळाच्या संगमनेर येथील अभियंत्याना 'सरकारी संपादित विहिरीवर तुम्ही भाऊसाहेब देशमुख यांना वीज कनेक्शन दिल्याचे निदर्शनास आले आहे. या विहिरीचा उपयोग मत्स्यबीजे सोडण्यासाठी केला जातो. वीज-मोटार–कनेक्शन दिल्याने संस्थेच्या कामात अडथळा येतो. तरी या कार्यालयाच्या शिफारसीनुसार सदरचे वीज कनेक्शन तोडण्यात यावे. कार्यवाही या कार्यालयाला कळविण्यात यावी.' असे कळवून टाकले. त्याचबरोबर श्री. भाऊसाहेब देशमुख यांनाही या विहिरीचे पाणी उपसण्याचे बद करावे व संस्थेच्या कामात अडथळा आणू नये अशी ताकीद–सूचना देण्यात आली.

पाटबंधारे खात्याने कळविले, तक्रार-अर्ज दिला, ग्रामपंचायतीने ठराव पाठवला तरीही अधिकारी दखल घेईनात. तेव्हा मच्छिमारी संस्थेकरता अॅड एन. आर. राठोड यानी आठ दिवसात कनेक्शन न तोडल्यास नुकसान-भरपाईसाठी कारवाई करण्यात येईल अशी नोटीस वीजमडळाला दिली. पाटबधारेखात्याने वीजमडळाला कळविले तरीही नोटिशीला दिलेल्या उत्तरात वीजमंडळाने आमचे कृत्य बेकायदेशीर नाही असे बिनदिक्कत ठासून सागितले असून तुमची संस्था रजिस्टर होण्यापूर्वी आम्ही कनेक्शन दिले असल्याचे कळवून हात झटकले.

पण विहिर सरकार–संपादित जमिनीत आहे आणि कनेक्शन देण्यापूर्वीपासून ती पाटबंधारेखात्याच्या ताब्यात आहे. तेव्हा अशा वापराला पाटबंधारेखात्याची परवानगी आहे किंवा नाही हे न विचारताच कनेक्शन दिले. सगळे नियम धाब्यावर बसवून बेकायदेशीर कनेक्शन दिले !

स्थानिक अधिकारी दाद देईनात म्हणून सस्थेचे सचिव या नात्याने सतीश देशमुख यांनी दि. १३।७।८३ रोजी वीजमंडळाच्या दक्षता व सुरक्षा विभागाच्या सचालकाकडे तक्रार केली.

आपल्या बेकायदेशीर कामाचा पचनामा झाल्याशिवाय राहाणार नाही हे लक्षात आल्यावर हे कनेक्शन तोडण्यात आले.

आज कनेक्शन तोडले असले तरी नियम धाब्यावर बसवून असा मनमानी कारभार एखादा स्थानिक अधिकारी कसा करू शकतो ?

आणि त्याच्या या कारभाराचा जाब कुणी विचारायचा ?

प्रत्येक वेळेला गोंळवा आणि सतीश देशमुखसारखी झुज घेणारी माणसं भेटतील असं थोडंच आहे ?

मग सर्वसामान्यानी काय करायचं ?

सहन करणं असह्य झाल की, शक्ति-प्रदर्शन करायला मग सगळेच रस्त्यावर येतील. मग आकाशातला बापही कोणाला वाचवू शकणार नाही ! ☐

## ग्रामदानाची प्रयोगभूमी
दुसरी आवृत्ती
(आगामी)

ग्रामदानक्रांती म्हणजे काय? तिचे मार्ग कोणते? कोरापुटमधील (ओरिसा) कार्याची माहिती करून घेतल्यामुळेच हे कळण्याजोगे आहे. श्री. माजगावकर यांनी याच दिशेने आपल्या पुस्तकात प्रयत्न केला आहे. हा उपयुक्त झाला आहे असे मला वाटते.

— डॉ. धनंजयराव गाडगीळ

ज्यात प्रत्यक्ष व्यवहार्यता आणि दूरगामी क्रांतिकारक ध्येयवाद यांची सांगड नाही, अशा प्रयोगाबद्दल महाराष्ट्रामध्ये जिव्हाळा उत्पन्न होत नाही. कोरापुटच्या प्रयोगाचे हे चिकित्सक दर्शन म्हणूनच मला उपयुक्त वाटते. समाजक्रांतीचे ध्येय पुढे ठेवणाऱ्या सर्वांकडूनच या पुस्तकाचे स्वागत व्हावे असे मला वाटते.

— दि. के. बेडेकर

पुस्तक उत्कृष्ट. माहिती जमा करण्याची कसोशी, अवलोकन, त्यातून निष्कर्ष काढण्याची बुद्धी — सर्वच गुण यात दिसून येतात. पण याहीपेक्षा स्वतंत्रपणे चिंतन करण्याचे जे सामर्थ्य या लेखनात दिसून येते ते विशेष अभिनंदनीय आहे. मला पुस्तक वाचून अत्यंत आनंद झाला.

¤ — डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे

## श्रीग्रामायन
दुसरी आवृत्ती
(प्रसिद्ध झाली)

माजगावकरांचे हे पुस्तक प्रभावी आहे यात शंका नाही. विचार करणाऱ्या माणसाचे लक्ष ग्रामीण समस्याकडे वेधून घेण्याची फार मोठी कामगिरी ते करीत आहेत. हे करताना माजगावकराचे साहित्यगुणही विशेषत्वाने चमकतात. तजेलदार भाषा, स्फोटक वर्णन, भेदक उपरोध, नाटयमय प्रारंभ व शेवट हे सगळे त्यात आहे. शिवाय मौलिक विचार आहेत, आणि शुद्ध भावकाव्यही कुठेकुठे आहे.

— प्रा. स. ह. देशपांडे

श्री. ग. माजगावकराच्या पुस्तकाचे नाव असे आहे की, ते उघडण्यापूर्वीच एक ण वाचकाने जरा थबकावे — 'श्रीग्रामायन!' माजगावकराना जे जे व्यक्त करायचे आहे त्याचा 'मर्मबंध' म्हणजे हे नाव. स्वैर चिंतनात्मक लेख, मुलाखती किंवा मित्रांशी पत्ररूप सवाद — अशा निरनिराळ्या अन् ललित शैलीची प्रसन्न डूब दिलेल्या माध्यमातून लेखकाने एक सूत्र गोवत नेले आहे अशा विविध माध्यमामुळे काही वेळा माजगावकराचे लिखाण भरकटत गेले असले तरी त्यांना जी एक बैठक माडायची आहे तिचा पक्केपणा कुठेही गेलेला नाही

— डॉ. विद्याधर पुंडलिक

जीवनाची चाकोरी सोडून, पायपीट करून ग्रामीण प्रश्नाचे वेगवेगळे पैलू जवळून पाहण्याचा हा एक आगळाच प्रयत्न आहे. काही उपक्रमात पुढाकार व जबाबदारीही घेतलेली आहे.

¤ — आबा करमरकर

## निर्माणपर्व
(आगामी)

काही रचनाप्रयोग आणि संघर्षक्षेत्रे यांचा सहभागपूर्वक घेतलेला शोध — शहाद्याची चळवळ, म्हैसाळ, जयप्रकाश आंदोलन, ग्राहक चळवळ . . . . इत्यादी.

¤

## जनतापर्व
(आगामी)

आणीबाणी, दुसरे स्वातंत्र्य, जनता राजवटीची सुरुवात—शेवट.

**लेखक : श्री. ग. माजगावकर**

या संघर्षातील माझे सर्वोच्च ध्येय ना गुलामी प्रथेला अभय देणे आहे ना तिचे उच्चाटन करणे आहे ते आहे देशाची अखंडता अबाधित ठेवणे जर एकाही गुलामाला मुक्त न करता मी देशाची अखंडता राखू शकलो तर ते मी करेन जर काही गुलामांची मुक्तता केल्याने आणि काहींना तसेच ठेवून देश अखंड ठेवता आला, तर ते मी करेन मी गुलामी प्रथेबाबत वा काळ्या वंशाच्या लोकांबाबत जे करतो ते देशाची अखंडता कायम रहावी यासाठीच करतो आणि त्याला विरोध करतो तो यासाठी की त्यामुळे देश अखंड रहायला साहाय्य होणार असते – **लिंकन**

**देशाचे विच्छेदन हेच पाप मानणाऱ्या**
**सर्वात महान राजकीय नेत्याची**
**संपूर्ण ओळख करून देणारा ग्रंथ.**

अब्राहम लिंकन

# फाळणी टाळणारा महापुरुष



वि.ग.कानिटकर

**फाळणी एकदा झाली**
**पुनः होणार नाही ह्याची शाश्वती वाटावी**
**अशी परिस्थिती नाही.**
**प्रत्येकाने अभ्यासायला हवी अशी**
**लिंकनची राजकीय कहाणी.**

**भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली**
**पहिली डिलक्स आवृत्ती.**
**मोठा क्राऊन आकार**
**पृष्ठे : सुमारे ४००**
**मूळ किंमत : रु. १५०/- किमान**
**सवलत मूल्य : रु. ९५/- फक्त (ट. ख. स्वतंत्र)**
**पुस्तक १ जूनला प्रकाशित होईल.**
**आज पासून सर्वत्र नोंदणी सुरू.**

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव पेठ, पुणे. ४११ ०३०

आमची पंचराशी कला

# चार नवी प्रकाशने

## बलसागर

**श्री. ग. माजगावकर**

तीस रुपये

राष्ट्रवादी भूमिकेतून नव्या क्षितिजांचा घेतलेला शोध.

## डॉ. आयडा स्कडर

**सौ. वीणा गवाणकर**

बावीस रुपये

ग्रामीण भागात डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न भारतात प्रथम डॉ. आयडांनी केला. त्यांच्या त्यागमय जीवनाची कहाणी.

—एक होता कार्व्हर च्या लेखिकेचे दुसरे पुस्तक.

## पूर्णिया

**अनिल अवचट**

बारा रुपये

अलिप्तपणे तरी भेदकतेने घडवलेले बिहारच्या माणसाचे दर्शन.

आवृत्ती तिसरी

## लेक वालेसा

**डॉ श्रीकांत मुंदरगी**

बावीस रुपये

यंदाचे नोबेल प्राईझ विजेता लेक वालेसा आणि पोलिश जनता यांनी रशियन दडपशाहीविरुद्ध दिलेल्या लढ्याचे चित्रण—मराठीत प्रथमच.

## राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०


MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage—No. 11 ) Regd. No. PNCW-28